# सर्वे जन्तु सुखिनः



## रत्नाकर महाजन


आकाशगामी
लोकमान्य सेवा संघ पारले
सांस्कृतिक शाखा

# " सर्वे जन्तु रुटीन: "

अर्थात -

" माझ्या आठवणी "



रत्नाकर महाजन

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १७ सप्टेंबर २०१७

©esahity Pratishthan®2017

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.



## मी निवृत्त झालो

पैसे कमावणे हे ध्येय नाही तर ते साधन आहे. ध्येय आहे ते आयुष्य सुखाने, आनंदाने, समाधानाने जगावे.

बरोबर २२ वर्षांपूर्वी याच तारखेला (३१-१-१९९५) मी निवृत्त झालो. मागे वळून बघावे असे वाटले. अन् योगायोगाने कविवर्य बा. सी. मर्ढेकरांच्या खालील ओळी वाचण्यात आल्या.

"सर्वे जन्तु रुटीना: | सर्वे जन्तु निराशया: ||"

आणि खालील ओळी सुचल्या!

"अगदी वेळच्यावेळी"

वेळच्यावेळी मी जन्मलो

वेळच्यावेळी मोठा झालो

शाळेत गेलो

कॉलेजात गेलो

ग्रॅजुएट झालो

वेळच्या वेळी नोकरी लागली

लग्नही झाले

मुले झाली

मुले मोठी झाली

मुले शाळेत गेली, कॉलेजात गेली

वेळच्यावेळी मुलांची लग्ने लावून दिली

मग वेळीच निवृत्त झालो

त्यानंतर मुलांची मुले मोठी होताना बघितली

वेळीच म्हातारा झालो

मरेनही, वेळच्या वेळी!

अगदी कसे आखीव रेखीव!

"अशा येथल्या संसारात

जगण्याचा चुकला पाढा;

आणि शेवटी परिस्थितीचा

गळ्याखाली उतरे काढा.

"सर्वे जन्तु रुटीना: | सर्वे जन्तु निराशया: ||"

सत्य अप्रिय असलं कटू असलं तरी ते सत्य असतं! पण ..पण..

हे अर्धसत्य आहे! या 'रुटीन'मधेच विरंगुळा शोधायचा असतो, अर्थ शोधायचा असतो. या 'निराशया'तच आशय शोधायचा असतो, सुख शोधायचे असते.

सामान्य माणसाची ही व्यथा मर्ढेकरांनी अचूक सूचित केली आहे. जीवनाच्या रुटीनमध्ये माणसाचा जगायचा पाढाच चूकन जातो आणि परिस्थितीचा काढा गळयाखाली उतररावा लागतो. जगणे राहून जाते.

आपण नोकरी, कामधंदा करतो ते पैसे कमावण्यासाठी. ते ध्येय नाही तर साधन आहे. ध्येय आहे ते आयुष्य सुखाने, आनंदाने, समाधानाने जगावे. ते कधीही दृष्टीआड होऊ देऊ नये.

हिंगणे - पुणे



## महर्षी भारतरत्न श्री. धोंडो केशव कर्वे उर्फ आमचे लाडके 'आण्णा'

मी अशाच निवडक आठवणी सांगणार आहे की ज्या मी कधीच विसरु शकत नाही! ज्यांच्या माझ्या आयुष्यावर फार मोठा परिणाम झाला आहे.

माझी ही आठवण मी ७-८ वर्षांचा होतो तेव्हाची आहे. मला हिंगण्याला महर्षी अण्णा कर्वे यांच्या अनाथ बालाकाश्रमात ठेवले होते. सकाळी लवकर उठावे लागे. दिवसभर सगळे अगदी शिस्तीत चालत असे. संध्याकाळी तिथल्या एका मोठ्या हॉलमध्ये आम्हाला खेळायला, धुडगूस घालायला मिळे. तिथेच मी अण्णांना पाहिल्याचे आठवते. कृश शरीर. येऊन एका कोपऱ्यात खुर्चीत बसत.

रात्री १० वाजता सगळे दिवे मालवून टाकीत. (विजेचे दिवे होते). मग अंधार गुडूप. मला अंधाराची फार भीती वाटत असे.

आश्रमातले बंदिस्त आयुष्य मला आवडत नव्हते. राग पटकन यायचा. मारामारी करण्या एवढी ताकद नव्हती. तेव्हा भांडण झाले की मी शिव्या द्यायचो. मी खेडेगावातून गेलो होतो. त्यामुळे तोंडात अस्सल गावरान शिव्या होत्या.

मुलांनी माझी तक्रार केली. मला बोलवून रागे भरले व पुन्हा असे केले तर परत पाठवून देऊ असा दमही दिला. मला एवढे काही कळत नव्हते. पण शिव्या दिल्यातर परत पाठवू हे पक्के लक्षात ठेवले. आणि माझा शिव्या द्यायचा सपाटा मी आणखीनच जोरात सुरु केला! कारण मला तिथून लवकर सुटायचे होते!

आम्ही राहत होतो त्या जुन्या बराकी होत्या. एका खोलीत मला वाटते आम्ही ३ किंवा ४ मुले होतो. मी शिव्या देतो म्हणून एके दिवशी मला व्हरांड्यातल्या एका खांबाला बांधून ठवले! जाणारी येणारी मुले माझ्याकडे बघून हसत होती.

मी रागाने भरपूर शिव्या देत राहिलो. कुणीच लक्ष देत नव्हते. शेवटी रडून पाहिले. मला सोडा मी पुन्हा शिव्या देणार नाही असेही बोललो पण काहीच परिणाम झाला नाही. शेवटी कंटाळून कधी सोडतात याची वाट पाहत राहिलो.

काही वेळाने मला सोडले. मी मात्र काही झाले तरी आज रात्री पळून जायचे ठरवले. संध्याकाळी मुले जेवायला गेली तेव्हा बराकीत कुणीच नव्हते. ही वेळ योग्य आहे म्हणून मी माझी सतरंजी, पांघरून आणि दप्तर घेतले, वळकटी केली आणि अंधार पडायला लागला असे बघून हळूच गेटकडे जायला लागलो. पहारेकरी होते त्यांच्या दुसऱ्या बाजूने मी जात होतो. तो त्यांच्यापैकी कुणीतरी मला बघितले व पकडून ठेवले. मी पळून जात आहे मला सोडा असे सांगून बघितले पण काही उपयोग झाला नाही! व्यवस्थापक का कुणीतरी आले. माझी चौकशी केली. मी का पळून जात आहे तेही विचारले.

आणखी काहीजण आले.

तेव्हड्यात कुणीतरी म्हणाले अरे याची आई इथेच विधवा वसतीगृहात आहे. माझ्या आईला बोलावले. ती आली. मला परत खोलीत घेऊन आली. माझी समजूत काढून म्हणाली थोडे दिवस थांब मी मामाला बोलावून तुला परत घेऊन जायला सांगते. त्याप्रमाणे काही दिवसांनी मामा आला व माझी सुटका झाली.

पण एक गोष्ट मात्र झाली. मी त्यानंतर आयुष्यात परत कधीही शिव्या दिल्या नाहीत!

(माझी आई आश्रमात होती एवढेच मला कळत होते. तिचा सहवास कधीच न लाभल्यामुळे तिच्याविषयी मला विशेष काही वाटत नव्हते! आईची आई - माझी आजी हीच माझी आई होती.)

१९४६ साली आम्ही मुंबईत आलो. मामा आधीच इथे होते. आई सेकंडरी ट्रेंड शिक्षिका होऊन आली आणि मराठा मंदिर या संस्थेत शिक्षिका म्हणून रुजू झाली.

## घोटी - इगतपुरीजवळचे एक गाव.

आमचे तेव्हाचे खेडे आता चांगले छोटेसे शहर झाले आहे. मुंबईहून नाशिकला जाताना इगतपुरी नंतर येणारे गाव 'घोटी बुद्रुक'. या गावातल्या शाळेत आजोबा हेडमास्तर होते.

गावाच्या एका बाजूला नदी व दुसऱ्या बाजूला एक टेकडी होती. आता ती टेकडी भुईसपाट करून तिच्या बरोबरमधून एक्स्प्रेस हायवे गेला आहे! ज्या कोणाच्या सुपीक डोक्यातून ही छोटीशी टेकडी तोडायची कल्पना आली त्याचे कौतुक करायला हवे. कारण टेकडीला वळसा घालून सहज रस्ता नेता आला असता! पण मग टेकडीतले दगड फुकट सरकारी पैशाने मिळाले नसते

उन्हाळ्यात नदीवर पाणी भरायला जायचे म्हणजे वाळवंटात भरपूर खेळायला मिळायचे. कारण नदी कोरडीठाक असायची. वाळूत खड्डे खणून त्यात जमणारे पाणी भरायचे. २-३ तास लागायचे.

कधीतरी जाऊन गाव बघावे म्हणून १० वर्षांचा असताना सोडलेले गाव ६५ वर्षानंतर बघायला गेलो. जातानाच इतक्या इमारती, दुकाने बघून वाटले आता सारे पार बदलेले दिसते आहे. तरी पण शेवटचा प्रयत्न म्हणून तिथल्याच एका मुलास विचारले 'जुने' मारुतीचे मंदिर कुठे आहे. तो उत्साहाने दाखवायला आला आणि काही मिनिटातच मारुतीच्या मंदिरापुढे येऊन थांबलो.

खाली उतरून बघितले तर माझ्या अंगावर रोमांच उठले. अगदी जसेच्या तसे, ६५ वर्षांपूर्वीचे गाव समोर दिसत होते. तेच रस्ते, तीच घरे आता आणखीनच जुनी झालेली!

मंदिरात गेलो तर धक्काच बसला. जुनी मूर्ती बाजूलासारून त्याजागी नवी मूर्ती बसवली होती! दोन्ही मूर्ती शेजारी शेजारी बघून मन विषण्ण झाले.

आम्ही राहता असलेले घरही जसेच्या तसेच होते पण मोडकळीला आलेले!


सांगायचे म्हणजे ६५ वर्षांपूर्वी या छोट्याशा गावात मारवाडी / गुजराती लोकांची फार मोठ्या प्रमाणात वस्ती होती. सगळी दुकाने किराणा मालापासून ते कपडेलत्ते, सोनाराची, सावकारांची अशी गर्दी होती. आम्ही २-३ घरे बदललेली आठवतात. ती सगळी मारवाडी लोकांची होती. ते मालक आम्ही बिऱ्हाडकरु!

आज ६५ वर्षानंतर त्या लोकांनी नवी घोटी वसवली आहे. त्यामुळे जुनी आहे तशीच आहे. कळकट मळकट मजुरांची, कामकऱ्यांची, दारिद्र्यात खितपत पडलेली!

या ६०-७० वर्षात आमचे लोक काहीच शिकले नाहीत का ?



आम्ही राहत होते ते घर !



## आजोबांची आठवण -

निवृत्त झाल्यावर आजोबा वेळ जावा म्हणून भिक्षुकी करू लागले. ते सत्यनारायण पूजा सांगायला आजूबाजूच्या भागात जाऊ लागले. हे माझ्या मोठ्या मामाला आवडत नसे.

पण आजोबा पूजा सांगायला जायचे, दक्षिणा मात्र घ्यायचे नाहीत. इतकेच काय देवापुढे जमलेले पैसे, फळे नारळ वगैरे पण तिथल्या लोकांमध्ये वाटून टाकीत असत. त्यामुळे पंचक्रोशीत तेच भटजी हवेत म्हणून लोक त्यांनाच बोलावीत! असा भटजी कुठे मिळणार ?

पुढे जेव्हा म.गांधींचा खून झाला तेव्हा अनेक ब्राह्मणांवर हल्ले झाले. काहीना मारहाण झाली. आणि अनेकांना पोलिसांनी पकडून नेले.

आम्हालाही भीत वाटत होती. पण आजूबाजूच्या लोकांना जेव्हा कळले तेव्हा ते आपणहून पुढे आले आणि त्यांनी २४ तास आमच्या चाळीत पहारा ठेवला.

आमच्या केसालाही धक्का लावू देणार नाही असे ठासून सांगितले. आणि तसेच झाले. आम्हाला कसलाही त्रास झाला नाही.

आपल्या स्वभावाने आजोबांनी लोकांची मने जिंकून घेतली होती. त्यांचा स्वभावच दुसऱ्याना समजून घेण्याचा, मदत करण्याचा होता.

त्यांचे निधन झाले तेव्हा ते नायर हॉस्पिटलमध्ये होते. संध्याकाळ झाली होती तेव्हा दुसरे दिवशी जवळच्याच मरीन लाईन्स येथील स्मशानभूमीत न्यायचे ठरले. आम्ही पोचलो तेव्हा सारी स्मशानभूमी माणसांनी भरून गेली होती. पंचक्रोशीतील लोक आले होते. आजोबांची लोकप्रियता बघून माझे अंत:करण भरून आले.

आजोबा धार्मिक असले तरी कर्मकांड, रूढी परंपरा यांना फार महत्व देत नसत. आधुनिक विचारांचे होते. सोय महत्वाची. गोष्टी वेल्हाळ होते. गोष्टी सांगताना रंगून जात, आणि आम्हालाही खिळवून ठेवीत.

==================

माझ्या शाळा, कॉलेज जीवनात विशेष काही झाले नाही. कॉलेजतर नोकरी करून करीत होतो. त्यामुळे कॉलेजमध्ये मुले धमाल करीत असत हे फक्त ऐकून माहित होते!

शाळेत मात्र असंख्य गमतीशीर गोष्टी घडत असत. त्याची ही झलक!

संस्कृतची आम्हा मुलांना भीती वाटत असे. कारण ते संधी प्रकरण. एकाला एक  शब्द जोडून भला मोठा  शब्द तयार होत असे. असे ते का करीत कळत नव्हते. मुलांना अर्थ लवकर कळू नये हा उद्देश असावा!

त्या धसक्याने माझ्या बाकावरच्या एका मुलाने एक साधा शब्द असा तोडून वाचला. जन + कत + नया! आणि वर्गात एकच हशा पिकला. त्याला कळेना काय झाले ते. शिक्षकही, एरवी गंभीर चेहऱ्याने शिकवणारे, त्या दिवशी पहिल्यांदाच इतके हसताना बघितले. शब्द होता जनक + तनया = सीता!

पण त्याला काय नावे ठेवणार! मीही एकदा असाच हशा पिकवला होता. मला अचानक श्लोक वाचून अर्थ विचारला. मला शरीर आणि मन वेगळे करायची कला अवगत होती. तेव्हा भानावर आलो आणि शेजाऱ्याला विचारले काय करायचे ? त्याने श्लोक दाखवला आणि अर्थ सांग असे हळूच सांगितले. तो बहुतेच राजा दिलीप-सिंह-संवाद असा असावा. त्यात आठवते त्याप्रमाणे लिहिले होते अयम 'देवदारो: रक्षणार्थम' हा सिंह इथे ठेवला आहे. मला 'देव' कळला 'दारा' म्हणजे बायको हेही कळले. मी ठोकून दिले, "देवांच्या बायकांचे रक्षण करण्यासाठी या सिंहाला येथे ठेवले आहे. आणि वर्गात एकच हशा पिकला. शिक्षकही हसू आवरू शकले नाहीत!

एका 'इनोसंट' मुलाने एकदा हातवर करून 'नितंब' या शब्दाचा अर्थ विचारला. आम्ही सगळे आता काय होणार या काळजीत होते. पण सरांनी तितक्याच शांतपणे उत्तर दिले, " ढुंगण, कुल्ले ".

==============================================

आज मी अनुभवलेल्या, तीन अतिशय महत्वाच्या घटनांची नोंद करणार आहे. त्यावेळेस माझे वय होते ११-१२ वर्षे.

या तीनही घटनांमध्ये मुंबईचे जन-जीवन एक नाही दोन नाही तर सलग ३-४ दिवस बंद पडले होते! आणि तेही फक्त काही महिन्यांच्या फरकाने.

कारणे मात्र अगदी भिन्न होती!


सकाळ
दीडशे वर्षांची गुलामगिरी संपून हिंदुस्थान स्वतंत्र झाला. दिल्लीत झालेली अपूर्व रक्तहीन क्रांति


The Times of India
BIRTH OF INDIA'S FREEDOM
NATION WAKES TO NEW LIFE
Mr. Nehru Calls For Big Effort From People
"INCESSANT STRIVING TASK OF FUTURE"
LORD MOUNTBATTEN GREETS PAKISTAN
FRENZIED ENTHUSIASM IN BOMBAY
Crowds In Festive Mood

१) १५ ऑगस्ट १९४७ : स्वातंत्र्यदिन - ज्या दिवसाची सारे देशवासी अत्यंत आतुरतेने डोळयात प्राण आणून वाट पाहत होते.

न भूतो न भविष्यती असा हा आंनद सोहळा, उत्साह, उन्माद पाहायला मिळाला. रात्री बारा नंतर मुंबईत लोक बेभान होऊन रस्त्यावर उतरली होती. जल्लोष चालू होता. नाचत, गात रात्रभर हिंडत, घोषणा देत मौजमजा करीत होती. लोकल ट्रेंन्स, बसेस आणि ट्रामही चालू होत्या. कुणी तिकीट काढत नव्हते, कुणी तिकीट विचारतही नव्हते. ट्रक्समधून लोक घोषणा देत, गाणी म्हणत, नाचत होते. हॉटेल्समधे जा खा, प्या पैसे द्यावे लागत नव्हते.

फेरीवाल्यांनी तर आपला सगळा माल केव्हाच वाटून टाकला होता. आणि ते जल्लोषात सामील झाले होते. लोक एकमेकांना शुभेच्छा देत होते. वंदेमातरमच्या घोषणा, नेत्यांच्या नावाचा जयजयकार करत होते.

मुंबईत रोषणाई केली होती. २-३ दिवस हा उत्सव साजरा केला गेला. शाळेतही हेच उत्सवाचे वातावरण होते.

लोकांना काय करू अन काय नको असे झाले होते. अनेक शतकानंतर असे स्वातंत्र्य पहिल्यांदाच अनुभवयास मिळत होते.

=================

२) ३० जानेवारी १९४८ : म.गांधींचा खून. साऱ्या देशावर शोककळा पसरविणारी घटना. संध्याकाळची वेळ होती. ही बातमी पसरली आणि सगळे लोक रस्त्यावर जमा होऊन काही आणखी माहिती मिळते का ते बघत होते. रडियोवर बातम्या सांगितल्या जात होत्या. बातम्या मिळवण्याचे तेच एकमेव साधन होते. (त्याकाळी रडियो ही सुद्धा दुर्मिळ गोष्ट होती.)

दुसरे दिवशी वर्तमानपत्रातून माहिती मिळाली. पण खून कुणी केला ते स्पष्ट होत नव्हते. तिसरे दिवशी नक्की बातमी आली की एका ब्राह्मणाने हा खून केला आहे. आणि सारा महाराष्ट्र ढवळून निघाला. मुंबई बंद झाली. महाराष्ट्र बंद झाला.

सर्वत्र ब्राह्मणांवर हल्ले सुरु झाले! जे गांधीवादी ब्राह्मण होते त्यांनाही सोडले नाही! याचा अर्थ स्पष्ट होता की शतकानूशतके, पिढ्यानपिढ्या जो अन्याय सहन करायला लागला होता त्याचा राग बाहेर पडत होता. त्याचा संबंध गांधीचा खून झाला यापेक्षा तो एका ब्राह्मणाने केला याच्याशी जास्त होता!

हा राग अनेक दिवस धुमसत होता. अनेक ब्राह्मणांची धरपकड झाली. आमची शाळा २-३ महिने शिक्षक नाही म्हणून बंद होती. पार्ल्यातल्या काही संस्था ६ महिने बंद होत्या. तापलेले वातावरण शांत व्हायला काही महिने जावे लागले.

====================

३) २१-२२ नोव्हेंबर १९४८ : मुंबईत चक्रीवादळ. निसर्गाचे रौद्ररूप.

ताशी १०० मैल वेगाने वारे वाहत होते. २४ तासात ५ इंच पावसाची नोंद झाली होती. रात्रीची वेळ त्यामुळे आणखीनच भयानक वाटत होते. आमच्या चाळीतल्या काही घरांची कौले उडून गेली होती. सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले होते. लोक जीव मुठीत धरून वादळ थांबण्यासाठी देवाची प्रार्थना करीत होते. पहाटेच्या सुमारास वारे कमी झाले. सकाळ झाली. लोक बाहेर पडून अंदाज घेत होते.

रस्तोरस्ती मोठमोठी झाडे उन्मळून पडली होती. रल्वेच्या ओव्हर हेड वायर्स ठिकठिकाणी तुटल्या होत्या. लोकलची वाहतूक पूर्ण ठप्प झाली होती. मुंबई शहरात काय झाले असेल याचे तर्कवितर्क सुरु होते. कारण कुणी कुठे बाहेर जाऊच शकत नव्हते. ऑफिसेस बंद होती. दुसरे दिवशीच नाही तर ३-४ दिवस वर्तमानपत्रे देखील मिळत नव्हती. वीज गायब होती.

मुंबई शहराशी संपर्क तुटला होता. मुंबई अक्षरश: बंद होती. पुन्हा असे कधी घडले नाही.

==================================================

जग सुंदर आहे, जीवन सुंदर आहे. पण ते निर्भेळ सुंदर नाही. त्यात अनेक नकारात्मक गोष्टीही आहेत. त्यातून आपल्या वाट्याला काय येईल ते बरेचदा नशिबावर / परिस्थितीवर अवलंबून असते. परिस्थितीशी कसे जळवून घ्यायचे ते आधी शिकायला हवे.

आपल्याला मिळालेले जीवन होता होईल तेवढे आनंदाने, सुखाने जगायचा प्रयत्न करणे एवढेच आपल्या हातात असते.

सकारात्मक दृष्टीने आपण बघितले पाहिजे. निर्णय चुकतात, चुकीची शिक्षा भोगावी लागते. याचेही भान ठेवायला हवे. चुका होऊ नयेत याची काळजी घ्यायला हवी. सगळेच काही मनासारखे होणे शक्य नाही.

## मराठी माध्यम -



## माझी शाळा - पार्ले टिळक विद्यालय

मी मराठी माध्यमातून शिकलो. आमच्यावेळेला बहुसंख्य मराठी मुले मराठी माध्यमातूनच शिकायची. काही श्रीमंत लोक त्यांच्या मुलांना इंग्रजी Convent शाळेत किंवा Public Schoolमध्ये ठेवीत असत.

मी १९५४ साली SSC - (त्यावेळेची अकरावी) पास झालो. आमच्या वेळेला शिक्षण खात्याला काय लहर आली माहित नाही पण त्यांच्या योजनेप्रमाणे शाळेने आम्हाला इंग्रजी हा विषय मराठीतून शिकवला! प्रश्न पडला ना ?

आम्हाला इंग्रजी आद्याक्षरांची ओळख मराठीतून करून दिली. म्हणजे असे ABCDEFG असे न म्हणता अॅ ब क ड ए फ ग असे शिकवले!

a = नीट बघा, खाली Apple आहे आणि वर त्याचा देठ दिसतोय ना ?, मग हे अक्षर अॅपलचा = अॅ

b = बघा बटाटा आणि त्याच्या बाजूला सुरी म्हणून बटाट्याचा = ब

c = सोपे आहे. हातातले 'कडे' दिसते आहे ना ? म्हणून कड्याचा = क

e = कानातले इयर रिंग म्हणून इयरिंग चा = ई

f - फणीतला = फ

g - गणपतीची सोंड म्हणून गणपतीचा = ग वगैरे वगैरे.

स्पेलिंग सांगताना क+अ‍ॅ+ट = कॅट

ब+अ‍ॅ+ट = बॅट

लेसन शब्दाचे स्पेलिंग असे सांगायचो = ल इ स स ऑ न! पुढे Teacher असे शब्द आले आणि पुरती भंबेरी उडाली! इंग्रजीची वाट लागली!

त्याकाळी कनिष्ठ मध्यमवर्गातील मुले कॉमर्सला जायची. मीही तेच केले. आणि इंग्रजी लिहिता येत नाही, समजत नाही म्हणून इंटर कॉमर्सला चक्क नापास झालो!

# शाळेतले किस्से -

शाळेचा विषय निघाला आहे तर काही किस्से सांगून पुढे जातो.

'पुलं' ज्या शाळेत शिकले त्याच शाळेत शिकायचे भाग्य मलाही मिळाले. त्यामुळे ' बिगरी ते मॅट्रिक' मधे वर्णन केलेले काही असामी येथे भेटले. चपला विसरणारे मास्तर वगैरे. आम्हाला संस्कृत आणि इंग्रजी शिकवणारे मास्तर एकच होते. त्यांचा उच्चारांवर फार कटाक्ष होता. बॉयीझ आणि गर्ल्स मधल्या बॉयीझ शब्द म्हणताना जीभ 'झणझणली' पाहिजे म्हणायचे! Walked आणि Looked हे शब्द उच्चारताना 'वाक्ड' आणि 'लूक्ड' मधल्या ड चा उच्चार पूर्ण जोर देऊन म्हंटला पाहिजे यावर त्यांचा भर होता!

आमच्या वर्गात (त्याला काय दुर्बुद्धी सुचली देव जाणे!) एक Convent मधे शिकणारा मुलगा आला. वर्गात आम्हा ' फाडफाड' मराठी बोलणाऱ्या मुलांत तो बिचारा बुजला असावा! जाऊन कोपऱ्यात बसला. मास्तरांनी त्यालाच पकडले आणि कविता वाचायला सांगितली. त्याचे दुर्दैव असे की त्याला नेमकी 'Work while you work' कविता आली. त्याने सुरुवात केली 'वक व्हाइल यु वक'. झाले, मास्तरांचे पित्त खवळले! त्यांनी त्याची जीभ वाकडी होई पर्यंत त्याच्याकडून वर्क, वर्क, क वर जोर देत म्हणवून घेतले!

==========

मी 'फ्लोरा फौंटन' ला सिद्धार्थ कॉलेजमधे प्रवेश घेतला. तिथे आम्हाला शिकवायला प्रा. कवयित्री शांता शेळके, प्रा. अनंत काणेकर, प्रा. रा. भि. जोशी, प्रा. रमेश तेंडूलकर असे दिग्गज होते.

शान्ताबाई शिकवायला आल्या की त्यांना इंग्रजी चित्रपटांच्या कथा सांगायचा आग्रह व्हायचा आणि त्याही फार आढेवेढे न घेता, डोक्यावरचा पदर सावरीत, कथेत गुंगवून टाकीत असत. ‘मोहिनी’मध्ये 'हिरव्या चादरीवर' हे सदर खूप लोकप्रिय होते. "शांताबाई इंग्रजी चित्रपटांची कथानकं अत्यंत रसाळ शैलीत लिहायच्या. जणू त्या परदेशी कथा नव्हत्याच. स्वत: लेखिकेच्या वाटाव्या अशा त्या खूप प्रभावी दीर्घकथा वाचताना मनाची पकड घ्यायच्या" इति सुधीर मोघे.

प्रा. काणेकरसरांना साहित्यिक गप्पा मारायला फार आवडायचे. ते सांगायचे अभ्यास गाईडमधून करा! पण मी सांगतो ते तुम्हाला कुठे ऐकायला मिळणार नाही. आणि ते खरेच होते. त्यांचे बोलणे ऐकत राहावे असे वाटे.

दोन वर्षे कशी गेली कळलेच नाही. मी इंटर कॉमर्स परीक्षेत नापास झालो! फार मोठा धक्का बसला. एक वर्ष फुकट गेले. कशातच मन रमत नव्हते. पुढे शिकावे असेही वाटेना! असेच सहा महिने गेले.

# एअर इंडियात कायमस्वरूपी नोकरी -

पुढे ओळखीने एअर इंडियात कायम नोकरी मिळाली. ४ जानेवारी १९५७. पगार बेसिक रु.८० + महागाई भत्ता रु.६५ असे एकूण रु.१४५ पगारवर Dispatch क्लार्क म्हणून रुजू झालो. प्रा.फंड वगैरे वजा जाता रु.१२८ take home salary. त्याकाळी हेही भारी वाटले.

मी माझ्या इंग्रजीबद्दल लिहिले आहेच. बोलता यायचे नाही. आणि ऑफिसमधे इंग्रजी माध्यमातले सहकारी 'फाडफाड' इंग्रजी बोलायचे. त्यामुळे माझ्यात फार मोठा न्यूनगंड निर्माण झाला होता. आपले इंग्रजी सुधारावे, चांगले बोलता यावे म्हणून मी खास प्रयत्न केले.

१) माझा एक ख्रिश्चन मित्र पार्ल्यातच राहायचा. लोकलने रोज बरोबर जात होतो त्याला इंग्रजी बोलायला शिकव अशी विनंती केली आणि त्याने खूप मदत केली.

२) त्याकाळी Earle Stanley Gardner च्या 'Perry Mason' या पात्राच्या रहस्यकथा फार लोकप्रिय होत्या. कुणीतरी सांगितले त्यातले कोर्टातले 'सीन' वाच. तेथे संवाद असतात. त्यातून मी खूप काही शिकलो. आश्चर्य वाटेल पण मी एकदाही एकही कादंबरी पूर्ण वाचली नाही. 'कोर्ट सीन' मधले संवाद मात्र पाठ केले होते.

३) दररोज मराठी आणि त्याच मालकाचे इंग्रजी अशी दोन वृत्तपत्रे घ्यायचो. उदा: TOI आणि महाराष्ट्र टाइम्स. आधी मराठी वाचून त्याच बातम्या इंग्रजीत कशा दिल्या जायच्या ते बघायचो. याचाही फार फायदा झाला.

४) ऑफिसमधले पत्रव्यवहार बारकाईने वाचायचो. Dispatch ला असल्यामुळे हे सहज शक्य होते.

## Air India - CHQ (Commercial Headquarters) -

मी एअर इंडियात नोकरीला लागलो ते Dispatch Section मध्ये. कमर्शियल हेडक्वार्टर असल्यामुळे परदेशातून पत्रे यायची. खूप छान छान तिकिटे लावलेली असायची. ती घ्यायला सूटबूटवाले ऑफिसर्स यायचे. मला भाव द्यायचे. मीही खुश होऊन त्यांना तिकिटे काढून द्यायचो. काही दिवसांनी मला माझ्या एका सहकाऱ्याने सांगितले अरे ही तिकिटे तू अशी कोणाला देत जाऊ नकोस. तू स्वत: जमव. फार मोठा छंद आहे हा.

तोपर्यंत मला काही कल्पना नव्हती. मग मी स्वत:च तिकिटे जमवायला सुरुवात केली. बऱ्यापैकी तिकिटे जमल्यावर एके दिवशी एका मोठ्या वहीत चिटकवावीत म्हणून बाजारातून गमची बाटली आणली आणि रात्री जागून ती तिकिटे चिटकवून टाकली. सकाळी गर्दीत बघितली नाहीत.

अनुभवाने शहाणे होणे कधी कधी फार महागात पडते!

रात्री काढून बघितली आणि मला धक्काच बसला. सगळ्या तिकिटांवर गम लावलेल्या जागी डाग पडून तिथला रंग निघून गेला होता! सगळी तिकिटे फुकट गेली होती!

दुसरे दिवशी मित्राला सांगितले तर त्याने कपाळाला हात लावला. म्हणाला, " अरे शहाण्या, त्यासाठी खास पेस्ट मिळते. सिंथेटिक ग्लू चालत नाही.

मी नवा धडा शिकलो. आधी या छंदाची माहिती घेऊन मगच कृती करायला पाहिजे होती.

पण त्यानंतर मात्र छंद नीट जोपासला. आता गेली कित्येक वर्षे फिलाटेलीचा मेंबर आहे. त्यामुळे पाकिटे, तिकिटे घरपोच मिळतात. दोघा-तिघांनी त्यांचे संग्रह मला दिल्यामुळे माझा संग्रह मोठा झाला.

हा माझा आयुष्यातला पहिला छंद. त्या नंतर आयुष्यात अनेक छंद जोपासले.

छंदांमुळे आयुष्याला चांगले वळण मिळते हा माझा अनुभव आहे. म्हातारपणी आजारपणात छंदच उपयोगी पडतात. हे मी नाही तर माझे न्युरो सर्जन सांगत असत.

२) मला वाचनाची आवड शाळेत असल्यापासूनच होती. नाथमाधवांच्या जाड जाड कादंबऱ्या वाचताना भान हरपून जायचे. वीरधवल, सावळया तांडेल, सोनेरी टोळी आणि स्वराज्यावरच्या अनेक कादंबऱ्या वाचलेल्या आठवतात. हरी नारायण आपटे, वि. स. खांडेकर, ना. सि. फडके यांच्या कादंबऱ्याही वाचायचो.

पण कविता वाचन हे मात्र अगदी आवडीने करायचो. कवितेच्या पुस्तकांचे एक बरे असते. कुठेचेही पान काढून वाचावे. मागचा पुढचा संदर्भ बघावा लागत नाही. कविता कधी शिळया होत नाहीत. दर वेळी वाचताना आनंदच देतात. कितीही वेळा वाचा. आता तर ३० वर्षांपूर्वीचे संग्रह काढून वाचत बसतो. कितीतरी कविता नव्याने वाचत आहे असे वाटते. आता काही नवा अर्थ जाणवतो!

मी दरवर्षी पुस्तक प्रदर्शनभरले की ४-५ कविता संग्रह घ्यायचोच. वर्षभरात अनेक पारायणे व्हायची. पुन्हा नवीन वर्षात नवीन संग्रह. असे करत आज माझ्याकडे तीनशेच्या वर संग्रह आहेत.

३) एव्हिएशनचा इतिहास -

मी नोकरीला लागल्यापासून मला विमानांविषयी खूप उत्सुकता होती. त्यामुळे जी जी माहिती / चित्रे मिळतील ती ती जमा करत गेलो. कामामुळे त्याकडे लक्ष देता आले नाही. पण निवृत्त झाल्यावर याच विषयावर तीन पुस्तके लिहिली. पहिले एअर इंडियाचा इतिहास, दुसरे जागतिक हवाई वाहतुकीचा इतिहास, तिसरे

एव्हिएशन क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींची ओळख आणि शेवटचे ई-बुक 'पंख' २ भाग. शिवाय धर्मग्रंथांची ओळख अशी पुस्तके लिहिली. तिसरे पुस्तक 'आता वंदू कवीश्वर'.

( www.esahity.com )

४) ओरिगामी हा विषय नव्यानेच निवृत्त झाल्यावर शिकलो. या छंदाने माझे निवृत्तीचे जीवन व्यापले गेले. पार बदलून गेले.

५) इंग्रजी कविता! माझ्या आयुष्यातला हा एक चमत्कार! निवृत्तीनंतर घडलेला.

६) वृत्तपत्रात स्तंभ लेखन, स्फुट लेखन, पत्रे.

७) समाजसेवा - मन रमले नाही!

# एअर इंडियात काम - आठवणी -

आम्ही एअर इंडियात काम करत होतो ते एक भारावलेल्या जिद्दीने. तिथे 'जॉब फंक्शन्स' नावाचा प्रकार नव्हता. पडेल ते काम किंवा सांगतील ते काम मनापासून करायचे एवढेच माहित होते. त्याचा पगाराशी किंवा हुद्याशीही काही संबंध नव्हता. काही अपवाद वगळले तर कुणी बॉस नव्हते आणि कुणी कनिष्ठ नव्हते.

काम करणाराचे कौतुक व्हायचे. प्रमोशन्सही काम बघून दिली जायची. वशिलेबाजी नव्हती. भ्रष्टाचारही नव्हता. त्यामुळे प्रमोशन्सचा निर्णय सगळयांना मान्य असायचा.

युनियन्सचे अस्तित्व अजून उदयाला यायचे होते!

आमच्या वेळेला ओव्हरटाईम हा प्रकार नव्हता. दिवसाचे नेमून दिलेले काम पूर्ण केल्याखेरीज घरी जाता येत नसे. आणि जे उशिरा बसून काम करीत त्यांना दुसरे दिवशी वार्निंग मिळत असे की तुम्ही तुमच्या कामात फार आळशी आहात, वेळेत काम पूर्ण करायला शिका. त्यावरच तुमचे भवितव्य अवलंबून आहे!

साठ वर्षांपूर्वीचा काळ आणि नंतरचा काळ यात खूप फरक झालेला जाणवला. जीवनमूल्येच बदललीत की काय असे वाटले.

नंतरच्या काळात, ओव्हरटाईम मिळावा म्हणून काम पेंडिंग ठेवीत असत! हे एका कमिटीचे निरीक्षण होते!

========

आमचे ऑफिस फोर्टमधे बँक ऑफ इंडियाच्या इमारतीत ४ थ्या मजल्यावर होते. तेथे मी ८ वर्षे नोकरी केली आणि नंतर एअरपोर्टला बदली करून

घेतली. या काळात तेथे तीन मोठ्या घटना घडल्या. आणि त्या तीनही घटना मला जवळून पाहायला मिळाल्या हे विशेष.

आमच्या ऑफिसची बिल्डींग मुंबई हायकोर्टाच्या पाठीमागच्या बाजूला होती. मधे फक्त एक लहान रस्ता होता. आमच्या बिल्डींगच्या छोटाश्या गच्चीतून हायकोर्टात जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या हालचाली दिसत असत.

# नानावटी केस -





## १) कमांडर नानावटीचा मुंबई हादरवून टाकणारा खटला (1959).

नानावटीने खून केला होता. त्याची केस चालू असताना कोर्टात आणताना आम्ही मुद्दाम त्याला पाहायला गच्चीत यायचो. पोलिसांच्या ताब्यात न देता नेव्हीने त्याला त्यांच्याच ताब्यात ठेवले होते. तो फुल युनिफॉर्ममधे यायचा. मागेपुढे नेव्हीच्या गाड्यांचा ताफा असायच्या. लोकांच्या दृष्टीने तो हिरोच होता. त्याला बघायला प्रचंड गर्दी उसळत असे. ज्या दिवशी त्याच्या केसचा निकाल होता त्या दिवशी तर हायकोर्टाचे आवार, ती गल्ली इतकेच काय पण संपूर्ण फ्लोरा फौंटन माणसांनी गजबजून गेले होते. वाहतून ठप्प झाली होती. संध्याकाळी ४ वाजेपासून गर्दी होत होती. ७ वाजले तरी ज्युरींचा निकाल येत नव्हता. उत्सुकता प्रचंड वाढली होती. या केसचा मुंबईत खूप गवगवा झाला होता. जिथे जाल तिथे हाच विषय.

शेवटी ज्युरींनी आठ विरुद्ध एक अशा बहुमताने ‘Not guilty’ म्हणून जाहीर केले. लोकांनी मोठा जल्लोष केला. नानावटी झिंदाबादच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

कोर्टरूममधे पण आनंदाने घोषणा दिल्या जात असतानाच जज्ज मेहतांनी जाहीर केले की ज्युरींचा निर्णय चुकीचा (perverse) आहे. त्यामुळे मी ही केस

मुंबई हायकोर्टाकडे पाठवीत आहे. या नंतर ज्युरी नेमण्याची पद्धत बंद करण्यात आली!

माझ्या एका मित्राने त्यावेळच्या ब्लिट्झच्या अंकातले उतारेच्या उतारे पाठवले होते. त्याच्या आधारे मी चक्क ती १००% खरी गोष्ट जशीच्या तशी लिहून काढली. ती स्वतंत्रपणे .pdf form मध्ये तयार केली आहे.

या प्रेमाच्या शोकांतिकेवर १९६३ साली 'ये रास्ते है प्यार के', १९७३ मधे 'अचानक' आणि अलीकडे २०१६ मधे 'रुस्तम' अशा हिंदी फिल्म्स रिलीज झाल्या.



२) ऐतिहासिक घटना म्हणजे संयुक्त महाराष्ट्र व्हावा म्हणून निघालेल्या मोर्चावर फ्लोराफाऊंटन येथे गोळीबार होऊन त्यात १०5 हुतात्मे झाले. ते थरारनाट्य –(January 1960)

संयक्त महाराष्ट्र चळवळ जोरात होती. ज्या दिवशी मोर्चा निघाला होता त्या दिवशी संध्याकाळी मुंबई राज्याचे मुख्य मंत्री मोरारजी देसाईं यांच्या आदेशाने मोर्चेकऱ्यांवर गोळीबार केला गेला आणि त्यात १०५ मोर्चेकरी हुतात्मे झाले. या घटनेनंतर मोरारजींच्या जागी यशवंतराव चव्हाण यांची मुख्यमंत्री म्हणून नेमणूक झाली.

ही घटना घडली तेव्हा मी फ्लोरा फौंटनला असलेल्या आनंद भवनमधल्या सिद्धार्थ कॉलेजच्या इमारतीत होतो. गोळीबार झाल्याचे आवाज येताच आम्ही खाली धाव घेतली पण आधीच पोलीस बंदोबस्त होता. कोणालाही बाहेर पडू देत नव्हते. जवळ जवळ दोन तासांनी बाहेर काढले व शिस्तीत रस्त्याच्या एका बाजूने चर्चगेटला जाऊ दिले. दुसरीकडे कुठेच फिरकू देत नव्हते. नक्की काय झाले ते दुसरे दिवशी वर्तमानपत्रातून कळले!



'माधव काझी' या एकेकाळच्या अत्यंत गाजलेल्या सत्यकथेवर आधारित 'तो मी नव्हेच' हे आचार्य अत्रेंचे नाटक प्रभाकर पणशीकरांच्या प्रमुख भूमिकेतून खूप गाजले.

३) 'तो मी नव्हेच' फेम माधव काझीचा आख्या महाराष्ट्रभर गाजलेला खटलाही याच सुमारास सेशन्स कोर्टात चालू होता.

ज्या घटनेवर आचार्य अत्रेंनी 'तो मी नव्हेच' हे नाटक लिहिले आणि ते प्रभाकर पणशीकरांच्या अभिनयाने खूप गाजले. तेथे काझीला बघायला खूप गर्दी व्हायची. मीही एकदा चंपुताई गोखले यांची उलटतपासणी चालू असताना बघायला गेलो होतो!

============================

## Sincerity - Punctuality - devotion

## आवड - नियमितपणा - निष्ठा

ऑफिसमधे एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे पुढे पुढे करणारे बोलघेवडे सहकारी, उशिरा येणे, वाटेल तेव्हा रजा घेणे आणि त्याहीपेक्षा काम पेंडिंग ठेवणे यातही वाकबगार होते!

मी नेमके ते हेरले आणि त्याचाच फायदा उठवला. मी कधीही उशिर केला नाही. नाईलाज असेल तरच रजा घ्यायचो आणि काम पेंडिंग ठेऊन कधीही घरी गेलो नाही. हळूहळू ही गोष्ट वरिष्ठांच्या लक्षात आली आणि मी एक 'Sincere, punctual आणि कामात up-to-date आहे असा त्यांना विश्वास वाटला.

याचा परिणाम मला 1964 साली 'Merit Award' मिळण्यात झाला. माझ्या परिश्रमांचे फळ मला मिळाले.

मेरीट अवार्डची पार्टी - फक्त अवार्ड मिळालेले आणि त्या विभागातले कर्मचारी. कंपनी किती साधेपणाने राहत होती. पैशाचा अपव्यय नाही!





5th from left

Graduate होणे महत्वाचे होते कारण ऑफिसर व्हायचे असेल तर तेवढे Qualification आवश्यक होते. कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा म्हणजे ऑफिसला उशिरा यावे लागणार होते. ऑफिसकडे अर्ज केला आणि त्यांनी परवानगी दिली. अट एकच जितके उशिरा येईन तितके लेट बसायचे!

मी KC Collegeला अडमिशन घेतली. तेही कॉलेज ओव्हल मैदान ओलांडले की लागलीच रस्त्याला लागून होते. तेथे एक बरे होते. काहीही कन्सेशन्स पाहिजे असतील तर पैसे भरले की लागलीच मिळत असत! इतकेच काय माझे कॉलेजचे Attendance चे दिवस कमी पडत होते. रु.२०० भरले आणि परवानगी मिळवली! मी एकदाचा Graduate झालो! माझा प्रमोशनचा मार्ग मोकळा झाला!

KC कॉलेजची एक आठवण मुद्दाम सांगण्यासारखी आहे. तिथे इतिहासाला प्रा. रा.वि. ओतूरकर हे प्रख्यात इतिहास तज्ज्ञ होते. माझ्यासारखे अनेक विद्यार्थी आमचा विषय नसला तरी त्यांच्या वर्गात त्यांचे लेक्चर ऐकायला जायचो. वर्ग गच्च भरलेला असायचा. मुले चुपचाप बसलेली. त्यांनी बोलायला सुरुवात केली ऐकत राहावे असे वाटे. इतिहासातले प्रसंग इतके खुलवून सांगत की प्रसंग डोळयापुढे उभे राहत असत.

मला एका गोष्टीचे फार आश्चर्य वाटे. एरवी क्लास बुडवून कॅन्टीनमधे गर्दी करणारे विद्यार्थी इथे इतके शांत बसून कसे ऐकू शकतात ? प्राध्यापक रटाळ शिकवीत असतील तर कॅन्टीनचा पर्याय असतोच!

****************************************

# माझा पहिला विमान प्रवास : मुंबई-दिल्ली-मुंबई -

त्यावेळी एअर इंडियाकडे Lockheed कंपनीची Super-constellation जातीची विमाने होती.

दिवसाचे विमान काही कारणामुळे उशिरा रात्री सुटणार होते त्यामुळे माझा अर्धा उत्साह मावळला होता! भीती वाटत होती! विमान सुटले. मुद्दाम खिडकीची जागा पकडली होती. पण बाहेर बघितले तर अंधार गुडूप! दिसले ते विमानाच्या पंखावरचे इंजिनचे दृश्य. त्यातून ज्वाळा बाहेर पडत होत्या. स्टोव्हचा बर्नर तापल्यावर जशा ज्वाळा दिसतात तशा दिसत होत्या. मला कधी एकदा यातून सुखरूप बाहेत पडू असे झाले! दिल्लीच्या वास्तव्यात देखील परतीच्या प्रवासाची काळजी करीत होतो! जेव्हा परत सुखरूप आलो तेव्हा सुटकेचा श्वास सोडला. आणि पुन्हा या वाटेला जायचे नाही असे ठरवले!

योगायोग असा की एअर इंडियाने ही सर्व Super-constellation विमाने बदलून बोईंग कंपनीची जेट B-707 जातीची विमाने खरेदी केली. हे विमान माझे अत्यंत आवडीचे विमान.

विमानांना नावे देण्यात खूप कल्पकता दिसली. अगदी सुरुवातीच्या Constellation विमानांना Princes, नंतरच्या विमानांना Ranee आणि त्यानंतरच्या Emperor अशी नावे दिली गेली.

Constellation - १) मलबार प्रिन्सेस, २) रजपूत प्रिन्सेस, ३) मुगल प्रिन्सेस, ४) मराठा प्रिन्सेस, ५) हिमालयन प्रिन्सेस, ६) बेंगाल प्रिन्सेस, ७) काश्मीर प्रिन्सेस.



Super-constellation १) रानी ऑफ झांसी, २) रानी ऑफ इंद, ३) रानी ऑफ चित्तोर, ४) रानी ऑफ अजंता, ५) रानी ऑफ एलोरा, ६) रानी ऑफ निलगिरीज, ७) रानी ऑफ आग्रा, ८) रानी ऑफ बिजापूर, ९) रानी ऑफ मदुराई १०) रानी ऑफ गोलकोंडा.



B-707 : हिमालयाच्या शिखरांची नावे : १) गौरीशंकर, २) नंदादेवी, ३) एव्हरेस्ट, ४) कांचनगंगा, ५) धवलगिरी, ६) नंगापरबत, ७) माकालू, ८) ल्होत्से, ९) अन्नपूर्णा, १०) कामेत, ११) त्रिशूल,




Jumbo Jets - B-747 : एम्परर - १) अशोक, २) शहाजहान, ३) राजेन्द्रचोला, ४) विक्रमादित्य, ५) अकबर, ६) चंद्रगुप्त, ७) कनिष्क, (हिमालय) ८) कृष्ण देव राया, ९)समुद्रगुप्त, १०) महेन्द्रवर्मन ११) हर्ष वर्धन

## Combi - 747 :




ह्या विमानाचे नाव शिवाजी आहे.

# लोकलचा जीवघेणा प्रवास

फोर्टमधल्या ऑफिसमध्ये मी ८ वर्षे नोकरी केली. नंतर एअरपोर्टवर बदलीसाठी हट्ट धरला याचे एकमेव कारण म्हणजे लोकलचा जीवघेणा प्रवास!

गर्दीत माझा जीव गुदमरायचा. डबाभर घामटवास, लोकांची बडबड, सिगारेट ओढण्यावर बंदी नव्हती म्हणून तो धूर, आणि वर नुसतेच जागच्याजागी फिरणारे पंखे. बसायचे लाकडी बाक, त्यांच्या फटीत दबा धरून बसलेले ढेकुण. मी बाकावर जागा असली तरी बसायचो नाही. मला इतरांपेक्षा जास्तच त्रास होत असावा!

आजच्या पिढीला ढेकुण हा इवलासा कीटक काय प्रतापी होता हे सांगून कळणार नाही! एक गाणे होते 'ढेकुण फार झाले म्हणून गेलो मी रानात, तेथे जाऊन पाहतो तो ढेकुण माझ्या कानात' असे बरेच मोठे गाणे होते.

इतकेच काय एक श्लोकही आठवतो. 'कमले कमला शेते, हर: शेते हिमालये, हरि:च क्षीराब्धौ शेते, मन्ये मत्कूण संशयात!'

अर्थ -" लक्ष्मी कमळात, शंकर हिमालय पर्वतावर आणि विष्णू समुद्रात का राहतात, तर जमिनीवरच्या ढेकणांच्या भीतीने!

थोड्क्यात काय तर लोकलचा प्रवास टाळावा म्हणून बदली करून घेण्याशिवाय मला पर्याय नव्हता! त्यानंतर कधीही लोकलच्या वाटेला गेलो नाही!

मी पार्ल्याला राहत असल्यामुळे एअरपोर्ट घरापासून चालत २०-२५ मिनिटावर होता. पुढे सहारला नवीन एअरपोर्ट बांधला तरी ऑटोमुळे १५ मिनिटात पोचत असे. उरलेली ३० वर्षे आरामात एअरपोर्टवर नोकरी केली.

या निमित्ताने काही वर्षानंतरचे दोन अनुभव आताच नोंदवीत आहे, कारण ते लोकल प्रवासाशी निगडीत आहेत.




१) मी ऑस्ट्रेलियातील पर्थ या शहरी गेलो होतो. रात्री टीव्हीवर जाहिरात बघितली की लोकलने आरामात प्रवास करा! माझी उत्सुकता चाळवली गेली. मित्राला म्हंटले उद्या सकाळी पहिले या लोकलने प्रवास करू! स्टेशन जवळच होते Bayswater. सकाळी तेथे पोचलो तर छोटेसे स्टेशन. सबंध स्टेशनवर फक्त एकच व्यक्ती, रेल्वेचा कर्मचारी. त्याच्याजवळून तिकिटे घेतली. गाडी आली. फक्त तीनच डबे! तीनही डबे पूर्ण रिकामे! आम्ही प्रवासीही फक्त तीनच! डब्यात बसायला सोफे, अगदी स्वच्छ! मी स्वप्नात तर नाहीना अशी शंका आली. जगाच्या

पाठीवर अशीही लोकल असते यावर विश्वास बसत नव्हता. राहून राहून मुंबईची लोकल डोळ्यासमोर येत होती!

२) टोकियो शहराला जाण्याचा योग आला. तिथला एअरपोर्ट नरिता (Narita) नावाच्या खेड्याजवळ आहे. या नावावरून त्या एअरपोर्टला नरिता एअरपोर्ट हे नाव दिले आहे. आणि ते आजही कायम आहे. मात्र ते नरिता गाव एक दुमदार शॉपिंग ठिकाण झाले आहे. एअरपोर्टवर थोड्यावेळासाठी येणारे प्रवासी मुद्दाम या गावाला भेट देतात आणि काही वस्तू खरेदी करतात.

आपल्याकडे पण सहारगावावरून बरेच दिवस एअरपोर्टला ' सहार एअरपोर्ट ' असे म्हणत असत. आज त्या 'सहार' गावाची स्थिती भयानक आहे ?

टोकियो शहरात जायला लोकल ट्रेनची सोय आहे. तेथल्या ट्रेन प्रवासाचा अनुभव सांगण्यासारखा आहे. डबे वातुनुकूलीत. गर्दी एवढी की उभे राहावे लागले. पण कुठेही धक्काबुक्की की ढकलाढकली नाही. शिस्तीत लोक चढत उतरत होते. डबा भरलेला पण अगदी शांत. थोड्यावेळाने लक्षात आले बरेच लोक आपापसात कुजबुजत आहेत. इतक्या हळू आवाजात बोलत होते की तिसऱ्या माणसाला ऐकायला जाणार नाही! अशी शिस्त आमच्याकडे कधीकाळी येईल का?

मध्यंतरी वाचले होते की लंडनच्या लोकल ट्रेन मध्ये कविता लावल्या होत्या. मुंबईत श्वास घेणे मुश्कील तिथे कविता कोण वाचणार. दुर्दैव आमचे!

हे काहीच नाही अशी एक बातमी वाचली. TOI (१४-२-१९९८) : ठिकाण जर्मनी - Kiel. कपल्सना तिकीटाच्या अर्धेच भाडे. अटी दोनच. रेल्वेने दिलेला स्टीकर लावायचा आणि कंडक्टरने सांगितल्यावर कपलेने कीस घ्यायचा! हा सगळा उपद्व्याप एवढ्यासाठी की प्रवास नुसता स्वस्त न होता सुखाचा व गंमतीचा व्हावा!

फोर्ट मधून एअर पोर्टवर बदली -

माझ्या बदलीची बातमी जेव्हा माझ्या सहकाऱ्यांना कळली तेव्हा ते खूप रागावले. आणि ते बरोबरच होते. मी त्यांना जराही कल्पना दिली नव्हती. मलाही त्यांना सोडून जायची कल्पना अस्वस्थ करीत होती. पण माझा नाईलाज होता.

मी एअरपोर्टवरच्या ऑफिसला जॉईन झालो आणि माझे आयुष्यच बदलून गेले. एका छोट्या डबक्यातून समुद्रात आल्यासारखे वाटले! नोकरीची उरलेली ३० वर्षे मी एअरपोर्टवर घालवली. आधी पार्ल्याच्या आणि नंतर सहार एअरपोर्टवर (आताचे CST म्हणजेच छत्रपती शिवाजीमहाराज टर्मिनल).

माझा job विमानात काम करणारे Cabin Crew म्हणजेच Flight Pursers and Air hostesses यांचे scheduling करणे म्हणजे त्यांचा duty roster तयार करणे. आणि रोजच्या विमानांसाठी पुरसे Cabin Crew आहेत की नाही याची खरबरदारी घेणे. हा job खूप challenging होता.

आमचे एक छोटे युनिट होते. मी ऑफिसर-इन-चार्ज झाल्यावर सहकाऱ्यांशी अतिशय खेळीमेळीने वागत होतो.

१) रजा मागितल्यावर नाही दिली तर काय वाटते ते मी अनुभवले होते. त्यामुळे कोणालाही कधीही रजा दिली नाही असे झाले नाही. मी स्वत: त्या कर्मचाऱ्याचे काम करायचो.

२) एखाद्याला ऑफिसला यायला उशीर झाला तर लागलीच 'कारण' कधी विचारले नाही. लंच नंतर त्याच्याजवळ जाऊन चौकशी करायचो. घरी काही प्रोब्लेम असेल तर लवकर जा असे सांगायचो. ज्यांना खरेच अडचण असेल तर त्याच्या डोळयांत पाणी यायचे ! (मी स्वत: ९.३० च्या ऑफिसला ९ वाजताच हजार असायचो. पण मी जवळ राहत असल्यमुळे मला काही अडचण नव्हती !)

३) जशी ज्याची कामाची कुवत तसे काम द्यायचो. मदतीला धावून जायचो. याचा परिणाम असा झाला सगळेच एकमेकांना मदत करू लागले. जास्त काम असेल तर न सांगता थांबू लागले.

४) आमचे युनिट म्हणजे एक घर झाले होते. आजही इतक्या वर्षांनी कोणाचा तरी फोन येतो. आठवणीने सांगतात की तुमच्या वेळी काम करताना खूप मजा केली. मी भरून पावतो.

५) या तीस वर्षात मी workaholic झालो होतो! कारण कामच तसे होते.

माझ्या या छोट्या ग्रुपमधे आम्ही १५-२० जण होतो. आज ६० वर्षानंतर लक्षात येत आहे की आमचा सेक्शन म्हणजे एक कुटुंब होते ज्यात सर्व धर्म, जातींचे लोक होते. हे यापूर्वी कधी लक्षातच आले नाही. कोणालाच कधी जाणवले नाही.

आमच्यात २ मुस्लीम, २ ख्रिश्चयन, १ मराठा, १ SC-ST, २ OBC, २ ब्राह्मण, १ CKP, २ गोव्याचे, १ कर्नाटकचा, २ केरळचे असे विविध प्रकारचे सहकारी होते. पण त्यामुळे आमच्यात कधी भांडणे झाली नाहीत.

पण याचा अर्थ सगळे 'अलबेल' होते असे नव्हे. अडचणी येत होत्या, कामावरून भांडणे होत होती. प्रत्येकाचा स्वभाव सारखा नसतो. माझ्यातही तापटपणा होता. कामाच्या बाबतीत कुणी दुर्लक्ष केले, चुका केल्या तर पट्कन रागावत असे. चुकीला, excuses ला जागा नव्हती! त्यामुळे कधी कधी सहकारी दुखावले जायचे.

एक गोष्ट पक्की लक्षात ठेवली होती.

" It always pays to be nice to others"

दुसऱ्यांना मदत करा, ते तुमच्या मदतीला आपण होऊन धाऊन येतात.

आणि दुसरी महत्वाची गोष्ट -

"You do your best and your work will speak for you"

सचोटी, प्रामाणिकपणा, मन लावून काम करणे याला पर्याय नाही. आणि याची नोंद नक्की घेतली जाते हा माझा अनुभव आहे.

माझ्या एअरपोर्टवरच्या दीर्घ काळात माझ्या जॉबमध्ये आणि एकूणच एअरपोर्टवर काय चालते हे ऐकले तर थक्क व्हाल.

लंडनच्या Heathrow Airport काय चालते ते सांगणारे एक पुस्तक 'Thiefrow' वाचण्यात आले आणि जाणवले की ते आपल्यापेक्षाही भारी आहेत! आणि त्या पुस्तकाचा काही शोध लागतो का म्हणून नेट शोधले तर अगदी अलीकडची २०१६ सालची बातमी वाचली आणि मीच थक्क झालो!

Oxford डिक्शनरीत Thiefrow चा अर्थ Heathrow Airport, London चे टोपण नाव असा दिला आहे.(१९७०)

## एअरपोर्टवर काम करण्याचे फायदे

माझ्या नोकरीची महत्वाची वर्षे मी एअरपोर्टवर काढली. आधी पार्ल्याच्या (New Terminal Building - NTB) आणि नंतर सहारच्या (आताचे Chhatrapati Shivaji International Airport - CST). (१९६६ ते १९९५)

पार्ल्याचा एअरपोर्ट माझ्या घरापासून चालत जाता येईल इतका जवळ होता.

एअरपोर्टवर मी इन-चार्ज झालो आणि २५ वर्षात Asst. Gen. Manager या हुद्यापर्यंत पोचलो. माझे काम Cabin Crew म्हणजेच Flight Pursers / Asst. Flt. Pursers आणि Air hostesses यांचे ड्युटी रोस्टर तयार करणे. माझ्या हाताखाली ४ ऑफिसर्स होते. आणि क्लार्क वगैरे सगळे मिळून १५ स्टाफ होता. शिवाय आमचे MCO म्हणजेच Movement Control Office हे २४ तास तीन शिफ्टमधे चालायचे.

आठवड्याचा रोस्टर असायचा त्यात कोण कोण flight वर जाणार आणि कोण standby असणार ते दिलेले असायचे.

त्यातला सगळयात अवघड चार्ट Air hostesses चा असायचा! तो मी माझ्याकडे ठेवला. कारण होस्टेसचा STD Force जरी १००० असायचा तरी प्रत्यक्षात ८५० सच्या जवळपास असायच्या त्यामुळे रात्रीचे फोन यायचे flight ला होस्टेस नाही. अशावेळेला पुष्कळदा घरी गाडी यायची आणि काम झाल्यावर परत आणून सोडायची. पण त्यात रात्र जायची आणि दुसरे दिवशी ११ वाजेपर्यंत हजर व्हायला लागत असे.

शॉर्टेज असल्यामुळे होस्टेसना हक्काची विश्रांती असली तरी फ्लाईट घेण्यासाठी बोलवावे लागे. कधी कधी इतका कमी वेळ असे की कंपनीची गाडी जाऊन परत आणीपर्यंत थांबू शकत नव्हतो. अशा वेळेला घरच्या गाडीतून कुणालातरी बरोबर घेऊन सोडायला सांगावे लागे. ही मदत हवी असल्यामुळे 'गिव्ह अँड टेक' करावे लागे. म्हणजे आधी त्यांना मदत करायची आणि मग मदत मागायची!

हे काम नाजूक होते म्हणून मी स्वत: यात लक्ष घालीत असे. मदत करण्यापूर्वी खात्री करून घेत असे की यात काही गडबड नाही ना! कोण काय उद्देशाने काय करत असे ते कळणे अवघड असे.

काही किस्से

१) एका होस्टेसला शॉर्ट फ्लाईटस् हवी होती. म्हणजे ज्या फ्लाईटवर गेल्यावर बाहेर गावी राहावे लागत नसे - जे जाऊन लागलीच परत येत असे - असे फ्लाईट. " तिने कारण दिले घरी आई एकटी असते. तिला विस्मरणाचा त्रास आहे." त्यामुळे ती बाहेरून घर लॉक करून जात असे. आई बाहेर गेली तर घरी परत यायचे तिला सांगता येत नसे. त्यामुळे तिला घरात कोंडून ठेवावे लागे. हे भयंकर होते.


मी सहानुभूती दाखवत म्हंटले एकदा तुझ्या आईला भेटले पाहिजे. आणि खरेच एके दिवशी मी तिच्या घरी गेलो. तिची माहिती खरी होती. ती कुलूप लावून शेजाऱ्यांकडे चावी ठेवत असे. मी ऑफिसला सांगून तिला शॉर्ट flight देत राहिलो.

२) अशीच एकदा एक होस्टेस संध्याकाळी आली आणी त्याच दिवशीच्या कुवैत फ्लाईटवर जायचे म्हणून म्हणाली. कारण 'लाईफ सेव्हिंग ड्रग्स'. मी म्हणालो, "मला प्रिस्क्रिप्शन दे. मी crew ला सांगून मागवतो." पण ती हट्ट सोडायला तयार नव्हती. ती म्हणाली, " मी स्वत: जाऊन सगळीकडे शोधेन. इतरांची मला खात्री नाही." शेवटी मी नाईलाजाने हो म्हणालो. ती खुश झाली. मला संशयाने दोन दिवस धड झोप लागत नव्हती. शेवटी दोन दिवसांनी ती परत आली. आणि काही न्यूज आली नाही म्हणजे सगळे ओके होते.

आमच्याकडे ' No news is good news' म्हणायची पद्धत होती!

त्यानंतर दोन महिन्यांनी तिने मला एक पत्र आणून दिले. ज्या पेशंटसाठी तिने जे औषध आणले होते त्यामुळे पेशंट वाचला पण त्याची दृष्टी गेली होती. पत्र वाचून माझेही अंत:करण विरघळले.

Extract from the letter


I enclose a letter from a poor old lady. I had asked you to put me on a Kuwait flight recently which you did immediately — hence the medicines were brought so fast and in time. Through you — I have been able to help this lady's husband's life. So the "thanks" goes rightly to you. On her behalf — I say thank-you
Sincerely

## 'अशोक' या जम्बो जेटला अपघात

नवीन वर्ष आले की आम्हाला प्रचंड टेन्शन येत असे. Crew धडाधड sick होत असत!

मुंबईत कोणतीही साथ नसताना असे का होते आणि २-३ तारखेला सगळे Fit कसे होतात असा मुर्खासारखा प्रश्न मला कधी पडला नाही!

माझे काम परिस्थितीला तोंड देऊन सर्व विमाने वेळच्या वेळी सुटावीत हा असे. आणि ते मला शक्य होते कारण दोन हजार पैकी २०० सीक झाले तरी इतर अठराशे माझ्या मदतीला धाऊन येत असत.

१) ३० डिसेंबरला संध्याकाळी ५ च्या सुमारास फ्लाईट पर्सर विवेक अजिंक्य 'फिट' सर्टिफिकेट घेऊन आला. मी म्हंटले बरे झालेस तू अगदी देवा सारखा

धाऊन आलास. आज रात्री २-३ जागा रिकाम्या आहेत, तुला पाहिजे ते flight घे. तर तो अजीजीने म्हणाला काहीही करून मला उद्या रात्रीपर्यंत flight देऊ नका.

परवा सकाळी म्हणजे १ तारखेला - नववर्षाच्या सकाळी मी flightवर जाईन. मी म्हणलो, "अरे कसे शक्य आहे. फारफार तर मी उद्या सकाळपर्यंत तुला off ठेऊ शकतो." तरी तो हट्ट सोडीना. मग मी म्हणालो की असे जर होते तर तू फिट का केलेस ? अजूनही परत डॉक्टरकडे जा आणि दोन दिवसांनी फिट कर. तर त्यालाही तो तयार नव्हता!

मी उत्सुकता म्हणून विचारले असे काय आहे की तू flight घेत नाहीस ? नववर्षाची पार्टी आहे का ?

त्यावर तो म्हणाला नाही तसे काही नाही. माझ्या मुलीचा पहिला वाढदिवस आहे ३१च्या रात्री. तो झाला की मी सकाळी कोणत्याही flightवर जायला तयार आहे.

त्याला कल्पना नव्हती की तो आपल्या मुलीचा पहिला आणि शेवटचा वाढदिवस साजरा करणार आहे!

अपघातात त्याचे नाव बघून मला प्रचंड धक्का बसला.

काही गोष्टी घडायच्या त्या, त्यात्या वेळीच घडतात. त्याला कसलेही लॉजिक - तर्कशास्त्र - लागू पडत नाही!



Vivek AJINKYA. 30



Madhu NANDA. 25

२) मधु नंदा - मला आठवते त्याप्रमाणे ती एअर इंडिया कॉलनीत राहायची. एका होस्टेसने ऐनवेळी 'sick' केले. वेळ अगदी थोडा होता. तरी प्रयत्न केला. कॉलनीतून मधु नंदा आली तेव्हा विमानाचे दार बंद करीत होते. ती आल्याची खबर देताच दार बंद न करता crew तिच्यासाठी थांबले आणि ती येताच तिला आत घेऊन दार बंद केले! काळ आला होता आणि वेळही आली होती! एक अतिशय सुंदर होस्टेस काळाने हिरावून घेतली.

दुसरे दिवशी जिने sick केले होते ती ऑफिसमध्ये आली. आणि म्हणाली, "बरे झाले मी sick केले म्हणून वाचले!"

## विलक्षण योगायोग –

ही एक सत्यकथा आहे. जेरू आणि जमशेद या बहिण भावांची. ती कथा अजूनही मनात कायम घर करून बसली आहे.

जेरू देखणी होती पण हवाई सुंदरीसाठी लागणारा 'बोल्डनेस' तिच्यापाशी नव्हता! ती मितभाषी आणि संकोची स्वभावाची होती. अशी काही फ्लाईट्स होती कि जी घेतली की अनेक दिवस मुंबई बाहेर राहावे लागे. अशी फ्लाईट्स तिला नको असत.

एकदा तिने मला विचारले, 'मी तुमच्या घरी येऊ का, सर. मला तुम्हाला काही महत्वाचे सांगायचे आहे'!मी म्हणालो, 'असे काय महत्वाचे आहे की जे ऑफिसमध्ये सांगता येत नाही?' ती यावर काहीच बोलली नाही. तिच्या चेहऱ्यावरच्या अजीजीने माझा होकार मिळवला.

१९७७ चे अखेरचे ८-१० दिवस होते ते. एके दिवशी ती अनपेक्षितपणे माझ्या घरी आली. पण रात्रीचे ११ वाजून गेल्यावर. माझ्याकडे तेव्हा फोन नव्हता आणि तिने ऑफिसमध्येही फोन करून मला कल्पना दिली नव्हती. तिने न कळवता इतक्या उशिरा आलेले मला आवडले नाही. तिच्या बरोबर सोबतीला एक प्रौढ पुरुष होता. तो तिचा शेजारी होता व इतक्या रात्री तिला एकटीला येणे शक्य नव्हते म्हणून त्याने तिच्याबरोबर यायचे कबुल केले होते पण त्याच्या सवडीने! म्हणून तिला उशिरा यावे लागले व त्याबद्दल तिने दिलगिरीही व्यक्त केली. ती दक्षिण मुंबईच्या पारशी कॉलनीत राहायची.

तिचे आई-वडील विभक्त झाले होते. धाकटा भाऊही घर सोडून दुसरीकडे पेईंगगेस्ट म्हणून राहायला गेला होता. तिला आईला घरी एकटीला सोडून फार दिवस बाहेर राहणे नको होते म्हणून तिला 'शॉर्ट फ्लाईट्स' हवी होती. हे ती फोनवरही सांगू शकली असती पण तिला संकोच वाटला. शिवाय तिला

आठवड्याची रजाही हवी होती आणि वर्ष अखेरीस रजा मिळणे शक्य नव्हते याचीही तिला कल्पना होती.

मी तिला मदत करण्याचे कबुल केले व दुसरे दिवशी ऑफिसमधे येऊन अर्ज द्यायला सांगितले. आणि तिला बजावले की पुन्हा असे घरी येत जाऊ नकोस. ती शरमिंदी झाली, तिचा चेहरा पडला व 'आता पुन्हा असा त्रास कधीही देणार नाही' असे वारंवार सांगतच माझा निरोप घेतला.

तिची रजा ३० तारखेलाच संपत होती. त्यामुळे ३१ तारखेच्या रात्रीचे फ्लाईट तिला मिळाले.

१ जानेवारी १९७८ ची सकाळ. मला पहाटेच ऑफिसला बोलावले गेले. बोईंग विमान 'अशोका' सहारहून 'टेक ऑफ' घेतल्यानंतर काही मिनिटातच वांद्र्याच्या समुद्रात कोसळल्याची भयंकर बातमी होती. कोणीही वाचण्याची शक्यता नव्हती. मी घाईघाईने क्रू लिस्ट वाचली आणि तिच्यात जेरुचे नाव पाहून अक्षरश: थिजलो. डोळ्यापुढे तिचा तो पडलेला चेहरा येऊ लागला. 'आता पुन्हा असा त्रास कधीही देणार नाही' हे शब्दही कानात घुमू लागले. मला अपराधी वाटू लागले. तेव्हा बोलायची काय गरज होती ? तिने पुन्हा विचारले असते तर नाही सांगता आले असते! पण .....!

तिचा भाऊ जमशेदला असिस्टंट फ्लाईट पर्सरची नोकरी मिळाली. त्याच्याशी अनपेक्षितपणे संबंध आला. मला फोटोग्राफीची आवड होती. त्यातही स्लाईड्स करून प्रोजेक्टरद्वारे भिंतीवर बघायला फार आवडायचे. मला काही फोटोंच्या स्लाईडस करून हव्या होत्या. आणि कळले कि जमशेद एक निष्णात फोटोग्राफर आहे. तो त्याचा व्यवसाय नसून छंद आहे.

मी त्याच्याशी संपर्क साधला. तो मोठ्या आवडीने मला म्हणाला की आपण रविवारी भेटू. तो व त्याची बायको (तीही होस्टेस होती) ग्रांटरोडला एका पारशी वृद्ध बाईकडे पेईंगगेस्ट म्हणून राहत होते.

मी भेटलो तेव्हा त्याची बायको फ्लाईटवर होती. त्याने माझ्या फोटोंच्या स्लाईडसाठी फोटो घेतले व मला फोटोग्राफीच्या काही टिप्सही दिल्या. शिवाय एक कलर फोटोग्राफीचे महागडे पुस्तकही दिले. एक महिन्यांनी पुन्हा भेटण्याचे ठरले. मध्यंतरीच्या काळात त्याने स्लाईडस आणून दिल्या.

२३ जून १९८५ चा दिवस - एक अतिशय वाईट बातमी आली. 'कनिष्क' या विमानाला आयरिश बेटांजवळच्या समुद्रात घातपात होऊन अपघात झाला होता. कोणीही वाचले नव्हते.


यादीत जमशेद आणि त्याच्या बायकोचे नाव बघून काळजात धस्स झाले. ती गरोदर होती.

मी त्याच्या आईला भेटायला खुश्रू बागेत गेलो. बरोबर त्याने दिलेले फोटोग्राफीचे पुस्तकही होते. त्याच्या आईवर आकाशच कोसळले होते. आधी एकुलती एक मुलगी आणि नंतर मुलगा. मी काय बोलणार? मी पुस्तक दिले तर त्याची आई म्हणाली मी या पुस्तकाचे काय करू ? त्याची आठवण म्हणून तुम्हीच ठेवा तुमाचाकडे.

या विलक्षण योगायोगाला काय म्हणणार ? नियती ? प्रारब्ध ? की निव्वळ योगागोग ? एक अपघात ?



Jeroo DINSHAW. 24



Jamshed Dinshaw



Pamela Dinshaw

1) पहाटे ४ चा सुमार. दारावरची बेल सतत वाजत होती. कोण असेल इतक्या पहाटे. मी दार उघडले तर एक युनिफॉर्म घातलेली होस्टेस दार उघड्ल्याबरोबर आत घुसली, ड्रायव्हरने तिच्या दोन ब्यागा आत ढकलल्या आणि तिने दार लावून घेतले. ती प्रचंड घाबरलेली दिसत होती!

तिला बसायला सांगून पाणी प्यायला दिले. मग जरा शांत झाल्यावर काय झाले म्हणून विचारले. तिने दिलेली माहिती धक्कादायक होती.

काही दिवसांपूर्वी ती दुबई-लंडन सेक्टरवर जाताना तिला मुंबईहून आलेल्या होस्टेसने एक पार्सल - डबा - दिला. ज्याचा आहे तो लंडनला हॉटेलमध्ये येऊन घेऊन जाईल असे तिने सांगितले. घाईघाईत तिने डबा ठेऊन घेतला. नंतर स्थिरस्थावर झाल्यावर तिला डब्याची आठवण झाली. तिने तो सुपरवायझरला दाखवला. त्यात पावडर होती. सुपरवायझरला संशय आला, त्याने ती पावडर सिंकमध्ये टाकून नष्ट केली. डबा फेकून दिला.

ती जेव्हा लंडनला हॉटेलमध्ये पोचली तेव्हा तिला एक फोन आला. डब्याची चौकशी केली व केव्हा घ्यायला येऊ म्हणून विचारले. तिने सांगितले, " मी आत्ताच आले आहे. जरा वेळाने फोन करा." नंतर तिने हॉटेल मॅनेजरला सांगून खोली बदलून घेतली आणि कोणालाही खोलीचा नंबर कळू द्यायचा नाही हे बजावून सांगितले. दोन दिवस ती हॉटेल बाहेर पडलीच नाही.

मुंबईला आल्यावर काय करावे ते तिला सुचले नाही म्हणून ड्रायव्हरला सांगून ती माझ्या घरी पोचली. ती दमून आल्यामुळे आणि मानसिक धक्क्यातून गेल्यामुळे लागलीच झोपी गेली. पण माझी मात्र झोप उडवली. जर ते पार्सल देणारे लोक मागावर असतील तर माझ्या घरी येऊ शकतात. किंवा पोलीस त्यांच्या मागावर असतील तर पोलीसही येऊ शकतात! मीच घाबरून गेलो. कारण नसताना या संकटात आपण सापडू, म्हणून घरी सांगितले की सकाळी ९च्या सुमारास तिला

उठवा व घरी पाठवून द्या. घरून मला फोन आला की तिला उठवले पण ती संध्याकाळ पर्यंत जाणार नाही असे सांगत होती.

मी तिच्याकडे फोन द्यायला सांगितले व तिला म्हणालो, " अर्ध्या तासात जर तू गेली नाही तर मला नाईलाजाने पोलिसांना सांगावे लागेल." ही मात्रा बरोबर लागू पडली व ती निघून गेली. तरी २ दिवस मी चिंतेत होतो.

मला तिचीही काळजी वाटत होती. चौकशी केली. सर्व काही ठीक होते.

तो पर्यंत ऑफिसमधल्या कोणी हे पार्सल दिले, कोणाकडून आले होते, याची चौकशी केली. पण ज्याने दिले त्याला 'कोणीतरी अनोळखी माणसाने आणून दिले' एवढेच आठवत होते. सगळया स्टाफला बोलावून परिस्थितीची कल्पना दिली. यापुढे अनोळखीच काय पण ओळखीच्या माणसाकडूनही कोणतेही पार्सल घ्यायचे नाही अशी सक्त ताकीद दिली. आणि हे प्रकरण इथेच मिटले. आम्हीही अनुभवातून शिकत होतो!

2) आमची सगळी कार्यालये ओल्ड एअर पोर्ट – सांताक्रूझला असायची. आम्हाला नेहमीच तिकडे जावे लागे. त्यासाठी त्याकाळी रनवे क्रॉस करायची सोय होती. जेव्हा विमानाची ये-जा नसायची तेव्हा रनवे क्रॉस करता येत होता. त्यासाठी रस्त्यांवर असतात तसे लाल हिरवे दिवे होते. पुढे एकदा चुकीचा सिग्नल दिला आणि नेमके त्याच वेळी VIP फ्लाईट उड्डाण करीत होते. सुदैवाने काही नुकसान झाले नाही. पण रनवे क्रॉस करायची सोय मात्र कायमची बंद झाली!

पुढे एकदा मुख्य रनवे दुरुस्तीसाठी बंद होता. अशावेळी standby रनवे वापरतात. तेव्हा मी मित्राला म्हंटले चल आपण रनवे क्रॉसकरून जाऊ. तेवढाच वेळ वाचेल! आम्ही चालत निघालो. मुख्य रनवेवर पोचलो. तेव्हा एक मोठे विमान standby रनवेवर उतरून मुख्य इमारतीकडे जाण्यासाठी या रनवेवर आले. ते

वळून जाणार म्हणून आम्ही बेफिकीर होतो. पण ते विमान तसेच पुढे आले व काही अंतरावर येऊन थांबले. मला संशय आला. हे विमान आम्ही रनवे वर आहोत म्हणूनच थांबले असावे. मी मित्राला सांगून पळत रनवे क्रॉस करून बाजूच्या गवताळ जमिनीवर गेलो. त्याबरोबर विमानाने वळण घेतले. आणि त्याच्या मागून येणाऱ्या वाऱ्याचे गरम गरम झोत अंगावर येऊ लागले. मी आणि मित्राने अक्षरश: जमिनीवर लोळण घेतली. नाहीतर आम्ही हवेत वर फेकलो गेलो असतो. काही सेकंदातच वारे थांबले. आम्ही उठलो तेव्हा इतके घाबरलेले होतो कि धड चालताही येत नव्हते. कसेबसे आमच्या ऑफिसला पोचलो.

आमचा अवतार बघून सगळा स्टाफ भोवती जमला. आम्ही जेव्हा त्यांना आमची कथा सांगितली तेव्हा ते हसायलाच लागले. आम्हीही त्यात सामील झालो. पण आज अजूनही तो प्रसंग आठवला कि अंगावर काटा उभा राहतो!

*********************

## माझ्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला माझ्या वरच्या ग्रेडमध्ये प्रमोशन

असा एक आठवडा जायचा नाही की काही सनसनाटी घडले नाही! पण त्या सगळ्या गोष्टी सांगू शकत नाही.

आपला कुणी जाणूनबुजून अपमान केला किंवा आपल्यावर अन्याय केला तर राग येईल, आपण शक्य असेल तर प्रतिकार करू.

पण जर परिस्थितीच अशी निर्माण झाली की आपल्यावर अन्याय झाला आहे, आपला अपमान झाला आहे तर रागवायचे कुणावर ? माझी स्थिती अशीच काहीशी झाली होती.

१) एके दिवशी डायरेक्टरने मला बोलावले आणि सांगितले की आज पासून तू तुला जुनियर असलेल्या अमुकअमुक माणसाच्या हाताखाली काम करायचे आहे! कारण त्याला तुझ्या वरच्या पोस्टवर प्रमोशन मिळाले आहे! माझा माझ्या कानांवर विश्वास बसत नव्हता. मी ऐकले ते खरे आहे का असा विचार करीतच मी केबिन बाहेर पडलो. जाताना त्याने मला त्या सहकाऱ्याला पाठवून दे असाही निरोप दिला.

मी सहकाऱ्याला निरोप दिला आणि माझ्या केबिनमधे जाऊन बसलो. मला आश्चर्य वाटले की डायरेक्टर हे इतके कोरडेपणे कसे काय सांगू शकला ? काही नेहमीसारखे discussion नाही! काही बोलणे नाही! मी शॉकमधे होतो. माझी विचारशक्ती काम करीत नव्हती!

सहकारी आला तोही चेहरा टाकून. त्याच्या हातात त्याचे promotion लेटर होते. पण चेहऱ्यावर आनंद नव्हता तर भीती होती! तो साडेपाच वाजले की

घरी निघून जायचा. कधीही काही काम आहे का म्हणून विचारले नाही. मीही त्याला कधी काम आहे, तू थांबत का नाहीस असे बोललो नाही.

त्याला काळजी की मी आता साडेपाचला निघून जाईन आणि त्याला रोज लेट बसावे लागेल. त्याला कामाची कल्पना होती. किती अवघड व जबाबदारीचे काम होते हेही माहित होते.  त्यामुळे तो चिंतेत होता.

तो मला म्हणाला, "तुम्ही नेहमीप्रमाणे काम करा. इथेच बसा. मीही माझ्या नेहमीच्या जागेवरच बसेन."

पण मी त्याला सांगितले की मला सूचना आहेत की आता तू In-charge आहेस. आणि मला तुला चार्ज द्यावा लागेल. अर्ध्यातासात मी तुला टेबल रिकामे करून देतो.

तो बाहेर गेला आणि ही बातमी सगळीकडे पसरली. जो तो माझ्याकडे येऊन चौकशी करू लागला.

हे असे कसे झाले ? कारण मला माझ्या ओरिजिनल सेक्शनमध्ये न ठेवता या दुसऱ्याच सेक्शनमध्ये काम करायला सांगितले होते. इथल्या सेक्शनची सिनीऑरिटी वेगळी होती. आणि इथे माझा सहकारी सगळयात सिनीअर होता म्हणून त्याला प्रमोशन मिळाले. माझेही प्रमोशन ड्यू होते पण ते अजून मिळाले नव्हते. त्यामुळे हा पेच निर्माण झाला.

कुणी मुद्दाम केले नव्हते. पण जर माझे प्रमोशन याच तारखेपासून झाले नाही तर मी सिनीअर राहणार नाही आणि मला इथे राहणे शक्य होणार नाही याचीही मला  जाणीव होती.

माझ्या सहकाऱ्याचा काही दोष नव्हता. मला त्याची कीव आली. मी म्हणालो, "तू काळजी करू नकोस. मी नेहमीप्रमाणेच काम करीन."

माझे इतर सहकारी माझ्यावर नाराज होते. त्यांचे म्हणणे मी त्याला चांगला धडा शिकवावा. पण मी त्यांची कशीबशी समजूत काढली.

माझा सहकारी माझ्या केबिनमध्ये बसायला मात्र आला नाही! म्हणाला तुम्ही इथेच बसा.

पण योगायोग असा की दोन आठवड्यांनी मलाही त्याच तारखेपासून प्रमोशन मिळाले आणि सगळे परत पाहिल्यासारखे झाले!

नंतर कळले की बॉसने मुद्दाम माझे प्रमोशन त्याच तारखेपासून करून घेतले होते. मी त्याचे खास आभार मानले तेव्हा तो नुसता हसला. त्याने माझी सत्वपरीक्षाच पाहिली होती! मी कसा react होतो हे त्याला कदाचित बघायचे असावे! इकडे माझा जीव जायची वेळ आली होती!

माझ्या प्रमोशनचा आनंद माझ्यापेक्षा माझ्या त्या सहकाऱ्याला जास्त झाला!

२) एकदा मला युनियनच्या एका सदस्याने फोन करून " तू आमच्यामध्ये पडू नकोस नाहीतर परिणाम वाईट होतील." अशी धमकी दिली. मराठी होता.

मी म्हणालो, " तुमच्यामध्ये पडण्याचे मला काही कारण नाही. पण कंपनी मला पगार देते, तेव्हा कंपनीचे नुकसान होईल असे मी काहीही करणार नाही. पुढे काही झाले नाही. त्यांनी धमकी देऊन बघितले एवढेच!

पण नंतर काही दिवसांनी माझ्या डायरेक्टरने तीच गोष्ट मला करायला सांगितली. त्यात युनियनचा हात होता.

मी बॉसला म्हणालो, सर, इतकी महत्वाची गोष्ट आहे ज्यामुळे कंपनीला कारण नसताना भुर्दंड बसेल. तेव्हा आपल्या सगळयांच्याच फायद्यासाठी आपण ही गोष्ट लेखी द्यावी. मी आपणहून ही गोष्ट करू शकत नाही.

बॉसला माझ्याकडून असल्या उत्तराची अपेक्षा नव्हती. तो भडकला, " मी काय करायचे ते तू सांगू नकोस. तू जाऊ शकतोस " पण मला खात्री होती की तो पुढे काही करणार नाही. कारण माझे सांगणे बरोबर होते. कंपनीच्या हिताचे होते. आणि अशा वेळेस हे बॉसेस डरपोक असतात!

================================

माझ्या या जॉबमुळे अनेक थोरामोठ्यांच्या ओळखी झाल्या. काहींचे फोन यायचे. कारण त्यांच्या कुटुंबातले कुणीतरी Cabin Crew म्हणून काम करीत असायचे.

एके दिवशी सकाळी ८ च्या सुमारास सुप्रसिद्ध नाटकार, साहित्यिक विजय तेंडुलकरांना दारात बघून मला आश्चर्यच वाटले! ते पार्ल्यातच राहायचे. त्यांची मुलगी प्रिया ही होस्टेसची नोकरी करीत होती. ती लंडनला फ्लाईटवर गेली होती. ती लंडनला आजारी पडली आणि तसा मेसेज तिच्या घरी पाठवला गेला होता. तिच्या काळजीमुळे नक्की काय आहे ते विचारायला तेंडूलकर आले होते. मी सांगितले की काळजीचे काही कारण नाही कारण ती हॉटेलमध्येच आहे. जरा जरी संशय आला तरी लागलीच crew ला हॉस्पिटलमध्ये पाठवले जाते. तरी सुद्धा मी दुसरा telex पाठवतो. अर्ध्या तासात उत्तर येईल. मी तुम्हाला तसे कळवतो. त्या पहिल्याच भेटीत त्यांनी त्यांची 'कोवळी उन्हे', आणि 'सामना' ही दोन पुस्तके मला भेट दिली!

**************************************

सुप्रसिद्ध गायक उदित नारायण याची पत्नी दीपा ही होस्टेस होती. ते दोघे नेपाळ,  कोलकाता येथे गाण्याचे कार्यक्रम करीत. काही वेळा ते त्यांच्या छोट्या मुलाला - आदित्यला - घेऊन घरी आलेले आहेत.

**********************************

सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले यांची सून ही पण होस्टेस होती. त्यांचेही फोन यायचे.

****************************

एकदा तर एका रिटायर झालेल्या होस्टेसचा फोन आला. म्हणाली माझा नवरा एअर इंडियाचा CMD आहे! तुझे काही काम आहे का? माझे काय काम असणार ? मी तिचे आभार मानले!

ही लिस्ट फार मोठी आहे. पण मला पक्के माहित होते की हा मान माझ्या खुर्चीचा आहे. त्यात बसणाऱ्या व्यक्तीच्या अधिकाराचा आहे. त्यामुळे या गोष्टी कधीही माझ्या डोक्यात गेल्या नाहीत. उलट मी यापासून शक्यतो दूरच राहायचो.

**************************************

निवृत्त झाल्यावर एका रात्रीत मी झिरो झालो! पण आधीच माझ्या मनाची तयारी असल्यामुळे मला काही वाटले नाही. उलट मी माझे दुसरे जीवन आनंदाने जगू शकलो.

एकदा एका पर्सरने रात्री १२ च्या सुमारास फोन केला. त्याचा आवाज रडवेला होता. त्याची आई आजारी होती आणि त्याला दिल्लीला जायचे होते. मी म्हणालो, " तू काळजी करू नकोस. तू आता दिल्लीला जा आणि एक-दोन दिवसांनी मला किती रजा पाहिजे ते कळव."

पण त्याचा प्रॉब्लेम दुसराच होता! त्याला दिल्लीचे तिकीट पाहिजे होते. आणि ते माझ्या अधिकारात नव्हते. मी त्याला समजावण्याचा खूप प्रयत्न केला पण तो ऐकायलाच तयार होईना.

वेळ थोडा होता. मी विचार केला कंपनी डोमेस्टिक रूटवर कितीही वेळा जायला passage देते. त्यामुळे तो आल्यावर regularize करू शकतो. प्रश्न होता माझ्या सेक्शनची passage authority चालेल का ? त्याच्या आधारे Traffic त्याला तिकीट देईल का? त्याची ओळख होती! तो ती जबाबदारी घ्यायला तयार होता. मी आमच्या MCO ऑफिसला सांगून लेटर दिले.

दुसरे दिवशी ऑफिसला गेल्या गेल्या मला माझ्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने बोलावले. विचारले तुला तिकीट द्यायचा अधिकार कोणी दिला ? बातमी इतक्या वेगाने कशी पोचली ? याला काहीतरी background असले पाहिजे! माझा अंदाज बरोबर निघाला. त्या पर्सरला आधले दिवशी ऑफिसमध्ये आला असताना रजा नाकारली होती. ही गोष्ट ऑफिसमधल्या मला कोणीच सांगितली नव्हती. आणि त्या पर्सरनेही मला कल्पना दिली नाही. मी सांगितले, " मला तो अधिकार नाही हे माहित आहे. पण परिस्थिती अशी होती की मला तो निर्णय घ्यावासा वाटला. पर्सर परत आल्यावर 'Post facto' परवानगी दिली म्हणून सांगून regularize करता येईल.

त्यानंतर काही वेळाने नंबर दोनच्या अधिकाऱ्याने बोलावले. तेच प्रश्न, तीच उत्तरे!

तोपर्यंत माझा अर्धा दिवस फुकट गेला होता. (एक सांगायचे म्हणजे आमचे एअरपोर्टवरचे ऑफिस सहारला शिफ्ट होई पर्यंत काही दिवस ओल्ड एअरपोर्टला हलवले होते.)

लंच टाईमनंतर Directorने मला बोलावले. आता मात्र मी worked up झालो होतो. माझी सहनशक्ती संपली होती!

मी गेल्यागेल्याच त्याने काही विचारायच्या आधीच सगळे सांगून टाकले व म्हणलो, " सकाळपासून मी गुन्हेगार असल्यासारखी माझी चौकशी चालली आहे. अर्धा दिवस फुकट गेला आहे. मला आता एक मिनिटभरसुद्धा या सेक्शनमध्ये काम करायचे नाही. माझी ट्रान्स्फर करा आणि नंतर काय शिक्षा करायची ती करा "

Director शांतपणे मी काय सांगतो ते ऐकत होता. नंतर म्हणाला, " Mr. Mahajan, You have done the right thing. Please go and attend to your work"

# परदेश प्रवास - हॉंग कॉंग

एअर इंडियातील नोकरीचे मोठे आकर्षण म्हणजे फ्री पास घेऊन जगभर प्रवास करण्याची संधी. जगातल्या सर्वच एअरलाइन मधल्या कर्मचाऱ्यांना अशी सुविधा असते. जिथे कंपनीची सेवा नसते तिथे दुसऱ्या कंपनीवर केवळ १०% भाडे भरून प्रवास करता येतो.

पण एक मोठी जाचक अट असते. ती म्हणजे 'Subject to load' सीट रिकामी असेल तरच. तरीही चिकाटी दाखवून प्रवास करता येतो.

मी एकूण ११ शहरे पाहू शकलो.

रिटायर झाल्यावरही पास मिळतात. पण गेल्या २२ वर्षात मी एकदाही प्रवास केला नाही. प्रवास करणे कुठे थांबवायचे हे मी आधीच ठरवले होते! माझे असे वागणे अनेकांना वेडगळपणाचे वाटले पण मी ठाम होतो.

कारण एखाद्या गोष्टीचा मोह झाला की मग तो आवरणे कठीण होते. आणि मला त्या चक्रात अडकायचे नव्हते!

माझ्या परदेश प्रवासाबद्दल विशेष काही सांगण्यासारखे नाही! पण फक्त काही किस्से सांगायचा मोह होत आहे. ते सांगून टाकतो.

माझी पहिली ट्रीप Hongkong ला झाली (१९७०). त्याकाळी Hongkong आणि Singapore या दोन ठिकाणी जास्तीत जास्त स्टाफ जायचा. आकर्षण होते shopping चे! मी कधी आयुष्यात मुंबईत shoping केले नाही. आणि Hongkong ला जाऊन काय shopping करणार ? पण कोणीतरी गाईड करणारे पाहिजे म्हणून ऑफिसच्या दोन अनुभवी मित्रांबरोबर जायचे ठरवले. त्याकाळी फॉरेन एक्चेंज फक्त प्रवासात खर्चाला पुरेल एवढाच नेऊ देत असत. त्यात

तिथे राहणे  आणि खरेदी दोन्ही अशक्य होते. तरी हजारो लोक जात होते. पण सरकारच्या टाळक्यात प्रकाश पडत नव्हता की हे लोक पैसे कुठून आणतात ?

सरकारला माहित नव्हते पण स्टाफला चांगले माहित होते! मुंबईत एजंट असत त्यांच्याकडे भारतीय चलन दिले की त्याचे हाँगकाँग डॉलरमध्ये पैसे, त्यांनी दिलेल्या दुकानात गेले की मिळत असत. त्या दुकानाचा पत्ता असलेल्या कार्डच्या मागे सांकेतिक भाषेत संदेश असे. हाँगकाँगमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर सिंधी आणि पंजाबी लोकांची दुकाने होती. त्यांची भारतात पैसे पाठवायची सोय सरकारने आयतीच करून दिली होती!

कस्टमवाल्यांना तर काय पैशाची खाणच मिळाली होती. पैसे हुशारीने कसे मिळवायचे ही कला त्यांना  चांगलीच अवगत होती. त्यामुळे कायद्याच्या कचाट्यात सापडत नसत.

एअरपोर्टवरच्या जवळ जवळ सगळयाच यंत्रणा यात वाकबगार होत्या.

टॅक्सीवाल्यांना फक्त परदेशी प्रवाश्यात इंटरेस्ट असायचा कारण त्यांच्या देशाच्या तुलनेत इथले भाडे म्हणजे काहीच नव्हते! त्यामुळे ते आपणहून मागितल्याच्या कितीतरी अधिक द्यायचे. तेही पुष्कळदा परकीय चलनात. त्यामुळे जवळचे भाडे न्यायला टॅक्सीवाले उत्सुक नसत.

मुख्य हाँगकाँग बेट एअरपोर्टपासून लांब आहे. एअरपोर्ट ज्या भागात आहे त्याला Kowloon  म्हणतात. आमचे राहायचे हॉटेल Kowloon भागातच होते. तेथून छोट्या छोट्या बोटींमधून (Star Ferry), Kowloon ते HongKong प्रवास करावा लागे.





आम्ही उतरलो होतो त्या हॉटेलचे नाव होते Chungking Mansion. बहुतेक लोक इथेच उतरत असत. तिथेच  तळमजल्यावर शॉपिंगसाठी खूप दुकाने होती. आम्ही फेरफटका मारताना

तिथल्या एका दुकानाच्या काचेवर मराठीत लिहिले होते -

"इथे सुंदर साड्या मिळतील"

ते दुकान एका सिंधी माणसाचे होते हे काय सांगायला पाहिजे!

त्याच हॉटेलच्या तळमजल्याच्या खाली तळघरात एक नाईटक्लब होता. ही माहिती आमच्या मित्राने दिले. आणि आज रात्री जाऊ या असे सुचवले. रात्री १२ वा.पर्यंतच नाईटक्लब चालू असे. आणि तिथे ११ ते १२ striptease show असे. एक तास बायकांना एका खोलीत बसवून जाऊ असा प्लान होता. त्यांना मुद्दाम आईस्क्रीम आणून दिले. आणि जातो असे सांगून सटकलो.

तिथे गेलो तर इतका कमी  प्रकाश की आम्हाला काही दिसेन. म्हणून तसेच आत जाऊन उभे राहिलो. इतक्यात एक topless होस्टेस आली व आम्हाला

बरोबर येण्याची खूण करून जिथे तो कार्यक्रम चालतो त्या रिंग जवळ नेऊन बसवले. एसी असूनही आम्हाला घाम फुटला होता. थोड्याच वेळात बियरचा भला मोठा ग्लास आणून ठेवला. आमच्या घशाला कोरड पडली होतीच. बियर प्याल्यावर बरे वाटले. नंतरचा एक तास कसा गेला ते कळलेच नाही!

त्याच धुंदीत रूमवर आलो पण बायकांची प्रतिक्रिया बघितली आणि धुंदी पार उतरली!

हाँगकाँग गर्दीचे शहर असूनही शिस्त होती. मुख्य गर्दी प्रवाशांचीच होती. फ्री पोर्ट असल्यामुळे वस्तू स्वस्त मिळत असत.

नेहमी जाणारे मोजक्याच इलेक्ट्रॉनिकच्या वस्तू आणून त्या इथे विकत असत आणि ट्रिपचा खर्च वजा जाता फायदाही होत असे.

आम्ही मात्र नातेवाईकांना, मित्रांना भेट देण्यासाठी त्यातल्यात्यात स्वस्त वस्तू खरेदी केल्या!

मुख्य बेटावर बघण्यासारखे बरेच होते. पण पिकट्राम (peak tram) लक्षात राहिली. डोंगरावर चढून जाण्यासाठी ती ट्राम वापरीत असत. इतकी तिरपी व्हायची की पडेल की काय अशी भीती वाटत असे.

एक खटकण्यासारखी गोष्ट म्हणजे तिथले चायनीज दुकानदार साडीवाल्या बायका पाहिल्या की लांबूनच हाताने खूण करून चक्क हाकलून देत असत. नंतर कळले की या बायका दुकानात घुसून अनेक वस्तूंची नुसती चौकशी करायच्या, किंमती विचारायच्या आणि दुसऱ्या दुकानात बघू म्हणून काहीच खरेदी न करता निघून जात असत. आपल्याकडे हे चालते पण तिथे चायनीज दुकानदारांना

असे करणे अपमानस्पद वाटत असे. सिंधी लोकांना यात नवीन काही वाटायचे नाही. त्यामुळे तिथेच खरेदी होत असे.

मी मात्र हे इमेज पुसायचा माझ्यापरीने एक छोटासा - प्रतीकात्मक - प्रयत्न केला. एका चायनीज दुकानात गेलो. तो नेहमीप्रमाणे पुढे जा सांगत होता पण मी म्हणालो - I buy - आणि असे म्हणून एक वस्तू निवडली, किंमत विचारली आणि त्याने सांगितले तितके पैसे देऊन विकत घेतली. त्याला आनंद झाला. आणखीही २-४ छोट्या वस्तू विकता घेतल्या आणि त्याचे आभार मानून बाहेर पडलो. त्याचा चेहरा बघून मला बरे वाटले!

# माझी दुसरी ट्रीप

माझी दुसरी ट्रीप रोम, लंडन, न्युयॉर्क, वाशिंग्टन अशी मोठी आखली होती.

रोम -

युरोपमधल्या सर्वात प्राचीन शहराला, रोमला भेट देणार ही कल्पनाच रोमांचकारी होती.

रोम म्हंटल्यावर आठवले ते त्याकाळी अत्यंत गाजलेलेल चित्रपट 'Quo Vadis, Roman Holidays, Ben-Hur, Gladiator, Spartacus' वगैरे.

रोममधली काही प्रेक्षणीय स्थळे :-

१) 'Colosseum' -

'Quo Vadis' मधील अंगावर काटा आणणारी ती दृश्ये. 'Colosseum'च्या रिंगणात भुकेलेल सिंह अंगावर सोडून लोकांना / गुन्हेगारांना फाडून खाताना बघून आनंदाने जल्लोष करणारे तेथे जमलेले हजारो स्त्री-पुरुष डोळ्यासमोर आले.

आज त्या 'Colosseum' चे भग्न अवशेष असणारी वास्तू रोममधील एक मोठे टुरिस्ट आकर्षण आहे. मुळात हे एक ॲम्फी थेटर होते. ५०,००० लोक बसू शकतील इतके ते मोठे होते. सहाव्या शतकापर्यंत तेथे अनेक करमणुकीचे कार्यक्रम होत असत. लुटुपुटुच्या लढाया, जुन्या काळातली त्यांचा संस्कृतीतील भव्य नाटके आणि काही त्या चित्रपटात दाखवले तसे रानटी प्रयोग!

२) The Vatican City -



ख्रिश्चनांचे पवित्र यात्रा ठिकाण. रोम शहरातच हे स्वतंत्र शहर आहे! जगातले एकमेव ठिकाण जेथे दोन राज्ये (स्टेट्स) एकाच शहरात आहेत!

जवळ जवळ २,५०० वर्षे इतके हे जुने आहे. रोमला '"Caput Mundi" (Capital of the World)' असेही म्हणत असत.



३) Trevi Fountain - हे सर्वांचे आवडते ठिकाण - कारंजे! मनातल्या इच्छा पूर्ण व्हाव्यात म्हणून यात नाणी टाकणे हा लोकांचा आवडता छंद आहे. कारंज्याकडे पाठ करून, तीन नाणी उजव्या हातात घेऊन ती डाव्या खांद्यावरून या कारंज्यात टाकायची की झाले काम. हल्ली दररोज साधारण ३,००० युरो नाणी यात टाकली जातात. यात जमणारे पैसे गरजूंच्या मदतीसाठी वापरले जातात.



४) St. Peter's Basilica  - या ठिकाणी सेंट पीटरचे दफन केले आहे असे म्हणतात. त्यानंतर सर्वच पोपचे दफन इथे करण्याची प्रथा पडली. या ठिकाणी एका वेळी ५०,०००हून जास्ती प्रेक्षक जमू शकतात. कॅथॉलिक लोकांचे हे पवित्र ठिकाण असल्यामुळे हजारो भाविक येथे गर्दी करतात.



५) Sistine Chapel - हे जगातले एक आश्चर्य म्हणावे लागेल. डोळे दिपवून टाकणारी येथील भिंतीवरची आणि मधल्या डोम वरची चित्रे बघून आपण थक्क होतो. या ठिकाणी मायकेल एंजेलोची शिल्पे, चित्रे आहेत. Statue of Pity हा प्रसिध्द पुतळा येथे आहे.



६) Tivoli garden - रोमपासून साधारण तासभर अंतरावरची ही बाग म्हणजे हजारो कारंजी असलेली ही बाग खूप प्रेक्षणीय आहे. सोळाव्या शतकात तयार केलेली ही बाग एका टेकडीवर वसवली आहे. इटलीतले हे ठिकाण आता युनेस्कोने हेरीटेज घोषित केले आहे.

एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली म्हणजे इथे जाण्यापूर्वी चांगला गृहपाठ करून जायला पाहिजे! आता नेटवर भरपूर माहिती, चित्रे आहेत. मी गेलो तेव्हा या सोयी नव्हत्या. पण माहिती पुस्तिका असत. त्या वाचून जायला पाहिजे होते. शिवाय मुक्काम  दोनच दिवस, म्हणजे फारच अपुरा होता.

हे एक असे शहर आहे की जे बघितल्याखेरीज तुम्ही 'जग बघितले' असे म्हणू शकणार नाही!

पण या जगातली - या शहरातली - माणसे मात्र इतरत्र असतात तशीच आहेत.

हे शहर फक्त इथे येणाऱ्या पर्यटकांमुळेच चालते. तरीही पर्यटकांना लुबाडण्याचे काम जोरात चालते. याचा अनुभव घेतला बाहेर हॉटेलमधे! आपल्याकडे हॉटेलमधे गेलो तर सगळयांना एकच रेट लावला  जातो. पण इथे माणूस बघून त्याप्रमाणे बिल तयार करतात! म्हणजे एकाला  ५० रुपये लावले जातात तर तोच पदार्थ दुसऱ्याला ५०० रुपयाला देतात. हे सर्रास चालते. हल्ली काय परिस्थिती आहे कल्पना नाही. हॉटेलमधे रेड वाईन, व्हाईट वाईन टेबलावर मांडूनच ठेवलेल्या असतात. पाणी मात्र मागवावे लागते. (मला सिंगापूर आठवले. तिथे पर्यटकांना फसवले तर फार कडक शिक्षा आहेत!)

इटालियन पिझ्झा ही मात्र इथली खास चीज आहे. असा पिझ्झा इतरत्र क्वचितच मिळत असेल!

आम्हाला दोन दिवसात जास्तीत जास्त बघायचे होते म्हणून आलेल्या दिवशी संध्याकाळी तीव्होली बाग बघायला गेलो. बसने साधारण तास लागला असेल. मात्र तिथे पाय ठेवल्यावर आपण एका वेगळयाच अद्‌भुत दुनियेत गेलो आहोत ते जाणवले. बघावे तिकडे कारंजीच कारंजी. विविध आकाराची, छोटी मोठी, उंचच उंच उडणारी तर काही थुइंथुइं नाचणारी! आणि अंधार पडल्यामुळे विविध रंगांची उधळण नेत्रदीपक होती. या जादुई नगरीतून पाऊल बाहेर पडत नव्हते.

पण शेवटची बस पकडून परत निघालो. मात्र त्या बसने आम्हाला शहरातल्या मध्यभागापर्यंतच आणून सोडले. तिथून राहायचे हॉटेल लांब होते म्हणून टॅक्सी केली. भली मोठी टॅक्सी होती तरी आम्ही १४ जण असल्यामुळे दोन तरी टॅक्सी  लागल्या असत्या. पण आमच्या म्होरक्याने एकच टॅक्सी आणली. त्या टॅक्सीवाल्याला काय समजावले माहित नाही पण त्याने १४ जणांना घ्यायचे कबूल केले. मागे ४ व त्यांच्या मांडीवर ४ आणि पुढे ३ आणि त्यांच्या मांडीवर ३ असे १४ जण अक्षरश: कोंबून बसलो. हातपाय हलवायला पण जागा नव्हती. सगळे हसत, जोक्स मारत हॉटेलला कधी आलो ते कळलेच नाही!

# लंडन

लंडन बघायला मिळणे हे एके काळी फार भूषण मानले जायचे.  अश्या या साहेब लोकांच्या राजधानी असलेले लंडन शहर बघायला मिळणार म्हणून उत्सुकता होती.

लंडनला बघितलेली काही महत्वाची ठिकाणे -

१) बकिंगहॅम पॅलेस आणि तेथल्या रखवालदारांची ड्युटी बदलतानांची होणारी कवायत बघायला लोक गर्दी करतात. (Buckingham Palace and the Changing of the Guard.)





२) ज्युवेल हाऊस (Jewel House ) आणि टॉवर ऑफ लंडन (Tower of London) जेथे ब्रिटनच्या राणीच्या मुकुटांचे आणि त्यातल्या हिऱ्यांचे आणि इतरही असंख्य रत्ने या ठिकाणी लोकांना बघायला ठेवली आहेत. येथेच कोहिनूर हिरा असलेला राणीचा मुकुट आहे.

हा हिरा परत मिळावा  म्हणून आजपर्यंत केलेले सर्व प्रयत्न असफल झाले आहेत.



३) अल्बर्ट म्युझियम - भवानी तलवार (जिला जगदंबा तलवार असेही संबोधले जाते) ती लंडनच्या या अल्बर्ट म्युझियममध्ये ठेवली आहे. ती परत आणायचे प्रयत्नही असफल झाले आहेत!



४) मादाम तुसाद (Madame Tussauds) London - हे जगभरातल्या निरनिराळया क्षेत्रातील सुप्रसिद्ध  व्यक्तींच्या मेणाच्या पुतळयांसाठी प्रसिद्ध आहे. ॲना मारिया 'मारी' "Marie" तुसाद ही फ्रेंच महिला मेणाची शिल्पे तयार करीत असे. तिने लंडनमध्ये १८३५ साली हे म्युझियम स्थापन केले. तिच्या काही

कलाकृती जुन्या असूनही आजही त्या शाबूत स्थितीत आहेत. आज जगभर त्याच नावाने अनेक ठिकाणी असे म्युझियम्स तयार केले आहेत.



५) बिग बेन - आपल्याकडच्या राजाबाई टॉवर सारखेच दिसणारे हे एक उंच मनोऱ्यावर बसवलेले चारी बाजूने दिसणारे हे घड्याळ आहे. त्याचे टोल (Chimes) आजूबाजूचा आसमंतात ऐकू येतात. हे वेस्ट मिनिस्टरच्या राजवाड्याशेजारी आहे. हल्ली याला एलिझाबेथ टॉवर म्हणतात. याची उंची १८० फुट इतकी आहे.

६) हाईड पार्क (Hyde Park) - हे एक प्रसिद्ध मैदान - पार्क जवळ जवळ ६०० एकरवर वसलेले आहे. या पार्कच्या बाहेर एक कोपरा आहे तो 'Hyde Park's Speakers' Corner ' म्हणून प्रसिद्ध आहे. या ठिकाणी कोणीही उभे राहून जमावापुढे भाषण देऊ शकतो. त्याच्यावर कोणतेही बंधन नसते. फक्त भडकाऊ भाषण करून जर तेथल्या शांततेला धोका निर्माण केला, दंगल माजवली तर मात्र पोलीस येऊन कारवाई करू शकतात.

याच धर्तीवर आपल्याकडे मुंबईत अत्रे कट्टा सुरु झाला आहे.




७) शेक्सपिअरचे जन्मस्थळ - (Stratford-upon-Avon) - ॲव्हान नदीवरचे स्ट्रॅटफोर्ड - हे ठिकाण लंडनपासून (south east) साधारण २२ मैलावर आहे. विशेष म्हणजे अजूनही ते शक्यतो त्या जुन्याकाळात होते तसेच ठेवले आहे.



Anne Hathaway's house



८) क्यू गार्डन्स  - (Kew Gardens) - इथल्या बागेचे वैशिष्ठ्य म्हणजे काचेचा भल्या मोठ्या घरात बाग फुलवली आहे. यात अनेक मोठी झाडे सुद्धा आहेत. काचेच्या घरात असल्यामुळे बाहेरची थंडी जाणवत नाही. आतले हवामान त्या झाडांच्या गरजेनुसार ठेवलेले असते. त्यामुळे यात नारळीची झाडेही बघायला मिळाली.

९) पिकाडेली सर्कस - (Piccadilly Circus) - खरे म्हणजे सहज जाता येताना दिसणारे हे सर्कस म्हणजे सर्कल - चौक आहे.



१०) ट्रॅफल्गार स्क्वेअर (Trafalgar Square) - या चौकात २१८ फुट उंचीचा नेल्सन स्तंभ (Nelson's Column) आहे. ट्रॅफल्गारला झालेल्या लढाईत

नेल्सनने फ्रान्सच्या नेपोलियनचा पराभव केला. त्याच्या सन्मानार्थ स्तंभावर नेल्सनचा पुतळा उभारला असून त्याच्या चार बाजूला चार सिंहाचे पुतळे आहेत.

इथले खास वैशिष्ट्य म्हणजे कबुतरे. असंख्य कबुतरे येथे जमतात. इथेच मिळणारे कबुतरांचे खाद्य लोक त्यांना खायला देतात. आता मात्र हे बंद केले आहे. आणि यापुढे इथे कबुतरे दिसणार नाहीत.

११) टॉवर ब्रिज (Tower Bridge) -



थेम्स नदीवर अनेक पूल आहेत. पण या पुलाचे वेगळेपण असे आहे की मोठी जहाजे जाताना या पुलाचे बरोबर मधे दोन भाग होऊन ते वर उचलले जातात. नंतर पुन्हा खाली आणून रहदारी सुरु होते. यावरून कार, तसेच पादचारीही जाऊ शकतात.

# वॉशिंग्टन

न्यूयॉर्कला उतरलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. आधी मित्राला फोन लावला. त्याने 'कॅब' करून घरी बोलावले. घरी गेल्यावर त्याला माझा प्रोग्रॅम सांगितला. दुसरे दिवशी सकाळी 'नायगारा फॉल्स' बघून रात्री परत येईन तिसरे दिवशी सकाळी वॉशिंग्टनला २-३ दिवसासाठी जाणार मग मात्र परत आल्यावर ४-५ दिवस राहून न्यूयॉर्क बघणार. या काळात त्यांच्या ओळखीने तो मला एक खोली कमी भाड्यात देणार होता. त्याचा तो बिझिनेसच होता.

तो म्हणाला, " एका रात्रीसाठी इथेच माझ्या घरी राहा. मग पुढचे बघू."

दुसरे दिवशी सकाळीस उठून JFK विमान तळ गाठले. 'Subject load' असल्यामुळे दर अर्ध्यातासाने विमाने जात होती पण ५ तास थांबूनही जागा मिळाली नाही. उशिरा गेलो तर नायगाराला मुक्काम करावा लागेल म्हणून परत फिरलो. एक दिवस फुकट गेला आणि नायगाराही हुकला. नंतर कळले की JFK ऐवजी जर आम्ही 'LaGuardia' या डोमेस्टिक तळावरून गेलो असतो तर हमखास नंबर लागला असता! नायगारा नशिबात नव्हता हेच खरे!

रात्री मित्राकडेच राहिलो आणि तिसरे दिवशी सकाळी वॉशिंग्टनला बसने जायचा निर्णय घेतला. 'ग्रेहाऊंड' बसने चार तासात वॉशिंग्टनला पोचलो. एक चांगले झाले. बसने गेल्यामुळे अमेरिकेतील रस्ते, बाजूची नयनमनोहर दृश्ये बघता आली.

ज्यांच्याकडे उतरणार होतो ते मिश्राजी घ्यायला आले होते. दुसरे दिवशी सकाळी National Air and Space Museum आणि Washington Monument ला भेट द्यायचे ठरले.



१) National Air and Space Museum -

या म्युझियममध्ये अनेक ऐतिहासिक विमाने किंवा त्यांच्या प्रतिकृती, स्पेसक्राफ्ट त्यांची मॉडेल्स आहेत. यात राईट बंधूंचे पहिले विमान, Charles Lindbergh चे 'स्पिरीट ऑफ सेंटलुई', अपोलो ११ मोड्यूल, जॉन ग्लेनचे फ्रेन्डशिप ७ कॅप्सूल, ध्वनीपेक्षा जास्त वेगाने उडालेले Bell X-1 वगैर असंख्य गोष्टी आहेत.

या ठिकाणची एक गोष्ट खूप आवडली. एका ठिकाणी प्रेक्षकांना बसायला पायऱ्या पायऱ्यांची आसन व्यवस्था आणि समोर ५ मजली उंचच उंच पडदा! आणि त्यावर दाखवला 'To Fly' या नावाचा २०-२५ मिनिटांचा चित्रपट. बघताना असा भास होत होता की आपण विमानात बसून प्रत्यक्ष उडत आहोत  आणि अगदी जवळून सगळी दृश्ये दिसत आहेत. विलक्षण अनुभव होता तो.



२) Washington Monument -

अमेरिकेचे पहिले अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या स्मरणार्थ हा स्तंभ उभारला आहे. याची उंची ५५४ फुट असून मार्बल, ग्रनाइट आणि ब्लूस्टोन यांनी बांधला आहे. तो जगातला अशा तऱ्हेचा एकमेव स्तंभ आहे.

याचे दुसरे वैशिष्ठ्य म्हणजे हा आतून पोकळ असून लिफ्टने वरच्या टोकापर्यंत जाता येते.



३) अमेरिकेची कॅपिटॉल बिल्डींग (United States Capitol) - याला 'Capitol Building or Capitol Hill' असेही संबोधतात.

ही बिल्डींग कॅपिटॉल हिलच्या टोकावर असून तिच्यात अमेरिकेची कॉंग्रेस, लेजिस्लेटिव्ह ब्रांच इत्यादी ऑफिसेस आहेत.



४) व्हाईट हाउस (The White House) -

या ठिकाणी अमेरिकेच्या अध्यक्षांचे निवासस्थान आहे.

वॉशिंग्टन शहराचे वर्णन करायचे तर म्हणावेसे वाटते की आपण एखादे सुंदर रंगीत चित्रांचे पुस्तक तर बघत नाही ना ?  इतके ते सुरेख आहे. छोट्या छोट्या इमारती, बंगले, भरपूर मोकळी जागा. विलक्षण स्वच्छता, वृक्षराई. सगळेच प्रेक्षणीय.

====================

माझ्याकडे वॉशिंग्टनला राहणाऱ्या एका मराठी कुटुंबासाठी काही पार्सल होते. त्यांना फोन केला. फोन  देशपांडे बाईनीच उचलला. मी म्हणालो, "नमस्कार - मी महाजन पार्ल्याहून इथे वॉशिंग्टनला आलो आहे. तुमच्यासाठी एक पार्सल दिले आहे. पण मला यायला जमणार नाही तर तुम्हीच मी ज्यांच्याकडे उरतलो आहे त्यांच्याकडून तुमच्या सवडीने घेऊन जा."

त्या म्हणाल्या, 'अहो महाजन, तुम्ही इतक्या लांब आलात, पण तुम्हाला आम्हाला भेटावेसे नाही का वाटत ?' मी क्षणभर निरुत्तर झालो. पण सावरून म्हणालो, " तसे नाही पण आम्ही तुम्हाला त्रास देणे योग्य वाटत नाही. आणि शिवाय इथे कसे फिरायचे माहित नाही. ज्यांचाकडे उतरलो आहोत त्यांनाही त्रास होता कामा नये!"

त्या म्हणाल्या, "काही काळजी करू नका माझे मिस्टर तुम्हाला पिकअप करतील. तुमचा प्रोग्राम सांगा."

दुसरे दिवशी त्यांच्या मिस्टरांनी आम्हाला व्हाईट हाऊसजवळून पिकअप केले. घरी असा पाहुणचार केला की जणू आमची खूप जवळची जुनी ओळख आहे. आम्हाला राहायचा खूप आग्रह केला त्यांचा आग्रह मोडवत नव्हता. पुन्हा नक्की राहायला येऊ असे म्हणून निरोप घेतला.

निघताना त्या जे म्हणाल्या ते ऐकून तर वाटले अशीही माणुसकी जपणारी माणसे असतात! त्या म्हणाल्या, "तुमच्या ओळखीचे जर कुणी इकडे येणार असतील तर त्यांना आमचा पत्ता, फोन नंबर नक्की द्या. आम्हाला माणसे आलेली आवडतात! आम्ही त्यांचे स्वागतच करू "

न्यूयॉर्कला परतताना American Airlines ने आलो. विमानात अर्धे प्रवासी एका बाजूला व अर्धे प्रवासी दुसऱ्या बाजूला एकमेकांकडे तोंड करून बसले होते! फारच चमत्कारिक वाटत होते.

==================================

# माझे ॲमस्टरडॅम पोस्टिंग (1979) !




मला जेव्हा कळले कि माझे ॲमस्टरडॅमला एक महिन्यासाठी पोस्टिंग होणार आहे तेव्हा माझा माझ्या कानांवर विश्वासच बसेना! युरोपमधल्या एका मोठ्या शहरातील एअरपोर्टवर काम करण्याची संधी मिळणार हि माझ्यासाठी फार मोठी गोष्ट होती. ॲमस्टरडॅम म्हणजे नेदरलँड्सची राजधानी. पूर्वीचे हॉलंड. 'हॅम्लेट'मुळे प्रसिद्ध. जगप्रसिद्ध कालव्यांचे शहर. समुद्रसपाटीपेक्षा खाली असलेले. जिथे पाण्यात घरे आहेत. ट्युलिप फुलांच्या अतिभव्य बागा आहेत. मी नुसत्या कल्पनेनेच मोहरून गेलो होतो! हवेत तरंगत होतो.





पण तिथे गेल्यावर दोनच दिवसात जमिनीवर आलो! एकापाठोपाठ इतके विचित्र अनुभव आले कि वाटले परत मुंबई गाठावी!

मी एअरपोर्टवर उतरल्यावर माझी बॅग घ्यायला गेलो तर तिथे सामसूम. मग लक्षात आले कि इथे विमान फक्त इंधन घेण्यासाठीच उतरते. प्रवासी ने-आण करायला परवानगी नव्हती. माझी बॅग न्यूयॉर्कला गेली होती. माझा सहकारी म्हणाला काळजी करू नको, आपण विमान न्यूयॉर्कला उतरायच्या आधीच फोन करून सांगू कि बॅग उतरवू नका. विमान परत आले कि बॅग मिळेल. म्हणजे एक दिवस लागणार! तो पर्यंत मला अंगावरच्या कपड्यांवरच काढावे लागणार होते! (हल्लीच्या काळी विमानात बॅग आहे आणि ती ज्याची आहे तो प्रवासी विमानात नाही म्हणजे विमान परत बोलवावे लागले असते ! बापरे !)

दुसरे दिवशी आदल्या दिवशीचेच चुरगळलेले कपडे घालून जावे लागले! माझ्याकडे काही ऑफिसच्या कामाचे महत्वाचे पेपर होते ते हॉटेलमध्येच ठेवले.

एअरपोर्टवरचे ऑफिस मात्र मस्त होते. सर्व बाजूंनी काचा असलेले. त्यामुळे विमानाची ये-जा दिसत होती. एअरपोर्टवरच्या हालचाली दिसत होत्या. आपण इंग्लिश सिनेमात बघतो तसे सगळे होते. चहा / कॉफीसाठी मशीन्स, बीअरचे कॅन्स, बाजूलाच भले मोठे ब्रेडचे आणि चीजचे स्लाईसेस. पाहिजे तितके खा / प्या ! मी स्वप्नात तर नव्हतो ना ?

पहिलाच दिवस असल्यामुळे सहकाऱ्यांनी सांगितले कि आज तू इथेच थांब आणि फोन attend कर. मग दुपारी आपण तुझे आयडी कार्ड काढू म्हणजे उद्यापासून तुला कामाला सुरुवात करता येईल.

सगळा स्टाफ विमान येणार म्हणून बाहेर गेला. मी एकटाच मागे राहिलो. आजूबाजूचे सगळे निरीक्षण करीत होतो. तेव्हड्यात फोन वाजला. मी

फोन घेतला. स्त्रीचा आवाज होता. मी नुसते हॅलो म्हणायचा अवकाश, ती इतके भरभर बोलली कि मला काहीसुद्धा कळले नाही. मी काही म्हणायचा आत तिने फोन ठेऊन दिला ! आता मला काळजीने घेरले. काय सांगितले असेल तिने? मी सहकाऱ्यांना काय सांगू ? साधारण १५ मिनिटांनी पुन्हा फोन वाजला. आता पुरुषाचा आवाज होता. बाकी सगळे आधीच्या फोन सारखेच ! अरे बापरे हे कठीण आहे. मी प्रार्थना करू लागलो कि आता कुणाचा फोन येऊ नये म्हणून ! तर आणखी एक फोन आलाच ! ते काय म्हणत होते यापेक्षा ते कोणत्या भाषेत बोलत होते ते देखील मला कळत नव्हते!

सहकारी आले, त्यांना सगळी कथा सांगितली, तर ते हसायलाच लागले! इकडे माझा जीव मेटाकुटीला आला होता आणि हे हसत होते!

जेव्हा त्यांनी सांगितले कि काही काळजी करू नकोस हे रुटीन कॉल असतात, जेव्हा त्यांना काही महत्वाचे सांगायचे असते तेव्हा ते सावकाश आणि आपल्याला कळेल अशा पद्धतीने सांगतात. डच लोकांचे इंग्लिश उच्चार नीट कळत नाहीत ! त्यांना आपली अडचण माहीत असते ! माझा जीव भांड्यात पडला !

दुपारी बॅग आली आणि खूप बरे वाटले. संध्याकाळी हॉटेलवर गेलो तर सकाळी ठेवलेले ऑफिसचे कागद बेपत्ता ! मी घाईघाईने हाउस किपिंगला फोन लावला. त्यांनी सांगितले कि दुसरे कोणतेच सामान नसल्यामुळे कदाचित रूम खाली असावी म्हणून त्यांनी ते कागद टाकून दिले असतील ! म्हणाले आम्ही प्रयत्न करतो. मी तर आशाच सोडली होती. पण काय आश्चर्य दोन तासात त्यांनी कागद जसेच्या तसे परत आणून दिले ! मी सुटकेचा श्वास सोडला.

रात्री जेवायला मित्रांबरोबर गेलो. मी शाकाहारी असल्याने मित्र म्हणाले व्हेज सूप आणि ब्रेड मागव. मला सूप खूप आवडले. टेस्टी होते. पण बाऊलच्या तळाशी मला काही बारीक बारीक तुकडे दिसले, कडक वाटले. हे कोणते व्हेज

म्हणून विचारले तर म्हणाले ते मटणाचे तुकडे आहेत ! इथे यालाच व्हेज सूप म्हणतात ! मी कपाळाला हात लावला !

अशी दणदणीत सुरुवात झाल्यावर काय बिशाद आहे तेथे काम करायची ? पण मित्रांनी धीर दिला. आणि मीही विचार केला असे माघारी परत गेलो तर लाज जाईल ! अपमान होईल ! त्यापेक्षा आत्मविश्वासाने येईल त्या परिस्थितीला तोंड द्यावे. इथे एवढे सगळे लोक काम करत आहेत मग मला का नाही जमणार ? आणि एकदा तो आत्मविश्वास आल्यामुळे पुढचा महिना मजेत गेला, पण एक अविस्मरणीय आठवण ठेऊन !

ॲमस्टरडॅम येथील लोक शिस्तीबद्दल कमालीचे दक्ष आहेत. त्यांचे दोन अनुभव मी शेअर करीत आहे.

मी जगातल्या एकूण ११ प्रमुख शहरांमधून फिरलो. पण कुठेही एवढा काटेकोरपणा मला आढळला नाही !

१) माझ्या कामाचा एक भाग असा होता कि ज्या कंपनीकडे Cabin Crew आणण्याची जबाबदारी होती, त्यांना फोन करून विमान येण्याची वेळ कळवणे म्हणजे त्याप्रमाणे ते Crewला एअरपोर्टवर घेऊन येत असत.

मी दुसरे दिवशी साधारण तीन तास आधी फोन करून तसे कळवले. मुंबईच्या सवयीप्रमाणे साधारण एक तास आधी आठवण करायला फोन केला तर काहीसे असे उत्तर मिळाले “Sir, you have already informed us. There is no need to remind!” मला जाणीव झाली कि आपण युरोपमधे आहोत!

तिसरे दिवशी मी फक्त एकदाच फोन केला. पण Crew वेळेवर आला नाही म्हणून जो तो मला विचारू लागला. मला कळेना काय झाले असावे ? मी लागलीच त्या कंपनीला फोन केला तर उत्तर मिळाले कि बस वेळेवर गेली होती पण Crew तेथे हजर नव्हता म्हणून बस परत नेली ! मी Crew ला फोन केला तर म्हणाले आम्ही सगळे इथेच होतो, एखाद दुसऱ्या मिनिटाचा फरक झाला असेल !

नंतर दुसरी बस बोलावून Crew ला आणले. त्यात २०-२५ मिनिटे गेली. पण विमान वेळेवर सुटले आणि प्रसंगातून निभावलो. त्यानंतर मात्र ५-१० मिनिटे Crewने आधीच हजर राहावे असे बजावत राहिलो.

२) तिथे रोजच कामावर जावे लागे. एकही दिवस रजा नसे. पण आम्ही आपापसात ठरवून एक दिवस रजा घेत होतो. त्याप्रमाणे १५ दिवसांनी माझा नंबर लागला. मित्रांनी सुचवले कि मी 'एक दिवसाची टूर' घेऊन दिवस कारणी लावावा. मी लागलीच 'ग्रँड हॉलंड टूर' बुक केली. सगळयात महागडी पण जास्तीत जास्त फिरवून आणणारी. सकाळी ७ला पिकप होता. माझ्याबरोबर आणखी ३ मित्र होते. मी सगळयांना बजावले कि कुणीही उशीर करायचा नाही. त्याप्रमाणे आम्ही सगळे सकाळी ठीक ७ वाजता Reception Counter जवळ गोळा झालो. चौकशी केली कि बस कुठे थांबते तर तिथला स्टाफ म्हणाला कि ती काय तुमची बस निघून जात आहे ! आम्ही हतबुद्ध झालो, म्हणालो आत्ताच तर बरोबर ७ वाजत आहेत, बस अशी कशी जाऊ शकते? तर तो स्टाफ म्हणाला "Sir, you should have been there and not here."!

आमचे पडलेले चेहेरे बघून त्याला आमची कीव आली असावी. म्हणाला काळजी करू नका. ती बस आणखी ३-४ हॉटेल्स मधे जाऊन मग मुख्य ऑफिस Dam Square मधे आहे, तेथून ८ वाजता निघेल. तुम्ही Cab करून आरामात

वेळेवर जाऊ शकाल. आम्ही घाईघाईने Cab करून तेथे चांगले अर्धा तास आधी पोचलो!

बरोबर ८ वाजता गाईड बसमधे चढला आणि बस सुरु झाली. त्याने सगळे आलेत का नाही याची साधी चौकशी पण केली नाही !

थोड्याच वेळात त्याने बोलायला सुरुवात केली. अगदी एखादे मशीन बोलावे तशी. साधारण मला वाटते तो ४-५ युरोपियन भाषांमधून कॉमेंटरी करीत असावा. त्याचे इंग्लिश केंव्हा सुरु व्हायचे तेच कळायचे नाही ! आणि इतका फास्ट बोलायचा कि मला काही कळायचे नाही. मी तो नाद सोडला आणि बाहेरची दृष्ये बघायचे ठरवले !

आम्हाला त्या टूरमधे ‘The Hague’ आणि ‘Rotterdam’ अशी दोन शहरे दाखवण्यात आली. म्हणजे बसमधून दिसेल तेवढेच ! आणि आधीच्या लेखात सांगितलेले Madurodam हे ॲमस्टरडॅम शहराचे मॉडेल, शिवाय ट्युलिप फुलांचे जेथे लिलाव केले जातात ते ठिकाण आणि काही कलाकुसरीच्या वस्तूंची दुकाने इत्यादी ठिकाणे दाखवली. ट्युलिप फुलांचा सिझन नसल्यामुळे काही ठिकाणी Tents मधे फुले होती त्यावरच समाधान मानावे लागले ! शेवटाच स्टॉप होता ‘Rotterdam’.

Rotterdam ला एक तासाचा वेळ दिला होता. आसपास भरपूर दुकाने, खाण्यापिण्याची सोय असा माहोल होता. आम्ही मनाला येईल तसा तो तास घालवायचा होता. बरोबर एक तासाने बस सुटणार होती. पण तिचे सुटण्याचे ठिकाण थोडे दूर होते.

गाईडने आम्हाला एक कार्ड दिले होते. त्यावर बसचा नंबर होता. शिवाय खाली सूचना होती कि जर आमची बस चुकली(!) तर ॲमस्टरडॅमला रेल्वेने कसे परतायचे ! हि सुविधा घेणे अर्थातच परवडण्यासारखे नव्हते म्हणून आम्ही सगळेच १० मिनिटे आधीच बसमधे येऊन बसलो! या टूरमधे बहुतेक सारावेळ प्रवास करण्यातच घालवला !

व्यक्तिश: मात्र मला या अनुभवाचा खूप फायदा झाला. मला वेळेचे महत्व कळले. तेथून आल्यावर मी वेळेच्या बाबतीत कमालीचा दक्ष झालो. त्यामुळे ऑफिसमधे मी एक शिस्तप्रिय, वेळेवर येणारा व कोणतेही काम पेंडिंग न ठेवणारा अशी माझी प्रतिमा झाली.

माझ्या खाजगी जीवनातही खूप चांगला फरक पडला.






## ओरिगामी -

मी रिटायर झाल्यावर माझ्या एका पारशी मित्राने मला ओरिगामीचे एक पुस्तक मुद्दाम भेट दिले. उद्देश हा की माझा वेळ चांगला जावा. पण मला वाटले "हे काय, मी काय आता लहान मुलांप्रमाणे कागदी होड्या वगैरे करायच्या की काय ?"

मी त्याचे आभार मानले. नंतर २-३ दिवसांनी पुस्तक काढले व त्यातली एक कृती करायला घेतली. डॅफोडीलचे फुल! खरं म्हणजे तो पर्यंत मी डॅफोडीलचे फुलच काय त्या फुलाचे चित्रही बघितले नव्हते!

४-५ फोल्ड केले आणि पुढे काही जमेना! मला समजून चुकले की हे प्रकरण वाटले तेवढे साधे नाही. त्यानंतर त्या पुस्तकातल्या इतर वस्तू करून बघितल्या काही जमल्या काही अर्धवट राहिल्या.

एक मात्र झाले की मी त्या वस्तू करायच्यामागे लागलो. आपल्याला का येऊ नयेत ? एक आव्हान वाटले आणि काही झाले तरी या सगळ्या वस्तू करायच्याच या वेडाने झपाटला गेलो. बऱ्याच वस्तू हळूहळू जमू लागल्या पण डॅफोडीलचे फुल काही जमेना. यात काही महिने गेले.

एक वर्ष कसे गेले कळले नाही. पण शेवटी डॅफोडीलचे फुल एकदाचे जमले. खाली चित्र दिले आहे. मी फोल्ड केलेले आणि खरे!

दूसरं आयष्य -

तो पारशी मित्र नेहमी म्हण्याचा की माणसाला फक्त एकच आयुष्य असतं तेव्हा जे काय करायचे आताच करून घ्या.

पण त्याला कल्पना नव्हती की त्याने मला चक्क दोन आयुष्ये दिली. या ओरिगामीच्या रूपाने मी अक्षरश: दुसरे आयुष्य जगलो. त्याने मला या अलीबाबाच्या गुहेत नेले आणि मी दिपून गेलो.

मी खास आभार मानायला त्याच्या घरी गेलो होतो. त्याला फार आनंद झाला

आता मला ओरिगामीचे वेड लागले होते. आणखी काही पुस्तके मिळवली. घड्या शिकून घेतल्या. आणि वाटले ही कला आपण इतरानाही शिकवावी. त्यासाठी तयारी केली आणि पहिल्यांदाच धाडस करून एका समारंभात मी माझे ओरीगामीचे प्रात्यक्षिक दाखवले. ते सर्वांना फार आवडले. माझा आत्मविश्वास वाढला.

त्याचा परिमाण असा झाला की माझे हे ओरिगामीचे आयुष्य मला फार मोठ्या उंचीवर घेऊन गेले.

१) मुंबई उपनगरातील अनेक शाळांमधून शिबिरे (कार्यशाळा)

२) प्रदर्शने

३) मुंबईच्या नेहरू सेंटरच्या एसी हॉलपासून ते मराठा कॉलनीतल्या पत्र्याच्या शेडपर्यंत अनेक ठिकाणी शिबिरे

४) ओरिगामी क्लासेस

५) मुंबई बाहेर बोर्डी, केळवा-माहीम, वेंगुर्ले, गोवा, पुणे, नाशिक, पनवेल, ठाणे, येऊर, TJSB बँक वगैरे

६) मुंबई युनिव्हर्सिटीत उन्हाळी शिबिरे

७) घरचा गणपती, सजावट

८) 'मी मराठी' टीव्हीवर सकाळच्या 'मोगरा फुलला' कार्यक्रमात ५ एपिसोड

९) IBN लोकमत टीव्हीवर लाइव्ह शो

१०) E-TV वर

११) जाहिरातीत

१२) रेडीओवर मुलाखत

१३) वैयक्तिक विलक्षण अनुभव

१४) ओरिगामीवर दोन पुस्तके -



श्रीमती अनुराधा गोरे या पार्ले टिळक विद्यालयातील मुलांसाठी सुटीत 'विकसता विकसता विकसावे' हा कार्यक्रम करीत असत त्यात त्यांनी मला संधी दिली. पुढे त्या पोदार हायस्कूलमध्ये मुख्याध्यापिका म्हणून रुजू झाल्या. तेथेही त्यांनी मला मुद्दाम बोलावून मुलासाठी शिबिरे घ्यायची संधी दिली. (२००२-२००६)

मी ओरिगामी मित्र या ग्रुपमध्ये सामील झालो. २००२ साली त्यांनी नेहरू सेंटर येथे भरवलेल्या प्रदर्शनात संधी दिली. माझा सहभाग छोटा असला तरी लोकांना आवडला. माझा हुरूप वाढला.



नोव्हेंबर २००३ साली महाराष्ट्र मित्र मंडळ, एअर इंडियात हवाई वाहतुकीचा इतिहास आणि ओरिगामी असे प्रदर्शन भरवले. खूप छान प्रतिसाद मिळाला.



*****************************************************

## हवाई वाहतुकीचे प्रदर्शन

जानेवारी २००४ : मुंबई युनिव्हर्सिटी, बहि:शाल शिक्षण विभागातर्फे आयोजित केलेले हवाई वाहतुकीचे प्रदर्शन Convocation Hall मध्ये भरवले होते. त्यात माझा सहभाग होता.




त्यावेळी मी माझी ओरिगामीची काही मॉडेल्स शो-पिसेस म्हणून ठेवली होती. ती बहि:शाल शिक्षण विभागाच्या डायरेक्टर श्रीमती मुग्धा कर्णिक यांनी पाहिली. त्यांनी त्या कलेची माहिती करून घेतली व मला युनिव्हर्सिटीच्या फोर्ट कँपसमधे ओरिगामीचा क्लास भरवायची संधी प्राप्त करून दिली.

जवळजवळ ३० विद्यार्थी होते. पाच दिवसाच्या या कार्यशाळेत विद्यार्थी रमून गेले. फार चांगला प्रतिसाद मिळाला.

त्यानंतर बहि:शाल शिक्षण विभागातर्फे

१) फेब्रुवारी २००४ : बोर्डी येथे ३ दिवसांचे एव्हिएशन आणि ओरिगामीचे शिबीर ठेवण्यात आले. अनेक शाळांनी त्यात सहभाग घेतला होता.





२) एप्रिल २००४ : आदर्श विद्यालय, केळवे-माहीम, पालघर येथे ३ दिवसांचे शिबीर भरविण्यात आले.




३) एप्रिल २००४ : रोजी आमराई, मराठा कॉलनी, सांताक्रूझ येथे ओरिगामीचे शिबीर ठेवण्यात आले.



४) नोव्हेंबर २००४ : मुक्तांगण केंद्र, कुडाळ येथे हवाई वाहतुकीचे आणि ओरीगामीचे प्रदर्शन / कार्यशाळा आणि वेंगुर्ले येथे प्रदर्शन व स्लाईड शो




योगायोग म्हणजे बोर्डी, केळवा-माहीम आणि वेंगुर्ले या तीनही ठिकाणी माझे अत्यंत आवडते समुद्र आणि सुंदर, स्वच्छ किनारे आहेत.

वेंगुर्ल्याचा समुद्र गावापासून बराच लांब आहे. पण श्री.देवदत्त परुळेकर ज्यांच्याकडे मी उतरलो होतो त्यांना विनंती केली आणि त्यांनी दोन दिवस संध्याकाळी सूर्यास्ताच्या सुमारास वेंगुर्ल्याच्या अतिशय विस्तीर्ण अशा समुद्र किनारी नेऊन डोळ्याचे पारणे फेडले.

श्री.देवदत्त परुळेकर यांच्या पोर्तुगीज काळातील भल्यामोठ्या वाड्यातच प्रदर्शन, कार्यशाळा आणि स्लाईड शो झाले.

तिथल्या वृत्तपत्रात बातम्या झळकल्या. त्यात विशेष लक्षात आलेली गोष्ट म्हणजे सर्वच वृत्तपत्रात 'ओरिगामी' हा शब्द 'ओरिओगामी' असा छापला होता. ओरिगामीचे 'ओ' लावून केलेले मालवणी रुपांतर मला फार भावले.



'ओरिओगामी'स कुडाळात प्रतिसाद

विमान गाथा प्रदर्शन

पार्ल्यात सगळ्यात मोठे ओरिगामी प्रदर्शन

डिसेंबर २००४ : माझ्या पुढाकाराने पार्ल्यात सगळयात मोठे ओरिगामी प्रदर्शन प्रबोधनकार ठाकरे, स्पोर्ट्स सेंटर येथे भरविण्यात आले. (तीन दिवस). त्यापूर्वी एवढे मोठे प्रदर्शन भरवले गेले नव्हते.

पुण्याहूनही मोठा ग्रुप आला होता. लोकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

यापूर्वी विमानाच्या प्रदर्शनाला आणि त्यानंतर ओरिगामी आणि सदाकोच्या प्रदर्शनाला ज्यांनी जागा तर दिलीच पण प्रोत्साहनही दिले ते डॉ. रमेश प्रभू आज आपल्यात नाहीत. त्यांची आणि माझी खूप जुनी ओळख होती. ते नेहमीच माझ्याशी खूप प्रेमाने, आपुलकीने वागत. मला एकेरी नावाने हाक मारणाऱ्या या प्रेमळ व्यक्तीचे नसणे हे माझे दुर्दैव!

मे २००५ : दरवर्षी प्रमाणे या वर्षीही नेहरू सेंटर, वरळी येथे एक दिवसाची ओरिगामी कार्यशाळा भरविण्यात आली. बृहन्मुंबईतील ७वी-८वीच्या मुलांसाठी ही कार्यशाळा मोफत असते.



मे २०१० : प्रथमच नेहरू सायन्स सेंटर येथे ओरिगामी कार्यशाळा भरविण्यात आली. येथले वैशिष्ट्य म्हणजे मी करून दाखवत  असलेली मॉडेल्स तेथेल्या भव्य पडद्यावर दाखवीत असत. एक वेगळाच अनुभव घेतला.



२५ ऑक्टोबर २००५ : सदाको या जपानी मुलीच्या ५०व्या स्मृतिदिनानिमित्त तिला श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम आखला होता. माझ्या ओरिगामीच्या शिष्यांच्या सहकार्याने दोन दिवसात १००० क्रेन पक्षी केले. ५०-५० माळा करून त्यादिवशी सदाकोच्या प्रतिमेस वाहिल्या.

नंतर त्या माळा जे जे सुटीत आपल्या गावी जाणार होते त्यांना देऊन त्यांच्या गावातील शाळांपर्यंत पोचवल्या.

या कार्यक्रमास डॉ. रमेश प्रभू, डॉ. स्नेहलता देशमुख व प्रा. मोहन आपटे हे प्रमुख अतिथी होते.

मे २००६ : होली स्पिरीट हॉस्पिटल, अंधेरी पूर्व येथे तेथील नर्सेससाठी खास (चार रविवार) शिबीर आयोजित केले होते. त्याचे कारण -

या आधी काही दिवस मी हॉस्पिटलमध्ये आजारपणासाठी दाखल झालो होतो. जरा बरे वाटल्यावर मी ओरिगामी मॉडेल्स करून तेथल्या इतर रोग्यांना देत असे.


शेजारीच लहान मुलांचा वार्ड होता. त्या मुलांना पंख हलवणारे पक्षी करून वाटले. त्यामुळे त्या वार्डातले वातावरण काही काळासाठी का होईना खूप आनंदी झाले.

ते काही नर्सेसनी बघितले. त्यातल्या केरळहून नुकत्याच दाखल झालेल्या दोन मुलींना त्यातले लिलीचे फुल फार आवडले. व मधेच थोडा थोडा वेळ येऊन त्यांनी ते शिकून घेतले. मला त्यांचे फार कौतुक वाटले.

मला डिस्चार्ज मिळणार हे ऐकल्यावर त्या हिरमुसल्या झाल्या आणि म्हणाल्या, " Uncle, you are going?" मला वाटले मी असा पहिला पेशंट असेन की जो घरी जातो ऐकल्यावर नर्सेस अशा नाराज झाल्या असतील!

मी मुख्य डॉक्टर व हेड नर्सशी बोलून दर रविवारी येण्याचे कबूल केले. १०-१२ जणी या कोर्सला हजर होत्या. त्यात त्या मुख्य हेडबाईही होत्या. हे शिबीर करून मला खूप बरे वाटले.

१५-०९-२००७ : डॉ. स्नेहलता देशमुख, भूतपूर्व उपकुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांच्या घरच्या गणपतीच्या दर्शनास येणाऱ्या पाहुण्यांना भेट देण्यासाठी १०० ओरिगामी गणपती करून दिले. मला कळले त्यात श्री मनोहर जोशी, श्री राज ठाकरे अशी नावे होती.



त्यानंतर एके दिवशी मला श्री. गिरीश वासुदेव यांचा फोन आला. डॉ. स्नेहलता देशमुख यांनी दिलेला गणपती त्यांना फार आवडला होता. पण त्यांचा एक मित्र तो घेऊन गेला. त्यांना दुसरा गणपती हवा होता. माझा विश्वास बसेना. एक मोठा अर्थ-तज्ज्ञ माझ्याशी बोलत होता ! मी लागलीच होकार दिला.

२-४ दिवसात टॅक्सी करून गेलो. विचार केला त्यांना दारातूनच गणपती देऊ आणि निरोप घेऊ. एवढ्या मोठ्या व्यक्तीशी मी काय बोलणार ? मी मुद्दामच १०-१२ गणपती आणि काही गुलाबाची फुले करून नेली होती.

मी टॅक्सीवाल्याला थांबायला सांगितले आणि त्यांच्या घरी गेलो. त्यांनीच दार उघडले आणि अगत्याने स्वागत केले. त्यांना गणपती आणि गुलाबाची फुले खूप आवडली. मला आग्रहाने बसवून घेतले आणि भरपूर गप्पा मारल्या. त्यांचा विनोदी स्वभाव मला खूप भावाला. एक तास कसा गेला कळलेच नाही!

निरोप घेऊन खाली उतरताना लक्षात आले की आपण टॅक्सीवाल्याला ५ मिनिटात येतो म्हणून सांगितले होते! बापरे आता काय होईल ? मी खाली येताच टॅक्सीवाला मोठ्या अदबीने टॅक्सीचे दार उघडून उभा राहिला. मला कळेना हा काय चमत्कार आहे ?

मी त्याला सॉरी  म्हणालो. नंतर उलगडा झाला. तो श्री गिरीश वासुदेवाच्या ड्रायव्हरशी बोलत होता. आणि त्यांच्या ड्रायव्हरने साहेब किती मोठे आहेत ते त्याला सांगितले होते. त्यामुळे मीही मोठा झालो. आणि त्याने काही कुरकुर केली नाही!

त्यानंतर साधारण एक महिन्याने श्री गिरीश वासुदेवांचा फोन आला. म्हणाले, "महाजन,  तुमच्यासाठी एक गुड न्यूज आहे. मी दिल्लीला गेलो असताना तुम्ही दिलेल्या गुलाबाच्या फुलांपैकी एक फुल पंतप्रधान श्री. मनमोहन सिंगांना व एक प्रेसिडेंट प्रतिभाताई पाटील यांना दिले.

१५-११-२००७ : टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे भरलेल्या ओरिगामी प्रदर्शनात मी केलेली गुलाबाची फुले दर्शनीच स्वागतासाठी ठेवली होती.



२७-०१-२००८ : पेण येथे भरलेल्या 'Children Future India' या आदिवासी मुलांसाठी तीन दिवसांचे शिबीर ठेवले होते. इतर अनेक संस्थाही त्यात सहभागी झाल्या होत्या.



DNA tribes and trends (15-09-2008) Report by Munira Chendvankar :- (extract)



DNA tribes & trends

MUMBAI

## The immersion of the Origami Ganpati

“ Mahajan has always been fascinated by Origami , the ancient Japanese Art of paper craft, the simple folds, geometry, color and design leave him spellbound.” “There is so much, that can be explored through Origami. It is one of the simplest and most creative art forms, and I use the art to make my Ganapati.” He says, unfolding one of the Modaks to demonstrate the technique.”


11-09-2008 लोकसत्ता :-



“विलेपार्ले येथील मालवीय रोडवर राहणारे रत्नाकर महाजन यांनी आणि त्यांची सून भाग्यश्री महाजन यांनी ही इको फ्रेंडली आरास केली आहे. त्यांच्या घरच्या गणपती भोवतीच्या संपूर्ण सजावटीसाठी कागदांचा वापर करण्यात आला आहे. जपानी ओरिगामी हस्तकलेच्या माध्यमातून केलेली ही आरास अनेकांच्या पसंतीस पडली आहे. केवळ आरासच नव्हे तर इतर शोभेच्या व सजावटीच्या वस्तूही ओरिगामीच्या मदतीने साकारण्यात आल्या आहेत. अत्यंत साधेपणे आरास केल्याने महाजन कुटुंबाचा गणेशोत्सवकाळात होणारा अवास्तव खर्च आणि  श्रम वाचले आहेत. या खेरीज कलात्मक गणेश आणि आरास साकारल्याचा वेगळा आनंद त्यांना मिळाला आहे."

**********************************************

# अकिरा योशिजावा (Akira Yoshizawa ) –






(१९११ - २००५ : ९४ वर्षे)

१९५०-५५ पर्यंत खुद्द जपानमध्ये सुद्धा ओरिगामीचा विशेष प्रसार नव्हता. जपानी महिला लहान मुलांसाठी काही कागदाच्या वस्तू (simple traditional children's folding ) तयार करीत असत.

इतकेच काय ओरिगामी या शब्दाचा देखील वापर होत नव्हता. ' पेपर फोल्डिंग ' हाच शब्द वापरीत असत.

मोठी माणसे कागदाच्या वस्तू करीत असत पण त्यासाठी कागद कापणे, रंगवणे याचा वापर करीत असत.

याच सुमारास (१९५०) अकिराचे या कलेकडे लक्ष वेधले गेले. त्याने कागदाला नुसत्या घड्या घालून, कागद न कापता, न रंगवता वस्तू तयार करायला सुरुवात केली. इतकेच नाही तर घड्या घालण्यासाठी एक चिन्हांची भाषा तयार

केली. त्यामुळे त्याच्या पुस्तकात ज्या आकृत्या असत त्यांच्या साहाय्याने कागद फोल्ड करणे सोपे जाई

त्याची माहिती ' “Asahi Graf” या चित्रमय मासिकाच्या संपादकांपर्यंत पोचली. त्यांनी अकिराला जपानी समजुतीप्रमाणे Zodiac चिन्हाची मॉडेल्स तयार करण्यास सांगितले. अकिराने बारा मोडेल्स तयार केली त्यात ससा, साप आणि ड्रॅगन यांचा समावेश होता. ही चित्रे जेव्हा प्रकशित झाली तेव्हा अकिरा एकदम प्रसिद्धीच्या झोतात आला (१९५२). लोकांना त्याच्या नव्या प्रकारच्या फोल्डिंगचे खूप आकर्षण वाटले. अकिराच्या मॉडेल्सचे प्रदर्शन Gallery of the Toden Service Center in the Ginza या ठिकाणी झाले आणि त्याला जपान बाहेर देखील प्रसिद्धी मिळाली.

Gershon Legman या मुळच्या अमेरिकन पण नंतर फ्रांसमध्ये स्थायिक झालेल्या गृहस्थाने अकिराच्या मॉडेल्सचे प्रदर्शन पॅरिसमध्ये भरवायचे ठरवले. अकिराला त्याच्या गरिबीमुळे इच्छा असूनही प्रत्यक्ष जात येणे शक्य नव्हते म्हणून त्याने पोस्टाने मॉडेल्स तयार करून पाठवली. इतकेच नाहीत तर स्वत:च्या चेहऱ्याचा एक कागदी मुखवटा देखील करून पाठवला.

काही कारणाने पॅरिसमध्ये प्रदर्शन भरू शकले नाही. पण Amsterdam (पूर्वीचे हॉलंड आताचे नेदरलँड्स) येथे १९५५ साली प्रदर्शन भरवले गेले. या प्रदर्शनामुळे अकिराची कीर्ती युरोपमधेच नाही तर इंग्लंड, अमेरिकेतही पोचली.

या प्रदर्शनाच्या यशाची कीर्ती जपान सरकारपर्यंत पोचली आणि त्यांनी अकिराला त्यांच्या देशाचा ओरिगामीचा दूत म्हणून नेमणूक केली. (as an ambassador for Origami and Japanese culture)

अमेरिकेत Lillian Oppenheimer ही महिला पेपरफोल्डिंग करीत असे. तिच्या कानावर अकिराची कीर्ती गेली. अकिराच्या मॉडेल्सचे प्रदर्शन न्यूयॉर्कमध्ये भरवावे असे तिला वाटले. त्याप्रमाणे तिने अकिराशी संपर्क साधला.

अकिराने Gershon Legman ला त्याच्याकडे असलेली अकिराची मॉडेल्स Lillian Oppenheimer ला पाठवायची विनंती केली. त्याप्रमाणे Gershon ने मॉडेल्स न्यूयॉर्कला पाठवली. अकिराने आणखी काही मॉडेल्स करून पाठवली.

अमेरिकेत जास्तीत जास्त ठिकाणी प्रदर्शने भरवावीत असे Lillianला वाटले. त्याप्रमाणे काही महिने अशी प्रदर्शने निरनिराळ्या ठिकाणी भरवली गेली.

शेवटचे प्रदर्शन न्यूयॉर्क येथील जपानी सेंटरमध्ये भरविण्यात आले. दुर्दैवाने तिथे नीट सुरक्षा व्यवस्था नव्हती. लोकांना वाटले की या कागदाच्या वस्तू काही महाग नसतील म्हणून आठवण म्हणून लोकांनी एक एक वस्तू करून सगळ्या वस्तू लंपास केल्या!

Lillianला फार मोठा धक्का बसला. त्यात अनेकांची मॉडेल्स होती. पण अकिराला काय सांगणार ?

तिने ही गोष्ट Gershonच्या पण कानावर घातली नाही.

अकिराने जेव्हा मॉडेल्सची मागणी केली तेव्हा त्याला ती पोस्टाने परत पाठवली आहेत असे खोटेच सांगितले!

तिने ही गोष्ट गुप्त ठेवण्याच्या अटीवर David Lister हा लेख लिहिणाऱ्या या लेखकाच्या कानावर घातली.

शेवटी तिच्या मृत्यूनंतर Davidने ही गोष्ट  अकिराला सांगितली. तेव्हा अकिरला साहजिकच फार दु:ख झाले. पण त्याच्या वैयक्तिक दु:खापेक्षा जग एका ऐतिहासिक ठेव्याला मुकले याचे जास्त दु:ख झाले. (त्याने स्वत:ही जुनी मॉडेल्स ठेवली नव्हती!)

१९९९ साली Gershon Legman चा मृत्यू झाला. त्याच्या विधवा पत्नीने २००३ साली तिच्या नवऱ्याकडे असलेल्या एका खोक्यातील ओरिगामी मॉडेल्स ब्रिटीश ओरिगामी सोसायटीला नेऊन दिली.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिच्या नवऱ्याने अकिराची ४० मॉडेल्स स्वत:कडेच ठेऊन घेतली होती! अकिराला मात्र ४ मॉडेल्सच ठेऊन सगळी न्यूयॉर्कला  पाठवली असे खोटेच सांगितले होते.

ब्रिटीश ओरिगामी सोसायटीने त्यांच्या मासिकात अकिराची मॉडेल्स आणि त्याचा मुखवटा प्रकशित केला. तो अकिराच्या बायकोने बघितला. त्यांनी लागलीच ब्रिटीश ओरिगामी सोसायटीशी संपर्क साधून खरी हकीगत त्यांच्या कानावर घातली.

जेव्हा ब्रिटीश ओरिगामी सोसायटीला खरी गोष्ट कळली तेव्हा त्यांनी ती ४० मॉडेल्स अकिराला  सन्मानपूर्वक परत केली. त्यात त्याचा मुखवटा देखील होता.

अशा रीतीने अकिराला ५० वर्षानंतर त्याची ४० मॉडेल्स परत मिळाली. त्याचा आनंद शब्दातीत होता.

(David Lister यांच्या लेखावरून साभार - 2005)

१) १५-११-२००८ : सुप्रसिद्ध शल्यविशारद डॉ. रामाणी यांच्या गोव्यातील वाडा या गावी (फोंडा शहराजवळ) ओरिगामी शिबीर. श्री. सुदेश हिंगलासपूरकर, ग्रंथाली यांच्या सौजन्याने.




डॉ. रामाणी ओरिगामी मॉडेल बघताना

२) २४-०५-२०१३ : ' ठाणे ग्रुप ऑफ ओरिगामी आर्टिस्ट ' या संस्थेने त्यांच्या प्रदर्शनाचे उद्घाटक आणि प्रमुख अतिथी म्हणून सत्कार केला.




३) ५-७-२०१४ : आफ्रिकन मित्र ओरिगामी शिकताना. सौजन्य श्री देवळेकर सर.



४) १६-११-२०१४ : TJSB –Thane Janata Sahakari Bank – On the occasion of Children' day 14-11-2014 Bank organized Origami Demo/Workshop for their client's children.




१) २-५-२०१५ : येऊर (ठाणे शहरा जवळ) निसर्गाच्या सान्निध्यात ओरिगामी आणि विमानाचा इतिहास यांची माहिती. (Organized by Shri Navin Kale)




२) ९-९-२०१५ : सुमती आश्रमशाळा, त्र्यंबकेश्वर, तळेगाव - Organized by Smt. Anjali Jadhav Shashi, President – Inner Wheel, Nashik




३) ९-९-२०१५ : आदर्श माध्यमिक विद्यालय, नाशिक Origami Ganesh  Demo. Kind favors Mrs. Suvarna Satish Balte, Senior Teacher.



************************************************

आतापर्यंत घेतलेल्या अनेक कार्यशाळेपैकी ही झाली काहींची ओळख. इतक्या विविध ठिकाणी जाता आले, अनेकांच्या ओळखी झाल्या. माझे जीवन समृद्ध झाले.

एका छंदातून, एका कलेतून हे शक्य झाले. कल्पनेपेक्षाही फार मोठे यश मिळाले. हे माझे भाग्यच म्हणायला पाहिजे.

ओरिगामी - विशेष वैयक्तिक अनुभव

आतापर्यंतचा माझा ओरिगामीचा प्रवास आपण बघितलात. यात काही विशेष वैयक्तिक अनुभव आलेत ते आज मी आपल्यासमोर सादर करणार आहे.

१) मी घरी शिकवण्या करीत असे. एकदा एक तरुण प्रौढ मुलगी ओरिगामी शिकायला आली. मी साधारण माझ्या छोट्या टेबलावरच शिकवत असे. कारण त्यामुळे काही चुकले तर लागलीच दुरुस्त करून देणे शक्य होई.

त्या मुलीला मी आधी ओरिगामीची माहिती सांगितली आणि प्रत्यक्ष शिकवणार इतक्यात ती म्हणाली, " सर, खाली बसले तर चालेल का ? मला अनपेक्षित प्रश्न होता. पण लागलीच भानावर येऊन म्हणालो, " हो, चालेल की. थांब मी चटई आणतो." पण तेवढ्यात ती खाली बसली सुद्धा. मग मीही बसलो. तिच्या हातात कागद दिला अन म्हणालो मी करतो तशा घड्या नीट शांतपणे कागदाची टोके जुळवून करायच्या. तिने कागद डाव्या हातात घेतला अन् उजवा पाय पुढे करून पायाचा अंगठा आणि त्याच्या बाजूच्या बोटात कागद धरून अगदी सुरेख घडी केली.

मी अवाक् होऊन बघत राहिलो. तिच्या उजव्या हाताची बोटे तिला वाकवता येत नव्हती. तिने सगळ्या वस्तू अगदी सुरेख केल्या. तिच्या धैर्याला आणि तिच्या जिद्दीला माझे विनम्र अभिवादन.


२) एकदा पोस्टाने दोन जाड पाकिटे आली. त्यावरचे लहान शाळकरी मुलींचे अक्षर कळत होते. मी अधिरतेने उघडून बघितले. त्यात काही ओरिगामीची सपाट मॉडेल्स होती.

पत्रे 'बीड'वरून आली होती. वैष्णवी जाधव आणि वैष्णवी नाईक, दोघी ६ ब, श्री सोमेश्वर कन्या प्रशाला, घाटनांदूर, ता. आंबेजोगाई, जि. बिड.


त्या लिहितात

" सर, तुम्ही लिहिलेल ओरिगामी हे पुस्तक मला खूप आवडले आहे. आमच्या शाळेत एक पुस्तक पेटी आली होती. त्या पेटीमध्ये हे पुस्तक होते. ह्या पुस्तकातल्या काही वस्तू मी तयार केलेल्या आहेत. त्या तुम्ही पहा आणि अशीच खूप पुस्तके लिहा." - वैष्णवी नाईक

" मला हे ओरिगामी पुस्तक खूप आवडले कारण कि ह्या पुस्तकात खूप सुंदर सुंदर पक्षी, प्राणी, फुले अशा वस्तू आहेत. व त्या मी बनविल्याही आहेत. " " पण माझ्याकडे पैसे नव्हते. म्हणून मी तुम्हाला चॉकलेट दिले आहे." - वैष्णवी जाधव.







3) एके दिवशी एक गृहस्थ मला भेटायला आले. त्यावेळेस मी नाशिकला होतो. माझ्या सुनेला त्यांनी जी हकीगत सांगितली ती अशी.

" त्यांच्या मुलाचे एका अपघातात दोन्ही पाय तुटले होते. तो KEM Hosp. मध्ये सहा महिने होता. लवकरच बरा होऊन त्याच्या गावी - दापोलीला जाणार होता. त्याला त्यांच्या ओळखीच्या कुणीतरी माझे ओरिगामीचे पुस्तक भेट म्हणून दिले. त्यात तो मुलगा एवढा रमला की सहा महिन्यात पहिल्यांदाच त्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसला. आणि हे सांगायला ते गृहस्थ थेट माझ्या घरी पार्ल्याला

आले होते." हे ऐकून माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. माझ्या पुस्तकाला यापेक्षा अधिक मोठी दाद कुठची असू शकेल ?

४) एक तरुण पार्ला बिस्कीट फॅक्टरीत शिफ्टमध्ये काम करतोय. तो ओरिगामी शिकायला आला. आल्याआल्या खाली वाकून पायाला स्पर्श करून नमस्कार केला. असे कुणी केले की मला फार संकोचल्यासारखे होते. मी त्याला प्रती नमस्कार केला व नमस्कार देवाला करत जा. मला नको असे विनवले.

जेव्हा तो वस्तू करायला लागला तेव्हा मला जाणवले की माझी घडी पुरी व्हायच्या आत त्याची घडी करून झालेली असे!

५ दिवसांचा कोर्स त्याने २ दिवसात पुरा केला. मग त्याला काय शिकवावे म्हणून मी पुस्तके काढून बसलो तर त्याने प्राणी असलेले पुस्तक निवडले व मला म्हणाला कि सर मी हे पुस्तक घरी घेऊन जाऊ. मी पुस्तक दिले. २ दिवसात त्याने जवळपास १०-१२ प्राणी करून आणले! मी थक्कच झालो. त्यातले कितीतरी प्राणी मी करू शकलो नव्हतो!

काही महिन्यांनी गणपतीचे दिवस होते. त्याने मला आग्रह करून त्याच्या घरी गोरेगावला बोलावले. मी म्हणालो बघतो, जमले तर येईन. तर त्याने हट्टच केला.

पाहिल्या मजल्यावर तो राहत होता. जिन्यापासूनच वस्तू टांगून ठेवल्या होत्या. एवढ्या वस्तू त्याने केव्हा केल्या असतील ? घरात खास प्राणी करून आरास करून ठेवली होती. असे विद्यार्थी मिळाले की खूप हुरूप येतो.




**जे. आर. डी. एक लोभसवाणे व्यक्तिमत्व :**

मला श्री. जे. आर. डींच्या सहवासाची अर्धा तास संधी मिळाली हे माझे भाग्य होय.

मी १९५६ पासून First Flight covers जमवत होतो. त्यापूर्वीची Covers पण मी मिळवली होती. १९९० साली मी त्या Covers चा Album तयार केला.

तो Album श्री. जे. आर. डींना दाखवावा, त्याच्या काही Covers वर स्वाक्षऱ्या घ्याव्यात असे फार मनात होते. तो सुवर्ण योग १० एप्रिल, १९९० साली जुळून आला. श्री. जे. आर. डींची व्यक्तिगत काळजी घेणाऱ्या डॉ. गुल कॉन्ट्रॅक्टर यांच्या सौजन्याने मला संध्याकाळी बरोबर सात वाजता भेटायला बोलावले. मी भीतभीतच आत प्रवेश केला, आपले कसे स्वागत होईल ह्या विषयी मी साशंक होतो.

बाहेरच्या जगाला जेआरडी हे जरी अगदी शांत, सौम्य, गृहस्थ वाटत असले तरी एअर इंडियातल्या आम्हा लोकांना मात्र ते किती कडक शिस्तीचे व रागीट होते याचा अनुभव होता.

मी थोडक्यात प्रस्तावना करून अल्बम जेआरडींच्या हाती दिला. त्यांनी तो मधेच उघडला व पहाता पहाता मागची पुढची पाने चाळूं लागले. माझ्याकडे बघून मला त्यांच्या बाजूला बोलावले. मी त्यांच्या जवळ जाऊन, तेथे अवघडून उभा राहिलो. आणखी काही पाने त्यांनी चाळली व माझ्याकडे बघत "बेसी जानी" म्हणाले. माझ्या मनावरचे दडपण एकदम कमी झाले. सुरुवातीला ते मला प्रश्न विचारत होते मी उत्तरे देत होतो. पुढे मीच त्यांना प्रश्न विचारु लागलो व ते उत्तरे देऊ लागले. त्यांच्या वेळेच्या आठवणी, घटना सांगू लागले. जणू काही आमची खूप जुनी दोस्ती असावी असे ते बोलू लागले. जुन्या आठवणींनी त्यांची कळी खुलून आली. ब्रुसेल्सच्या first flight cover वरच्या चित्रामागची पार्श्वभूमी सांगितली. इतर अनेक गोष्टी सांगितल्या.

एअर इंडियाच्या 'सेंटॉर' या चिन्हाला बदलून १५ ऑक्टोबर १९८९ मध्ये 'उगवत्या सूर्याचे' चिन्ह आणले हे त्यांनाच काय पण आम्हा बहुसंख्य कर्मचाऱ्यांना ते आवडले नव्हते. तो विषय काढतांच ते म्हणाले " I wish Ratan Tata had vetoed it" "मला वाटते रतन टाटांनी तरी त्याला विरोध करायला हवा होता." आणि लागलीच विषय बदलला. त्यांना एअर इंडियाचे लोक विचारीत नाहीत याची खंत वाटत होती. ते दुखावले गेले होते. निराश वाटत होते. डायमंड ज्युबीलीच्या वेळेला केलेल्या भाषणात त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या होत्या.

त्यांच्या सहवासात अर्धा तास कसा व कधी गेला ते कळलेच नाही. जेव्हा मी त्यांच्याकडे माझ्या जवळील त्यांच्या १९६२ सालच्या उड्डाणाच्या कव्हरवर त्यांची स्वाक्षरी मागितली तेव्हा ती त्यांनी दिलीच, शिवाय स्वाक्षरीखाली तारीखही टाकली १५ ऑक्टोबर १९६२. माझे शरीर रोमांचीत झाले. त्यांच्या '१९८२ सालच्या कव्हरवर संदेश मागितला तर माझी आद्याक्षरे विचारली व त्यावर लिहिले "To Mr. R. A. Mahajan with Best Wishes from"

मी उठून निरोप घेणार तो तेच म्हणाले चला आपण सगळेच बरोबर निघू. त्यांच्या केबीनच्या बाहेर पडणार तर स्वतःच दार उघडून धरले व डॉ. गुल नंतर मला बाहेत पडायला सांगून नंतर स्वतः बाहेर पडले. तोच क्रम लिफ्ट मध्ये शिरतांना व बाहेर पडतांना. इतकेच काय रस्त्यावर आल्यावर त्यांच्या कार मध्ये चढण्यापूर्वी माझ्याकडे बघून म्हणाले 'मि. महाजन तुम्ही कुठे रहाता. कसे जाणार. मी तुम्हाला कुठे सोडू का?'

माझ्या सारख्या एका सामान्य माणसालाही असली सौजन्यपूर्ण वागणूक दिलेली पाहून मी भारावून गेलो. पैसा, सत्ता, मानमरातब हे सगळे असूनही सौजन्याचा, माणुसकीचा झरा त्यांच्या ठिकाणी पाहून नतमस्तक झालो.



JRD चे द्रष्टेपण -

राष्ट्रीयीकरणाला विरोध करताना जेआरडींनी रास्त भीती व्यक्त केली होती (आणि पुढे ती खरी ठरली) की,

" Nationalized Airlines would be subject to political influence and pressure in their management with disastrous results in the conduct of a highly specialized industry in which technical progress, safety and business drive and initiative are of paramount importance."

## एअर इंडिया - हीरक महोत्सव. १५ ऑक्टोबर १९९२.

एअर इंडियाच्या स्थापनेला साठ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने एक समारंभ आयोजित केला होता.

ठिकाण - ताजमहाल हॉटेल.

आमच्या डिपार्टमेंटला फक्त काही निवडक लोकांनाच निमंत्रिण होते. माझी खूप जायची इच्छा होती पण माझ्यापेक्षाही सिनियर लोक होते. तरी प्रयत्न करून एक निमंत्रण मिळवलेच.

माझा उद्देश 'First Flight Cover' वर जेआडींची स्वाक्षरी घेणे हाच होता.

कार्यक्रमाला तेव्हाचे सिव्हील एव्हिएशन मिनिस्टर माधवराव शिन्दिया होते.

कार्यक्रम बरोबर १० वा. सुरु होणार होता. १० ला काही सेकंद राहिले असतानाच जेआडींचे आगमन झाले. तेव्हा त्याचे वय होते ८८ वर्षे (मृत्यूपूर्वी एक वर्ष आधी.)

पण मिनिस्टर महाशय त्याच हॉटेलमध्ये असूनही १० मिनिटे उशिरा आले!

भाषणे वगैरे कार्यक्रम झाल्यावर हॉटेलच्या Cristal hall मध्ये शाहीजेवण होते.

पण मी जेआडींपर्यंत कसे पोचता येईल याच विचारात होतो. मिनिस्टर आल्यामुळे सिक्युरीटी होती आणि मला त्यांच्यापर्यंत जाऊ देत नव्हते. मी त्यांच्यापैकी सिक्युरीटीवाल्यांना विनंती केली की मला फक्त स्वाक्षरी हवी आहे. मला जाऊ द्या नाहीतर तुम्ही मला स्वाक्षरी आणून द्या. पण ते कशालाच तयार नव्हते.

जेवायला जेआरेडी, मिनिस्टर, एअर इंडियाचे CMD आणि २-३ व्यक्ती अशी एका टेबलाभोवती बसली होती. मी आशा सोडली नाही. संधी मिळाली की सिक्युरीटीचा डोळा चुकवून घुसायचे ठरवले. वेळ संपत आली. सगळयांची जेवणे झाली. शेवटचा प्रयत्न करायचे ठरवले. वेटरजवळ वशिला लावला. सुदैवाने तो मराठी होता. त्याने कबूल केले आणि त्याने जेआरडी आणि मिनिस्टर अशा दोघांच्याही सह्या मिळवून दिल्या. मी त्या भल्या माणसाचे आभार मानले.

तोवर सगळयाची जेवणे झाली होती. माझे सहकारी निघाले होते. मीही त्यांच्याबरोबर निघालो.

या गडबडीत माझे जेवण राहून गेले. पण माझे पोट भरले होते!




जेआडींच्या काळातील एअर इंडियाचा उत्कर्ष बघितला आणि त्यानंतर सरकारने ताब्यात घेतलेल्या एअर इंडियाची अधोगती पाहावी लागत आहे. बरे झाले जेआडी आज हयात नाहीत! नाहीतर त्यांना काय वाटले असते याची कल्पनाही करवत नाही!

सामान्य माणसाला वाटते, जनतेचा हजारो कोटींचा पैसा सरकार एअर इंडियावर का खर्च करीत आहे ? सरकार याचे उत्तर देत नाही पण खर्च मात्र करीत आहे! यातच सगळे आले!

एअर इंडिया या स्थितीला कोण जबाबदार आहे यावर सुप्रीम कोर्टात म्हणे केस चालू आहे! किती वर्षे चालेल हे कुणी सांगू शकेल का ?

या विषयी वस्तुस्थिती काय आहे ते पाहू या -

१) एअर इंडिया आणि इंडियन एअर लाईन्सचे विलीनीकरण हे एक प्रमुख कारण आहे.

२) एअर इंडियाला नवीन विमाने घ्यायला लावून सरकारने त्यातल्या खर्चाचा वाट उचलायला पाहिजे होता. उलट कंपनीच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा केला.

त्यामुळे bailout package देणे हे सरकारला भाग पडत आहे.

(एअर इंडिया ही इंटरनॅशनल सेवा करीत होती त्यामुळे तिला जगातल्या प्रमुख हवाई कंपन्याशी स्पर्धा करावी लागत असे. तर इंडियन एअरलाईन्स ही देशांतर्गत सेवा करीत होती त्यामुळे तिला कोणाशीही स्पर्धा करावी लागत नसे. त्यामुळे दोन्ही कंपन्याच्या कर्मचाऱ्यांच्या कामामध्ये साम्य नव्हते. तरीही जबरदस्तीने विलीनीकरण केले आणि त्याचे दुष्परिणाम आजतागायत भोगावे लागत आहे. ( थोडक्यात गाडीला एक घोडा आणि एक गाढव जुंपले तर गाडी कशी चालेल ?)

या खेरीज आणखी काही मुद्दे यात जोडणे आवश्यक आहे.

इंडियन एअरलाईन्सने विलिनीकरणापूर्वी मोठ्या प्रमाणावर त्यांच्या कर्मचाऱ्यांना बढत्या देऊन ठेवल्या. त्यामुळे विलीनीकरणानंतर ते कर्मचारी एअर इंडियाच्या सिनियर कर्माच्याऱ्याच्या डोक्यावर येऊन बसले. कुठचेही ट्रेनिंग किवा skill नसताना. याचा फार मोठा फटका कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेवर झाला. आणि शेवटी कंपनीचे नुकसानच झाले.


एअर इंडियात ३८ वर्षे, म्हणजे सगळे आयुष्यच, काढल्यामुळे तिथल्या आठवणी पाठपुरावा करीत आहेत.  असंख्य आठवणी. त्यातही अशा सेक्शनमध्ये की जिथे हजारो 'केबिन क्रु' शी संपर्क येत होता. माणसाचे किती नमुने, स्वभाव पाहायला मिळाले याची गणती नाही. पण एके दिवशी ते सगळे मागे टाकून निवृत्त जीवन जगायला शिकलो.

*************************************************************************

महाजन गुरुजी



(जन्म - ३० एप्रिल १९०७ : निर्वाण - ३० एप्रिल १९७५)



माझी आजी 'सौ. अष्टपुत्रा होती'. पण दुर्दैवाने आजोबांचा अकाली मृत्यू झाला आणि आजीवर आठ मुलांचा सांभाळ करायची जबाबदारी पडली. कोकमठाण येथे ३५ एकर जमीन होती पण तिथे ती का राहिली नाही हे कळायला मार्ग नाही.

ती अंदरसूल येथे राहायला गेली.




माझ्या वडिलांची एकमेव आठवण !

तिचा एक मुलगा लक्ष्मण उर्फ बाळू घर सोडून नाशिकला माधुकरी मागून शिकायला गेला. पुढे लोणावळयाला कैवल्यधाम आश्रमात राहून योगविद्या शिकून बोरीवली येथे कैवल्यधाम आश्रम काढला. (१९४७-४८ चा सुमार). तेव्हा पासून ते महाजन गुरुजी झाले.

पण तिथल्या आदिवासी लोकांची अवस्था बघून त्यांचे मन द्रवले व आश्रम बंद करून आदिवासी सेवेला वाहून घेतले. १९३६-३७ चा सुमार.

माझा मोठा भाऊ पुण्याला शिकत होता. लोकांच्या घरी पूजा करणे अशी कामे करीत असे.

त्यानंतर तो महाजन गुरुजींच्या आश्रमात त्यांच्या मदतीला आला. महानगर पालिकेच्या शाळेत शिक्षकाची नोकरी करून नंतर आश्रमाचे हिशेब पाहणे वगैरे कामे करीत असे. महानगर पालिकेने त्याचा आदर्श शिक्षक म्हणून गौरव केला होता.

गुरुजींनी त्याचे लग्न त्यांच्याच आश्रमात शिकलेला आदिवासी मुलीशी लावून दिले. त्यांना सगळे माई म्हणायचे. थोड्याच दिवसात त्या कुटुंबाचा एक अविभाज्य भाग झाल्या.



नाना आणि माई

स्वभावाने अतिशय मृदू , सर्वांशी मैत्रीची भावना हे माझ्या मोठ्या भावाचे खास गुण होते.

गुरुजींचा आणि त्याचा सर्वांना सार्थ अभिमान आहे.

************************************

पद्माकर महाजन -

पुस्तकांच्या नशेत रंगलेल्या पद्माकर महाजन यांच्याकडे आठ-नऊ हजार पुस्तके आणि ती सुद्धा अत्यंत दुर्मिळ अशी त्यांच्या संग्रही आहेत.

विकास काटदरे - सामना २२ मे १९९४

(२००१ साली मृत्यूपर्यंत त्यांच्याकडील पुस्तकांची संख्या १० हजाराच्यावर गेली होती)

१० मुंबई, संभाजीनगर, रविवार, दि. २२ मे १९९४

# पुस्तकांच्या नशेत रंगलेले महाजन



प्रत्येकाला कोणते ना कोणते व्यसन असतेच. पण 'व्यसन' हा शब्द उच्चारला की दारू पिऊन गटारात लोळणाऱ्या, सिगरेट ओढून छातीचे खोके झालेल्या व्यक्ती डोळ्यांसमोर येतात. काहीजणांना वस्तूंचा संग्रह करण्याचे व्यसन असते, तर काहींना लेखनाचे. आज अशाच पुस्तकांच्या व्यसनात- नशेत रंगलेल्या व्यक्तीचा परिचय आपणास करून देणार आहे. त्या व्यक्तीचे नाव आहे पद्माकर महाजन. त्यांच्याकडे मराठी, इंग्रजी, गुजराती, हिंदी भाषेची कितीतरी चित्रविचित्र, वैचित्र्यपूर्ण, विविध विषयांवरील पुस्तके संग्रही आहेत. आकड्यात विचार करायचा झाला तर जवळजवळ आठ-नऊ हजार पुस्तके आणि तीसुद्धा अत्यंत दुर्मिळ अशी त्यांच्या संग्रही आहेत.

बोरिवलीत कार्टर रोड येथील प्रशांत स्टेट बँक सोसायटीत सर्वसामान्य मध्यमवर्गीयांचे घर असावे असेच त्यांचे घर. त्यांच्या सौभाग्यवती सुप्रिया यांनी व त्यांच्या तरुण मुलांनी स्वागत केले. घरात प्रवेश करण्यापूर्वी वाटले होते, सर्वत्र पु...च आढळतील, पण बाहेरच्या खोलीत पुस्तकांचा मागमूस नव्हता. पद्माकर महाजन आले. त्यांनीदेखील मनापासून स्वागत केले. पुस्तकांचा संग्रह बघण्याची मनात उत्सुकता होती. आतल्या खोलीत पाऊल ठेवताच चौफेर पुस्तकेच पुस्तके दिसत होती. जणू पुस्तकांच्या भिंती त्या खोलीला होत्या. रॅकवर समोवार पुस्तकेच पुस्तके दिसत होती. रॅक पूर्ण

सांस्कृतिक उपासमार होऊ लागली. म्हणून मग स्वतःच पुस्तके घेण्यास सुरुवात केली. पण ती दुकानातील न घेता रस्त्यावर, फूटपाथवर मिळणारी पुस्तके खरेदी करू लागलो. दुकानातील पुस्तके खरेदी करण्यापेक्षा रस्त्यावरील पुस्तके पसंत केली. कारण दुकानात सध्याचे जे लेखक आहेत त्यांची पुस्तके मिळतात, पण जुन्या लेखकांची उदाहरणार्थ ना. सी. फडके, प. गो.

आपल्या संग्रहाबद्दल सांगताना ते पुढे म्हणाले, "माझ्या संग्रहात अनेक

ग. दि. माडगूळकर, वि. द. घाटे अशा मान्यवर लेखकांच्या सह्या ज्या

============================

## 'आठवणीतल्या कविता' (१९८९)

महाजन ही एक विचित्र व्यक्ती आहे. "त्यांच्या रस्त्याला तिसरा फुटपाथ असतो, आणि तो म्हणजे पुस्तकांचा", असं आम्ही नेहमीच थट्टेने म्हणत असतो. फुटपाथवर आढळणारी तऱ्हतऱ्हेची जुनी दुर्मिळ पुस्तके हुडकून विकत घेण्याचा आणि त्यांचा संग्रह करण्याचा त्यांना अनेक वर्षांपासूनचा छंद आहे."

प्रा. रमेश तेंडूलकर - प्रस्तावना 'आठवणीतल्या कविता' (१९८९)

रात्री मी इंटरनेटवरवर सर्फिंग करायचो. त्याच वेळेस 'poetry.com' ची एके रात्री ओळख झाली. जवळपास ५० देशांमधून कविता येत असत. मी त्या कविता वाचण्यात रमलो. बहुतेक कविता सुमार होत्या. पण काही कविता मात्र आवडल्या.

त्या साईटची माहिती घेतली तेव्हा कळले की शब्दांपेक्षा कवितेच्या विषयाला अधिक महत्व दिले जाते. त्यामुळे भाषेच्या मांडणीला फार महत्व नव्हते. कविता करताना शब्द अडले तर तेही पुरवले जायचे यमक जुळवायचे असेल तर तीही मदत तत्परतेने दिली जायची.

ते वाचून मला वाटले की आपणही एखादी कविता पाठवावी. माझी एक जुनी मराठी कविता मला आठवली. ती माझी आयुष्यातील पहिली मराठी कविता. पण कुणी फारसे लक्ष दिले नाही. मी नाउमेद झालो. आणि पुन्हा कविता करायची नाही हे पक्के ठरवले!

पण ती कविता मला आवडली होती. मग तीच शोधून काढली आणि लागलीच तिचे भाषांतर करून त्याच रात्री पाठवून पण दिली.

आणि ४-५ दिवसांनी मला ईमेल मिळाला की माझी कविता त्यांना आवडली आहे. आणि त्या नंतर काही दिवसातच सर्टिफिकेट मिळाल्याचे पण कळवले.

माझी मराठी कविता आणि तिचे मी केलेले भाषांतर पुढे देत आहे.

या कवितेत मला कोणावरही टीका करायची नव्हती. फक्त एक कवी कल्पना म्हणूनच मी त्या कवितेकडे बघत होतो. बस इतकेच.

..................................

कितीं बरं झालं!

कितीं बरं झालं

देवानं आमच्यासाठी हे सुंदर जग निर्माण केलं!

फुला, फळांनी बहरलेली झाडं,

ते हिरवे डोंगर, त्या नद्या,

ते नीळं नीळं आकाश,

एक ना दोन

असंख्य वस्तू डोळयांची पारणं फेडणाऱ्या.

आणि कितीं बरं झालं

आमच्या जिभेचे चोचले पुरवायला

त्यानं निर्माण केलेल्या कोंबड्या, त्यांची कोवळी पिल्लं

गरीब बकऱ्या अन् गुटगुटीत डुकरं

डौलदार मोर, भित्रे ससे

अन् गोंडस हरणं!

आणि कितीं बरं झालं!

त्या असमर्थ जीवांना मारून

त्यात रुचकर मसाले घालून

जिभेला पाणी सुटवणाऱ्या

एका पेक्षा एक सरस

पाककृती करायला लागणारी अक्कलही

त्यानं आम्हाला दिली.

आणि किती बरं झालं!

त्याच दयाळू परमेश्वराने

आमच्यापेक्षा श्रेष्ठ असा दुसरा

प्राणी निर्माण केला नाही

की ज्यानं आम्हाला अन्

आमच्या कच्च्याबच्च्यांना

मारून खाल्लं असतं

चवीनं, मसाले घालून!

किती बरं झालं, किती बरं झालं!

..............................

## How Nice!

The God has created for us

this beautiful Earth

full of trees, rivers, hills

and blue skies!

The God has also

created for us

roosters, chickens, ducks

pigs, rabbits, deer and so on!

The God has bestowed upon us

the brains and skills

to kill these helpless animals

and make delicious dishes

adding spices to taste!

And how nice!

the same kind God has not

created an animal superior to us

in strength and brains

who would kill us and

our little ones

to prepare delicious dishes

adding spices to taste!

How nice, Oh, God!

## English Poems

माझ्या आयुष्यात घडलेला हा एक चमत्कारच म्हणावा लागेल.

मी मराठी माध्यमात शिकलो. मोडके तोडके इंग्रजी येत असल्यामुळे कॉलेज आणि नोकरीत प्रचंड त्रास झाला. त्यातून कसाबसा निभावलो.

पुढे निवृत्त झाल्यावर कधीकाळी आपण इंग्रजीत कविता लिहू आणि तिला पुरस्कार मिळेल असे स्वप्नातही वाटले नव्हते.

पण तसे घडले. इतकेच नाही तर Hat trick साधली.

माझ्या तीन कविता अमेरिकेतील पुस्तकात छापून आल्या. आणि मग मी पुन्हा त्या वाटेला गेलो नाही!



Air hostesses

हवाई सुंदरींविषयी लोकांच्या मनात प्रचंड कुतूहल असते. त्यांच्या विषयी अधिक जाणून घ्यायची इच्छा असते. समाजातल्या अनेक थरांमधून त्या आलेल्या असतात. सिनेजगत, राजकारणी, श्रीमंत आणि अगदी मध्यमवर्गीय थरातून देखील येतात. देशाच्या जवळजवळ सर्व भागातून आलेल्या असतात.

निवृत्त झाल्यावर मी त्यांतल्या काहींशी सार्वजनिक गप्पा मारण्याचा आगळावेगळा कार्यक्रम घडवून आणला. त्याला खूप चांगला प्रतिसाद मिळाला. अशा तऱ्हेचा हा कार्यक्रम त्यापूर्वी कधी कोणी केला नव्हता. ज्यांनी भाग घेतला त्यांनाही तो अनुभव नवाच होता. अनेकजणींना भाग घेता आला नाही म्हणून त्या नाराज होत्या!



१) उजवीकडून पहिली वीरा (सिद्वा) महाजन - (Vera Mahajan) - या पारशी मुलीने महाराष्ट्रीय मुलाशी लग्न केले. त्याकाळी लग्न केल्यावर नोकरीचा राजीनामा द्यावा लागायचा. तिला ते अन्यायकारक वाटले. तिने राजीनामा दिला नाही तर ती एअर इंडिया विरोधात कोर्टात गेली. काही दिवस केस चालली आणि नंतर एअर इंडियानेच माघार घेतली. तिला नोकरी करायची नव्हती. ती तत्वासाठी भांडली. तिने लग्न करायची मुभा मिळवली.

ती एअर इंडियातच नाही तर तिच्या खाजगी जीवनातही आपल्या हक्कासाठी आग्रही असे. तिने मराठी माणसाची लग्न केले. त्यामुळे तिला तिच्या मुलाची पारशी रिवाजाप्रमाणे 'थ्रेड सेरेमनी' करू देत नव्हते ! तिने घरी त्यांच्या समाजातील 'दस्तूर' ला बोलावून ते समारंभ केले. इतकेच नाही तर मराठी रिवाजाप्रमाणे 'मुंज' ही दणक्यात साजरी केली.

तिने सुरु ठेवलेला लढा तिच्यानंतरच्या मुलींनी पुढे चालू ठेवला व २ मुले होईपर्यंत नोकरी करायची मुभा मिळवली. त्यांना वयाच्या ३५ वर्षी निवृत्त व्हावे लागत असे ते वाढवून पुरुषांएवढेच म्हणजे ५८ वर्षांपर्यंत वाढवले गेले. त्यानंतरची पायरी विमानात काम करताना पुरुषांच्या बरोबरीने काम करायचा हक्क मिळवला.

महिलांच्या जिद्दीचा हा मोठा विजय होता.

२) योलांडा परांजपे - मुळची अँग्लो इंडियन. तिने पार्ल्यातील सुप्रसिध्द परांजपे कुटुंबात प्रवेश मिळवला! तिचे चित्त थरारक हवाई अनुभव प्रेक्षकांना खूप भावले.

३) मृणालिनी गोळे - (Gole Mrunalini) - एक आदर्श होस्टेस. खास VVIP फ्लाईटसाठी तिची निवड केली जायची. पंतप्रधान राजीव गांधीच्या विमानातले अनुभव तिने कथन केले. आणि इतरही खूप रंजक माहिती सांगितली.

४) ऋता सामंत (Ruta Samant) - अतिशय स्पष्टवक्ती. आक्रमक पण तरीही दुसऱ्याला त्रास होणार नाही याची काळजी घेत असे. तिच्यात अहमपणा नव्हता पण तिच्या व्यवसायात असलेल्या गैर गोष्टींविषयी स्पष्ट बोलत असे. त्याचप्रमाणे प्रवाशांच्या तऱ्हाही किती विविध अनुभव देऊन जातात हे ती फारच आकर्षकपणे सांगत असे. मी असे तीन कार्यक्रम केले आणि त्या तीनही कार्यक्रमात तिचा सहभाग मोलाचा होता.

५) परचुरे - हिनेही आपले विविध अनुभव सांगून प्रेक्षकांची पसंती मिळवली.

६) दीपा उदित नारायण - नवऱ्याप्रमाणेच गोड गळयाची. तिने चक्क मराठी लावणी सादर केली.

त्यानंतर खास लक्षात राहणारा कार्यक्रम मुंबईच्या प्रसिद्ध वनिता समाजमध्ये २००६ साली झाला.

*****************************************************************

अपवादात्मक पण तरीही कधीही होऊ शकणाऱ्या घटना - अशा वेळेला Crew ची कसोटी लागते.

विमानाच्या या बंदिस्त जागेत साधारण १०-१२ तासात काय होत नाही! डॉक्टरांनी विमान प्रवासाची परवानगी दिली असली तरी ऐन वेळी एखाद्या प्रेग्नंट बाईची डिलिव्हरी होते, मुल जन्माला येते! कोणाचा तरी आकस्मिक मृत्यू होतो!

भांडणे होतात, मारामाऱ्या होतात. दारू पिऊन एखादा प्रवासी दंगामस्ती करतो. त्याला खुर्चीला बांधून ठेवावे लागते! विमान थांबल्यावर त्याच्या स्वागतासाठी लोकल पोलीस हजर असतात!

विमानात Crew ला वापरण्यासाठी एक First Aid Box असते. गरज पडली तर ऑपरेशन्स पण होतात! साधारणपणे प्रत्येक विमानात प्रवास करणारे डॉक्टर असतात! त्यांच्यासाठी एक Physicians Box असते. ती फक्त डॉक्टरच वापरू शकतात. त्यात डॉक्टरांना वापरत येईल अशी Kit असते.

छोटे छोटे अपघात होतात, ओव्हर हेड रॅक (कप्पा) उघडला जाऊन डोक्यावर एखादी जड Hand Bag पडते!

विमान एअरपॉकेटमध्ये सापडले तर भूंकप झाल्यासारखी परिस्थिती होते. एकाएकी विमान काही हजार फुट जागच्या जागी खाली येते. अशावेळी विमानातले सर्व सामान, प्रवासी (ज्यांचा बेल्ट बांधलेला नसतो ते) वरच्या छताला चिटकून बसतात. काहीही हालचाल करता येत नाही. विमान जेव्हा खालच्या हवेच्या थरावर येऊन आदळते तेव्हा सगळे खाली पडतात. तेव्हा इजा होण्याची शक्यता खूप असते. खाद्य-पेये सांडतात. हे फारच क्वचित होते पण शक्यता नाकारता येत नाही! आणि जेव्हा अशी घटना घडते तेव्हाचा अनुभव भयानक असतो.

Emergency Evacuation ची वेळ आली तर घाबरून जाऊन चालत नाही. प्रवाशांना धीर द्यावा लागतो. चेंगराचेंगरी होऊ न देता सर्वांना सुरक्षित खाली उतररावे लागते. दार उघडताच घसरगुंडी आपोआप बाहेर येते.

कधीकधी विमानातले हवेचे प्रेशर कमी होते. Oxygen Mask वापरावे लागतात. सगळ्यांना नीट वापरता येतो असे नाही. लहान मुलांचा प्रॉब्लेम असतो. Crew ला धावत जाऊन अशा प्रवाशांना मदत करावी लागते.

खराब हवामानात विमान हेलकावे खाते. जीव मुठीत धरून बसावे लागते!

विमान उतरताना जर क्रॉस विंड - (तिरपे वारे) - असतील तर landing होताना मोठे हादरे बसतात. वगैरे वगैरे (हल्लीची महाकाय विमाने छोट्या विमानांपेक्षा अधिक भक्कम असतात. त्यात कमी त्रास होतो)

इतर घटना -

व्हेज / नॉनव्हेजचा गोंधळ. प्रवासी आधी नॉन-व्हेज जेवण नोंदवतात. पण वेळेवर त्यांना व्हेज हवे असते. कधी कधी चुकीने व्हेजच्या ऐवजी नॉन-व्हेज दिले जाते! प्याकवर चुकीचे लेबल लावल्यामुळे असा गोंधळ होतो!

प्रवाशाला ग्राउंडवर चुकीची वागणूक दिली गेली तर तो राग विमानातल्या Crewवर काढला जातो!

एखाद्याला तहान लागली आणि पाणी दिले तर इतरांनाही तहान लागते. प्रत्येकाला स्वतंत्रपणे पाणी देणे शक्य नसते! प्रत्येकाला वाटते त्याच्याकडे स्वतंत्र लक्ष द्यावे. पण काही नियम असतात. त्या त्या गोष्टी त्याच क्रमाने कराव्या लागतात. जेवणाचे ट्रे ज्या क्रमाने दिले त्याच क्रमाने उचलले जातात. पण प्रवाशांना धीर नसतो! मुलांना, वृद्धांना शक्य असेल तेथे आधी जेवण दिले जाते. पूर्वी विमानातील प्रवाशांची संख्या बेताची असायची. आता महाकाय विमाने आली आहेत. मला कल्पना नाही. काय होत असेल त्याची. मी माझे अनुभव २०-२५ वर्षांपूर्वीचे सांगत आहेत.

***

## How the departure of the flight is decided ?

## विमान सुटते ती वेळ कशी ठरवतात ?

सर्व साधारण समजूत असते की विमान रनवेवरून हवेत उचलले गेले की ती वेळ विमान उड्डाणाची असे मानत असावेत! पण तसे नाही!

विमान उभे असते त्या भागाला Airport Apron ( पूर्वीचे Ramp) म्हणतात. या भागात विमानाच्या भोवती अनेक लोक काम करीत असतात. विमानाची दारे बंद केल्यावर Push-back Tractor च्या सहाय्याने विमान Apronवरून थोडे मागे ओढले जाते आणि मग ठराविक सुरक्षित अंतरावर गेले की विमानाची इंजिन्स सुरु करतात. जेव्हा इंजिन्स सुरु करतात आणि विमान जागेवरून हलते ती वेळ म्हणजे विमानाचे उड्डाण झाले असे समजतात! याला Chocks Off असेही म्हणतात. Chocks म्हणजे विमानाच्या चाकांच्या दोन्ही बाजूस जे अडथळे - पूर्वी लाकडाचे ठोकळे असत - ठेवतात ते काढले की विमानाची इंजिन्स सुरु करतात व विमान जागेवरून हलते.

त्यामुळे विमानाचे उड्डाण वेळेवर झाले असे म्हणत असले तरी विमान जमिनीवरच असते! ते हळूहळू takeoff pointकडे म्हणजे मुख्य Runway / Taxiway वर जाते आणि नंतर हवेत उड्डाण करते. यासाठी कधी कधी २०-२५ मिनिटे पण लागतात!airport खूप बिझी असेल तर अर्ध्या तासापेक्षाही जास्त वेळ लागू शकतो. परदेशात काही ठिकाणी नंबर लावावे लागतात!

उड्डाणासाठी तीन शब्द वापरले जातात :

1) STD - Scheduled time of departure - वेळापत्रकात दिलेली वेळ. एक लक्षात येईल विमान उड्डाण ५ मिनिटांच्या फरकाने दाखवले जाते. उदा: ८.००, ८.०५, ८.१०, ८.१५ वगैरे. कधीही ८.११ किंवा ८.१३ असे दाखवले जात नाही.

2) ETD - Estimated time of departure - प्रत्यक्षात काही कारणाने विमान जर वेळेवर उडणार नसेल तर अंदाजे वेळ सांगितली जाते. ती ही वेळ. engineering किंवा technical कारणामुळे उशीर होणार असेल तर नक्की वेळ सांगता येत नाही. मग वेळ त्याप्रमाणे वाढवून दिली जाते. त्याला progressive /creeping delay असे म्हणतात. याचा प्रवाशांना फार वैताग येतो. कारण आधी अर्धातास सांगतात मग एक तास असे वाढवीत जातात!

3) ATD - Actual time of departure - प्रत्यक्ष विमानाचे (वर सांगितल्याप्रमाणे) उड्डाण होते ती वेळ.

अशाच प्रकारे विमान येण्याची वेळही दाखवतात.

1) STA - Scheduled time of arrival.

2) ETA - Estimated time of arrival.

3) ATA - Actual time of arrival.

विमान यायला नक्की किती वेळ लागेल ते कधीच सांगता येत नाही. अनेक कारणे असू शकतात. Headwinds - पुढून येणारे वारे असतील तर विमानाला यायला उशीर होतो. Tailwinds - जर विमानाच्या मागून वारे येत असतील तर विमानाचा वेग आणि वाऱ्याचे मागून ढकलणे यामुळे विमान लवकर येते. (वेळेच्या

आधी) Bad weather - खराब हवामान असेल तर वेळ लागतो. Cross Winds - तिरपे वादळी वारे असतील तर विमान उतरवताना खूप खबरदारी घ्यावी लागते. पृथ्वीच्या भोवती वाऱ्याचे करंटस् असतात आणि ते अतिशय वेगाने वाहत असतात.

चित्रात विमाने उड्डाणाच्या लाईनीत उभी आहेत!



*************

Medical emergency.

New Delhi, Feb 17: Air India flight 130 traveling from London Heathrow to Mumbai made a medical emergency landing at the Ankara Airport in Turkey yesterday.

एखाद्या प्रवाशाचे प्राण वाचवायचे असतील तर विमान मधेच non-scheduled halt घेऊन एखाद्या एअरपोर्टवर उतरवले जाते. एअरलाईनला फार मोठा आर्थिक फटका बसतो.

या बातमीत लिहिल्याप्रमाणे अंकारा, टर्की येथे विमान उतरवले. बातमीत पुढे लिहिले आहे की कुणी एक अमृता नावाची प्रवाशी तिथून tweet द्वारे सुषमा स्वराज यांच्याकडे तक्रार करते आणि मदत मागते. तिथली Indian Embassy २ अधिकाऱ्यांना पाठवते. २०० प्रवासी असताना ते काय करू शकतात? तिथल्या अधिकाऱ्यांना विनंती करणे एवढेच त्यांच्या हातात असते.

वेळ काळ बघून आपण काय तक्रार करतो याचेही भान त्या बाईना नसते!

आता त्या बाईची तक्रार बघू या -

१) Medical emergency आहे. आणि अशा ठिकाणी की जेथे एअर इंडियाचे कर्मचारी नाहीत. त्यामुळे त्रास होणारच! आजारी प्रवासी तिचा जवळचा नातेवाईक नसावा नाहीतर अशी तक्रार केली नसती!

२) Cabin Crew हजर नव्हते असे लिहिते. Cabin Crew हे फक्त विमानात सेवा देण्यासाठी असतात. विमान उतरल्याबरोबर त्यांना हॉटेलला

पाठवतात कारण त्यांना 'Horizontal' विश्रांती द्यावी लागते. म्हणजे हॉटेलमध्ये रूम मिळेपर्यंतचा, आणि परत निघे पर्यंतचा वेळ विचारात घ्यावा लागतो.

३) ती विश्रांती लक्षात घेऊन विमान १० तासांनी सोडण्याचे ठरवतात. ते जर airport वर सेवा देत बसले असते तर परतीचे विमान कोणी आणले असते ?

शिकलेले असले तरीही अडाणी असतात ते असे!

********************************

राईट बंधूंच्या पहिल्या उड्डाणाची (१९०३) शताब्दी

१२-६-२००३ : १२-६ ते १८-६-२००३ प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, विलेपार्ले (पूर्व), मुंबई : राईट बंधूंच्या पहिल्या उड्डाणाची (१९०३) शताब्दी साजरी करणारे अति भव्य प्रदर्शन भरवले.

मला वाटले होते फार मोठ्या प्रमाणावर एअर इंडिया आणि इतर एअरलाईन्स हे राईट बंधूंचे शताब्दीवर्ष साजरे करतील. पण तशी काहीच हालचाल दिसली नाही म्हणून मी पुढाकार घेऊन डॉ. रमेश प्रभू यांना विनंती केली आणि त्यांनी लगेच होकार दिला. त्यांच्याकडे फार मोठा हॉल होता. त्याच सुमारास रेल्वेलाही १५० वर्षे पूर्ण झाली होती. तेव्हा त्यांचाही प्रदर्शांत सहभाग करून घेतला.

मी एअर इंडियाने सहभाग घ्यावा म्हणून त्यांच्या publicity भागाकडे गेलो. तर बजेट नाही म्हणून त्यांनी फक्त एक छोटा स्टॉल घ्यायचे कबूल केले. मला आश्चर्य वाटले. मी त्यावेळेचे PR Director, जे माझे एकेकाळचे बॉस होते, त्यांच्याकडे गेलो. त्यांना म्हणालो, " सर, खरे म्हणजे एअर इंडियाने पुढाकार घेऊन शताब्दी साजरी करायला पाहिजे होती. आणि फक्त एक स्टॉल! हे बरोबर नाही "

त्यांना माझे म्हणणे पटले असावे. त्यांचे publicity शी बोलणे झाले. मी त्यांना माझ्यातला अर्धाभाग विनामूल्य द्यायला तयार झालो. पण एक अट घातली की त्यांच्या मेन बिल्डींगमध्ये प्रवेशद्वाराशी असलेले विमानाचे मोठे मॉडेल त्यांनी प्रदर्शनात मांडले पाहिजे! मोठ्या मिनतवारीने तयार झाले. कारण ते मॉडेल खूप महाग होते. त्या मॉडेल बरोबर त्याची Security आणि ते समजावून सांगायला एक Ground Hostess पण दिली! माझी एक इच्छा पुरी झाली. पण तेवढ्याने माझे समाधान झाले नाही!

एअर इंडियाने वापरलेल्या पूर्वीच्या विमानांची मॉडेल्स एअर इंडियाकडे होती. ती त्यांनी मांडावीत अशी मी विनंती केली. पण ती मॉडेल्स प्रेक्षकांनी हाताळली तर मोडतील किंवा खराब होतील म्हणून नकार दिला. पण खूप आर्जव केले व अशी संधी त्यांनी सोडू नये अशी विनंती केली. त्यांना काय वाटले माहित नाही पण त्यांनीच सर्व मॉडेल्सला काचेची कव्हर्स बसवली व प्रदर्शांत मांडून प्रदर्शनाला फार मोठी शोभा आणली. अशा रीतीने माझी दुसरीही इच्छा पूर्ण झाली. प्रदर्शन खूप गाजले. उपराष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटन झाले. जणू माझे स्वप्नच पूर्ण झाले!

प्रदर्शनात माझाही फार मोठा सहभाग होता. मी विमानांच्या इतिहासाची माहिती देणारे काही माहिती-फलक तयार केले होते. तेही लोकांना खूप आवडले. शिवाय काही विमाने तयार करून उडवता येतील अशी माहिती देणारे, विमानाची मॉडेल्स जमवणारे यांचेही स्टॉल्स होते.







======================

१) ग्रंथालीच्या 'ज्ञानयज्ञ'मध्ये माझे पहिले पुस्तक एअर इंडियाचा इतिहास लिहिले. (२०००). 'पूस मॉथ ते डॅश ४००'. 'पूस मॉथ' आणि 'बोईंग ७४७ -४००' ही विमानाची नावे आहेत.

याच सुमारास असा विचार केला की एअर इंडियाचा इतिहास लिहिला तसा जागतिक हवाई वाहतुकीचा इतिहासही लिहावा. आणि त्याप्रमाणे ग्रंथालीच्या 'ज्ञानयज्ञ'मध्येच

२) 'आकाशगामी' हे पुस्तक लिहिले. (२००२) ग्रंथालीच्या या 'ज्ञानयज्ञ'मध्ये पुस्तकाच्या पृष्ठसंख्येवर बंधन होते. त्यामुळे फारच थोडक्यात लिहावे लागले. त्याने समाधान झाले नाही. हवाई क्षेत्रातील अनेक दिग्गज व्यक्तींची माहिती लिहावी असा मानस होता. त्याप्रमाणे


३) 'एव्हिएटर्स' हे पुस्तक 'फुलराणी प्रकाशन'तर्फे प्रकाशित केले. (२००८)


मध्यंतरीच्या काळात ओरिगामीशी सलगी केली आणि पुढील दोन पुस्तके लिहिली.



४) ओरिगामी (मराठी) (२०१०) - ज्योत्स्ना प्रकाशन

५) ओरिगामी (इंग्लिश) (२०१२) - ज्योत्स्ना प्रकाशन




ई-बुक्स -

१) 'पंख' (2013) ई-साहित्य प्रतिष्ठान -

हे पुस्तकही हवाई वाहतुकीचा इतिहास याच विषयावर आहे. पहिल्या तीन पुस्तकांमध्ये एक मोठी उणीव होती - ती म्हणजे त्यात चित्रे फारच कमी टाकता आली. आणि छापील पुस्तकावर हे बंधन असणारच कारण रंगीत चित्रे छापणे फार खर्चिक असते. पुस्तकाची किंमतही वाढली असती. पण या ई - पुस्तकाच्या दोन भागात मिळून २०० च्या वर चित्रे आहेत.

२) 'धर्मग्रंथ' (2014) ई-साहित्य प्रतिष्ठान -

आपल्या धर्मग्रंथांविषयी ऐकीव माहिती होती. ती वाचत असताना (भाषांतरे) जाणवले की ही माहिती संग्रहित करावी म्हणजे इतरानाही कळेल. या पुस्तकात -

वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे, उपवेद, रामायण, महाभारत, हरिवंश/भागवत, वेदांगे, इत्यादी ग्रंथांची ओळख करून दिली आहे.

३) 'आता वंदू कवीश्वर' - मराठी कवितेचा मागोवा घेणारे हे पुस्तक तीन भागात असून त्यात आद्य काव्य ग्रंथ गाथासप्तशती - इसवी सनाचे पहिले शतक पासून ते आजतागायत पर्यंतच्या प्रमुख कवींचा आणि त्यांच्या कवितांचा आलेख मांडला आहे.

पंख, धर्मग्रंथ आणि आता वंदू कवीश्वर ही तीनही पुस्तके ई-साहित्य प्रतिष्ठानने ई - बुक स्वरुपात प्रकाशित केली आहेत. सर्व पुस्तके फ्री असून तुम्ही esahity.com या साईटवरून downlod करू शकता.


ही पुस्तके लिहिताना (सर्व पुस्तके मी मराठीत टाईप केली आहेत) मला अनेक ग्रंथ वाचावे लागले. त्यात मी माझे देहभान, माझे आजारपण विसरून जात होतो. हा अनुभव खूप आनंददायी होता. वाचकांनाही ही पुस्तके भावतील अशी खात्री वाटते.











एकेकाळी आकाशात विमानांची घरघर ऐकू आली की माणूस आकाशात उडतोय ही कल्पनाच रोमांचित करायची !

" हे विमान फिरते अधांतरी -

घुमघुम नादे दिशा घुमवूनी

प्रवास करी हे जगावरी "

आता सामान्य माणूसही विमानाने प्रवास करू शकतो.

दुसऱ्या महायुद्धापर्यंत (१९४५) विमाने ही युद्धात वापरायची वस्तू आहे असाच समज रूढ होता. दुसरे महायुद्ध संपले आणि अक्षरश: लाखो विमाने आणि वैमानिक कामाविना रिकामे राहिले !

पहिल्यांदा लोकं विमानात बसायला घाबरायचे. मग काही stunt बहाद्दर चालत्या विमानावर कसरती करून दाखवायचे. काही वैमानिकांनी

शहराशहरातून लोकांना फुकट 'Joy Rides' द्यायला सुरुवात केली.

त्याचा योग्य तो परिणाम झाला आणि हळूहळू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायला विमाने जलद आणि सोयीची वाटू लागली.

यातूनच पुढे कमर्शियल एव्हिएशनला सुरुवात झाली.

*********************************************

चाळीतून वन रूम किचन Self contained फ्ल्याटमध्ये येणे म्हणजे नरकातून स्वर्गात आल्यासारखे वाटत असेल का ?

संगणक - एक चमत्कार !

आमच्या लहानपणी संगणक हे कल्पनेतही नव्हते ! आता संगणकाचा प्रसार सर्वत्र झाला आहे. जीवनाचा तो एक अविभाज्य भाग झाला आहे. त्यातच मोबाईलवरही संगणक वापरता येतो. हे म्हणजे दुग्ध शर्करा योग !

मी सुरुवातीच्या काळापासून याची स्थित्यंतरे बघितली आहेत. आधी flopies मग compact disk नंतर Cds / DVDs आणि आता USB storage, External हार्ड डिस्क वगैरे.

संगणकाच्या सहाय्याने काय करता येते यापेक्षा काय करता येत नाही याचे उत्तर देणे सोपे आहे !

माणसाची क्षमता कित्येक पटीने वाढली आहे. अचूक, वेग हे याचे खास वैशिष्ट्य ! आपल्या आयुष्यातील असे एकही क्षेत्र नाही की जिथे संगणकाचा उपयोग नाही ! ई-मेल, ई-कॉमर्स, ई-चॅट अशी फार मोठी जंत्री आहे.

चाळ संस्कृतीत एक (सिंगल) खोली १०'x१०'ची असायची. त्यातच मोरी, स्वयंपाकासाठी एक बैठा छोटा ओटा, एखादी खुर्ची आणि एक खाटले (बाज), एक लाकडी कपाट एवढे असले की खोली गच्च भरायची.

मोरीत सचैल स्नान करायचे ! (म्हणजे अंगावर कमीत कमी कपडे ठेवून!)

माझे शालेय आणि कॉलेजचे शिक्षण एवढ्याश्या खोलीत झाले. घरात तीन माणसे. आई, माझा धाकटा भाऊ आणि मी ! बाहेर ओटा होता त्यावर आई झोपायची.

पुढे पडदा लावून घेतल्यामुळे आडोसा करता  येत होता. पावसाळयात खूप त्रास सहन करावा लागायचा.

प्रातर्विधीसाठी जी व्यवस्था होती ती आठवली की अजूनही अंगावर काटा येतो !

------------------

पाण्यासाठी विहीर. रात्री उजेडासाठी कंदील, सुंदऱ्या (चिमण्या - छोटे दिवे).

डांस, झुरळे आणि उंदीर हे सहज वावरत असत. त्यांचा बंदोबस्त करणे सर्वस्वी अशक्य होते.

आता : स्वतंत्र बाथरूम, स्वयंपाक घरात उभ्याचा ओटा, डायनिंग टेबल, स्वतंत्र बेडरूम, दारांना पडदे, वाशिंग मशीन, फ्रीज, वातानुकूलित यंत्रे, घरातच toilet किती तरी वस्तू - सगळेच अद्‌भुत, विलक्षण.

-------------------

हात दुखवून टाकणारे शिंदीच्या पानाचे हात पंखे जाऊन विजेचे पंखे आले.

आता : नुसते बटन दाबले की वाऱ्याचा झोत अंगावर येतो. तो पाहिजे तसा कमी जास्त देखील करता येतो.

वातानुकूलीत यंत्रे आल्यामुळे मुंबईसारख्या उकाड्याने हैराण करणाऱ्या हवामानाचा त्रास सहन करावा लागत नाही. अगदी blanket घेऊन झोपावे इतके हवामान थंड करता येते !

----------------------

रेडिओ ही एकेकाळी फक्त श्रीमंतांना परवडणारी चैन होती. त्यानंतर ट्रांझिस्टर आले. Black and white TV आले. ते नंतर रंगीत झाले !

रिमोट कंट्रोल ही एक अद्भुत वस्तू आली. मध्ये वायर नसतांही ती कशी काम करते हा एक चमत्कारच  होता !

-----------------------------

मुंबईत क्रॉस मैदानावर एक प्रदर्शन भरले होते. त्याच्या जाहिरातीत " तुमचा आवाज तुम्ही ऐका "

अशी एक 'चमत्कार' असलेली गोष्ट होती. तीच ' टेपरेकॉर्डर ' म्हणून पुढे घरोघर अवतरली. त्या प्रदर्शनात तुमचा आवाज टेप करून तुम्हाला ऐकवला जायचा ! लोकांनी प्रचंड गर्दी केली होती त्या स्टॉलवर.

------------------------

एके काळी सार्वजनिक फोन  नावाची एक अतिशय उपयुक्त वस्तू पण  क्वचितच चालू स्थितीत असलेली अशी वस्तू अनेक ठिकाणी बसवलेली होती. पण लोकांनी त्या वस्तूची पार वाट लावून टाकली होती. त्यात छोटे दगड, माती काय वाट्टेल ते टाकून ठेवलेले असायचे. फोन चालू असेल तर नाणे टाकायच्या जागी एक पट्टी आत घातली काम  व्हायचे. फोन झाला की पट्टी बाहेर काढून पुन्हा वापरता यायची !

फोनचे वैशिष्ट्य म्हणजे लोकल कॉल असला तरी मोठाने ओरडून बोलले तरच ऐकू जायचे.  त्यामुळे संभाषण जवळपास अशक्यच. जेमतेम निरोप देता आला तरी

पुष्कळ झाले असे वाटायचे ! ऐकणाराला कानावर रिसिव्हर एवढा दाबून ठेवावा लागे की कान लाल व्हायचा !

आता : 'व्हीस्पर' केले तरी ऐकू जाते. आणि मोबाईलने तर क्रांतीच केली आहे. तो घेऊन तुम्ही कुठेही जाऊ शकता व कुठूनही फोन करू शकता. शिवाय त्यात संगीत ऐकता येते, फोटो काढता येतात. फोटो पाठवता येतात. फार मोठी क्रांती घडवली आहे या छोटाशा अद्भुत डबीने !

--------------------------------

भाग्यवान मी -

कुठल्यातरी अज्ञात, गूढ, अनाकलनीय, अतिप्रचंड शक्तीने हे अनंत विश्व निर्माण केले.

त्यात पृथ्वीसारख्या  नितांत सुंदर ग्रहावर, प्राण्यांमधल्या सर्वश्रेष्ठ अशा मानवाचा हा दुर्मिळ जन्म मला लाभला.

हा योगायोग, नियती, प्रारब्ध, दैवयोग की आणखी काही ?

--------------------------------------------------------------------

आपण सारेच 'एकमेवाद्वितीय' !

आणि विशेष म्हणजे 'माझ्यासारखा मीच ' ! एकमेव. या पूर्वी कोणी होऊन गेला नाही, आजही नाही आणि यापुढेही होणार नाही !

या बाबतीत मीच काय आपण सगळेच भाग्यवान म्हंटले पाहिजे ! आपण किती दुर्मिळ आहोत, किती 'स्पेशल' आहोत हे कळले तर एक क्षणही वाया घालवता येणार नाही ! कारण आयुष्य खूप छोटे आहे, क्षणभंगुर आहे ! पुढील क्षणी काय होईल ते माहित नाहीत. अशावेळी मिळालेले आयुष्य कसे जगायचे ते ठरवणे फार महत्वाचे आहे.

---------------------------------------------------------------------

मी भारतात जन्मलो तेव्हा देश अखंड होता. परंतु परकीयांचा गुलाम होता. ब्रिटिशांच्या गुलामीत होता.

ही झाली माझ्या जन्मकाळची गोष्ट म्हणजे १९३६ सालची.

त्यानंतर १९४७ साली, मी ११ वर्षांचा होतो तेव्हा, आपला देश स्वतंत्र झाला पण देशाची फाळणी होऊन ! पाकिस्तानच्या रूपाने एक कायमचा शत्रू मिळाला !

बांगला देश आज स्वतंत्र राष्ट्र म्हणून मिरवत असला तरी सुरुवातीला तो पाकिस्तानचाच एक भाग होता. तो स्वतंत्र झाला नसता, तर पाकिस्तान जगातला असा एक देश राहिला असता की जो एकाच परकीय देशात दोन ठिकाणी विभागला गेलेला आहे !

आणि निझामाचे हैदराबाद राज्य जर वेळीच हस्तक्षेप केला नसता तर तिसरे पाकिस्तान झाले असते !

शिवाय श्रीलंका, नेपाळ, भूतान ही राष्ट्रे निर्माण झाली ! त्यासाठी कोण लढले ? का लढले ? त्यांना भारताबरोबर का राहायचे नव्हते ? अनेक प्रश्न अनेक शंका ?

--------------------------------------------------------

आणि आणखी एक योगायोग !

विसाव्या शतकात जन्माला येऊन एकविसाव्या शतकात प्रवेश करता आला हेही अप्रूपच !

----------------------------------------------------------

त्या नंतरच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानातली डोळे दिपवून टाकणारी ' आधुनिक प्रगती ' ' याची डोळा ' पाहायला मिळाली. अगदी दोन टोके म्हंटली तरी चालेल !

माझ्या लहानपणी चंद्रावर ससा किंवा हरण आहे असे सांगितले जायचे व ते आम्हाला इथून थेट दिसायचे ! १९६९ साली मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले. विश्वास बसणार नाही अशी अभूतपूर्व, विस्मयाने थक्क करणारी घटना देखील पाहायला मिळाली.

पण चंद्रावर ससा किंवा हरण नसून फक्त दगड, धोंडे व मातीच आहे हे ऐकून मात्र खूप निराशा झाली ! इतकेच काय पण चंद्रावर अतिशय विरळ  हवामान आहे. गुरुत्वाकर्षण अगदी कमी, पाणी नाही म्हणून झाडे नाहीत, फुले नाहीत की फळे नाहीत, की प्राणी, माणसेही नाहीत. थोडक्यात काय तर चंद्रावर काहीही नाही !

-----------------------------------------------------------------------

पण गेल्या ६०-७० वर्षात अनेक सुधारणा झाल्या.

तेव्हा आणि आता.

मी १९४६ साली मुंबई उपनगरात चाळीत राहायला आलो. त्याकाळी कनिष्ठ मध्यमवर्ग चाळीतच राहायचा ! नळाचे पाणी नव्हते ! विहिरी होत्या. उन्हाळयात विहिरीचे पाणी खूप खोल जायचे. पोहोऱ्याने किंवा बादलीतून पाणी रहाटाने ओढून काढावे लागे. हाताला दोराचे घट्टे पडायचे. हात दुखून यायचे.

पण आता नुसता नळ सुरु केला की धो धो पाणीच !

---


वीज नव्हती. रॉकेलचे कंदील आणि मिणमिणते दिवे होते. कंदिलाच्या काचा रोजच्या रोज साफ कराव्या लागायच्या. वाती सारख्या करणे, रॉकेल भरणे असे सगळे सोपस्कार करावे लागत.

आता बटन दाबले की लख्ख प्रकाश !

---

गॅसच्या शेगड्या नव्हत्या. कोळशाच्या किंवा लाकडाच्या भूशाच्या शेगड्या वापरायच्या. शिवाय जरा बरी परिस्थिती असेल तर रॉकेलचे स्टोव्हज् असायचे. त्यात रॉकेल भरणे, बर्नरला पिन करणे, बर्नर तापावा म्हणून रॉकेलचा किंवा स्पिरिटचा काकडा वापरणे. स्टोव्ह भडकू नये म्हणून काळजी घेणे ! अशा अनेक गोष्टी कराव्या लागायच्या.

आता गॅसच्या रेग्युलेटरचे बटन पिळले की निळी ज्योत असलेली शेगडी क्षणात चालू होते !

---

## येऊ नको म्हटलं तरी येत म्हातारपण!

दुर्मिळ जन्म -

माणसाचा हा जन्म अतिशय दुर्मिळ आहे. ही संधी फक्त एकदाच मिळते. तेव्हा तिचा अतिशय विचारपूर्वक उपयोग करून घ्यायाला पाहिजे. क्षण अन् क्षण आनंदानं जगून इतरांनाही आनंद द्यायला पाहिजे. खरे म्हणजे हि जाणीव तरुणपणीच व्हायला पाहिजे! पण तसे होताना दिसत नाही. म्हातारपणी मात्र हि जाणीव प्रकर्षाने जाणवते याचे कारण यावेळी आयुष्याचे ‘Countdown‘ सुरु झालेले असते!

निवृतीच वय साधारण ६० वर्षाचं धरलं तर आपल्याला वयाची ८५ वर्षे होईपर्यंतची २५ वर्षे तरी काहीतरी करून दाखवायची संधी मिळते. आपलं ज्ञान, आपला अनुभव यांचा आपल्या कुटुंबाला तसेच समाजालाही काही उपयोग करून देता येतो. अनेक सामाजिक संस्थांमध्ये त्यामुळेच निवृत्त लोकांचा सहभाग जास्तीप्रमाणात आढळून येतो. समाजकार्यात अनेक प्रकारे सहभागी होता येते.

पण जे हे करू शकत नाहीत त्यांच्यासाठी :-

म्हातारपणीचा काळ सुखाचा!

या वयात आपल्याला कसल्याही काळज्या, चिंता करायाची गरज नसते. संसाराची धुरा मुलांवर सोपवून आपण निश्चिंत झालेलो असतो. दोनवेळ खाणं अन् दिवसभर मस्त मनासारखं जगणं आपल्याला शक्य होतं.

आपण आपल्या आवडीनिवडी, छंद जोपासू शकतो! सकाळ संध्याकाळ फिरायला जाणं, टीव्ही बघणं, गाणी ऐकणं, वाचन करणं, दोस्तांबरोबर गप्पा मारणं, हास्यविनोद करणं अशा एक ना दोन असंख्य गोष्टी मनसोक्त करू शकतो!

मुंबईसारख्या शहरात समुद्रावर, नाना-नानी पार्कमध्ये जाऊन जीव रमवता येतो! ज्येष्ठांच्या संस्था, सामाजिक कार्य यात भाग घेता येतो.

आपलीच आपल्याला नव्याने ओळख!

कधीकधी आपल्याला आपलीच नीट ओळख झालेली नसते. त्यासाठी कधी निवांत वेळही मिळालेला नसतो आणि आपण तसा कधी विचारही केलेला नसतो! आता आपण चित्रे काढून बघू शकतो, एखाद वाद्य वाजवून बघू शकतो, कविता करून बघू शकतो. कदाचित आपल्याला आपलीच नव्याने ओळख होऊ शकते!

छंद जोपासनं हि एक फार मोठी गोष्ट आहे. त्यामुळे आपण आपल्या व्याधी विसरू शकतो. इतकच काय आपल्या काही व्याधी बऱ्या होण्यासही त्यामुळे मदत होते!

बालगोपाळांचा / पाळीव प्राण्याचा सहवास -

ज्यांना शक्य आहे त्यांनी नातवंडांशी, शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मुलांशी खेळण्यात वेळ घालवावा. पण जर हे शक्य नसेल तर प्राणी, पक्षी पाळावेत. माशांचे ‘फिश टॅंक’ ठेवावेत. वेळ मजेत जाईल. अर्थात हे छंद खर्चिक आहे. सर्वांना परवडणारे नाहीत!

निसर्गाचं सानिध्य – आपण आपल्या भोवतालचा निसर्ग बघू शकतो. झाडं, फुलं, फळं, पक्षी अशा असंख्य गोष्टींनी हा निसर्ग बहरलेला आहे. त्याचं निरीक्षण खूप आनंद देऊन जाईल.

संगीत ही एक फार मोठी देणगी आहे. संगीतात नुसते मनोरंजन नसते तर तर ते थेट तुमच्या अंत:करणाला जाऊन भिडते. याला खर्च पडत नाही.

अनमोल वरदान – हल्ली टीव्ही हे एक अनमोल वरदान आहे. मुलांना, नातवंडांना वेळ नसतो अशा वेळी मराठी मालिकांमधल्या व्यक्तिरेखांशी तुम्ही जोडले जाता! तुमचा वेळ चांगला जातो! करमणुकी बरोबरच अनिमल प्ल्यॅनेट, डिस्कव्हरी चॅनल

असे काही चॅनल जे ज्ञान व मनोरंजन दोन्ही करतात. अनेक प्रकार उपलब्ध आहेत. त्यांचा आस्वाद घ्यावा.

निवृत्ती -

आपल्या आयुष्यातील हा एक असा दिवस असतो कि आपल्याला जाणीव होते कि आता आपण अर्थार्जन करायला सक्षम नाही! हा एक फार मोठा मानसिक आघात सहन करावा लागतो. मना विरुद्ध घरी बसाव लागतं! हल्ली वयोमान वाढल्यामुळे निवृत्तीचा काळ फार लवकर येतो आहे असे वाटते!

आदर्श कुटुंब –

ज्या कुटुंबात आजी-आजोबा असतात, मुलगे सुना आणि नातवंडे आनंदाने एकत्र नांदत असतात ते कुटुंब आदर्श अशी एक समजूत आहे! मात्र हल्लीच्या काळी असे कुटुंब दुर्मिळ होत चालले आहे. त्यांचे प्रमुख कारण म्हणजे शहरांमधून जागेची टंचाई! शिवाय मुलांचा स्वतंत्र राहण्याकडे कल असतो. त्यामुळे आजी-आजोबांच्या राहण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

एकत्र पण विभक्त!

यावर एक पर्यायही उपलब्ध झाला आहे. एकाच इमारतीत शेजारी शेजारी किंवा जवळपास आजी-आजोबा व त्यांची मुले वेगवेगळी राहात असतात. त्यामुळे नेहमी एकमेकांची चौकशी करता येते. मदत लागली तर लागलीच मिळते. ज्यांना हे शक्य नसते व ज्यांचे गावी घर असते तेथे म्हाताऱ्यांना राहावे लागते. गावी घर नसेल तर वृद्धाश्रमात रवानगी होते. मुले परदेशी राहत असतील तर नातवंडे सांभाळायला मुले परदेशी घेऊन जातात व काम झाले कि मग इकडे फ्लॅट घेऊन देतात किंवा वृद्धाश्रमात ठेवतात!

अशावेळी आपण एकटे आहोत याचे दु:ख करत बसण्यापेक्षा काय करता येईल याचा विचार करावा.

एकत्र असतांना घ्यायची काळजी. मुला/सुनेच्या संसारात जराही लुडबुड न करणे! त्यांच्या वागण्याबद्दल कुरकर न करणं, ते कुठे जातात, काय करतात, कसे पैसे खर्च करतात अशा असंख्य गोष्टी की ज्यांच्याशी आपला प्रत्यक्ष संबंध नसतो त्यावर भाष्य न करणे!

मुलगा मोठा झाला आहे. त्याला त्याचे जीवन जगू द्या, त्याचे निर्णय त्याला घेऊ द्या. पण काही पालकांना याची जाणीव नसते. कदाचित् अतिप्रेमामुळे असेल! मुलांना त्यांचे जीवन त्यांच्या पद्धतीने सुखाने जगू द्या. त्यांना फुकटचे सल्ले देऊ नका. खरेतर सल्ला मागितला तरी देऊ नका! समजा तुमचा सल्ला चुकीचा ठरला तर दोष तुमच्यावरच येणार! त्यापेक्षा त्यांनाच काय ते ठरवू द्या.

हल्ली दोन पिढ्यांमधील अंतर खूप वाढले आहे! तरुण पिढी खूप हुशार, कर्तबगार आहे. त्यांनी म्हाताऱ्यांची मानसिकता समजून घ्यावी. इगो आड येऊ देऊ नये! या इगोमुळेच आपापसात संवाद होत नाही! नातेसंबंध दुरावतात!

स्वत:ची काळजी -

तुम्हीच तुमची स्वत:ची काळजी घ्या. मित आहार, हलका व्यायाम, पथ्यपाणी स्वत:चं सांभाळावं. आपला इतरांना त्रास तर होणार नाहीना याचीही काळजी घ्यावी. मितभाषी असावं, दुसारयांचेही ऐकून घ्यावे. दुसऱ्याच्या मतांचा आदर करावा, आपलंच खरं हा हट्ट, दुराग्रह सोडून द्यावा.

वस्तुस्थितीचा स्वीकार -

मुख्य म्हणजे म्हातारपण व त्या बरोबर येणाऱ्या शारीरिक व्याधीं यांचा जाणीवपूर्वक स्वीकार करावा. उगीच बाऊ करून कुरकुरत बसू नये! या वयात शंभर टक्के तंदुरुस्त राहणे कठीणच! काहीना काही तरी तक्रारी असतातच! सहनशील असावं. राग करणं सोडून द्यावं! प्रयत्न केल्यावर सर्व काही शक्य असतं!

नैराश्य - हा काळ अतिशय नाजूक असतो. नैराश्य येण्याचा धोका असतो. आता आपल्या आयुष्याला काही अर्थ नाही असे वाटू लागतं. दोन वेळा खाणं आणि पडून राहाणं हेच आपलं आयुष्य असं वाटू लागतं.

म्हातारपण हे काही आकाशातून पडत नाही! आयुष्यातले चढ-उतार अनुभवल्यावरच ही अवस्था येते. तेव्हा आता आपला काही उपयोग नाही अशी भावना असता कामा नये. आयुष्याची संध्याकाळ आनंदाने, समाधानाने जगायची असते!

जेव्हा मृत्युची चाहूल लागते तेव्हा शांतपणे त्याला सामोरे जावे. उगाच कृत्रिम उपायांनी मरण लांबवू नये! आपल्या नातेवाईकांनाही तशा सुचना द्याव्यात! तसे नाही केले तर स्वत:ला तर यातना भोगाव्या लागतातच पण नातेवाईकांनाही त्रास होतो. पैशापरी पैसाही अमाप खर्च होतो.

निरोप घेताना - लक्षात ठेवा हे जग सोडून जाताना बरोबर घेऊन जायच्या असतात जीवलगांच्या गोड आठवणी! आणि मागे ठेवायच्या असतात अशा आठवणी कि ज्याने त्यांना काही काळ तरी तुमची उणीव भासेल! तरच तुमचे जीवन सार्थकी लागलं असे म्हणता येईल!

(या लेखातले माझे विचार प्रामुख्याने सुखवस्तू / पांढरपेशा वर्गातील वृद्धांचे आहेत.)

=====================================================================

कुसुमाग्रज नास्तिक होते का?

कुसुमाग्रजांच्या निधनाच्या बातमीत असे सांगितले गेले कि त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या पार्थिवाला भडाग्नी देण्यात येणार आहे. माझी उत्सुकता चाळवली गेली. कुसुमाग्रज नास्तिक तर नव्हते ना?

मी त्यांच्या कवितासंग्रहातून काही संदर्भ मिळतात का ते बघितले आणि काय आश्चर्य मला असे जवळजवळ ३०-३५ स्पष्ट उल्लेख आढळले. मी त्याचे संकलन करून एक लेख लिहिला. २००० साली ग्रंथालीच्या ‘रुची’ या दिवाळी अंकात माझा हा लेख प्रसिद्ध झाला. त्यातला काही अंश येथे देत आहे.

कुसुमाग्रज नास्तिक होते का?

नुकतेच ‘पुलं’चे निधन झाले होते. त्यावेळी ‘पुलं’नी आपली शवयात्रा काढू नये, कोणतेही धार्मिक विधी करू नयेत व मृतदेहाला विद्युतदाहिनीत अग्नी द्यावा अशी इच्छा प्रकट केली होती.

ज्येष्ठ कवियित्री इंदिरा संत यांचेही निधन याच सुमारास झाले होते. त्यांनीही अंत्यसंस्काराच्या वेळेला कोणतेही धार्मिक विधी करू नयेत अशी इच्छा व्यक्त केली होती.

त्यापूर्वी कुसुमाग्रजांनीही आपल्या मृतदेहाला भडाग्नी द्यावा व कोणतेही धार्मिक विधी करू नयेत अशी इच्छा व्यक्त केली होती.

आज बुद्धिवान, विचारी माणसे आपल्या धार्मिक आचारविचारांबद्दल साशंक झाली आहेत.

महाराष्ट्राच्या या थोर विचारवंतांनी अंत्यसंस्कारांबद्दल अशी मते व्यक्त केलीत त्यांचा विचार करायला हवा. आपले धार्मिक आचारविचारच आता तपासून पाहायची वेळ आली आहे. धार्मिक अंधश्रद्धा, कर्मकांड यांचा अतिरेक होतोय असे वाटते.

देवाधर्माविषयी कुसुमाग्रजांचे विचार त्यांच्याच कवितेतून पकडण्याचा हा प्रयत्न सुजाण वाचकांना अंतर्मुख करायला पुरेसा होईल अशी आशा वाटते.

परमेश्वराचा शोध हा फार पुरातन आहे आणि अजूनही कोणालाच त्याचा थांगपत्ता लागलेला नाही. कुसुमाग्रज म्हणतात :-

अज्ञात –

अस्तित्वाचे तव मृगजळ हे

अशेष विश्वा व्यापुनि राहे

अति धावती भाविक मृग हे

तयाकडे दिनरात

अससी सतत मला अज्ञात

- किनारा

*************************

जोगीण –

मला हवी आहे नास्तिकता

पण सहस्र वर्षे मनाला मिठी घालून बसलेली

ही आस्तिकता होत नाही दूर माझ्यापासून.

- स्वगत

**********************

मागणे –

माझे मागणे फार थोडे आहे.

तुझ्या अस्तित्वाची एखादी अस्पष्टशी खूण मला दिसू दे. �

तुझ्या महात्म्याची मीमांसा मी अनेकांकडून ऐकली आहे.

तुझ्या गुणांचे संकीर्तन करणारी रसाळ काव्ये मी वाचली.

संगमरवरी शिल्पांतून कोरलेल्या तुझ्या

मनोहर मूर्ती मी पाहिल्या.

त्या सर्वांवर श्रद्धा ठेऊन मी डोळे मिटले आणि

भक्तीभावाने तुझी पूजा केली.

पूजा संपल्यावर डोळे उघडून मी सभोवार पाहिले –

पण तुझ्या अस्तित्वाची खूण मला कोठेही दिसली नाही.

म्हणून –

माझे मागणे फार थोडे आहे.

मीमांसाग्रंथातून मीमांसकांच्या बुद्धीचा मला साक्षात्कार झाला.

तुझे गुणगायन करणाऱ्या सुंदर काव्यातून कवींच्या प्रतिभेचे मला दर्शन झाले.

संगमरवरी शिल्पाकृतीतून शिल्पकारांची कला मला समजली.

पण तुझ्या अस्तित्वाची खूण त्यात कुठे होती?

मीही बुद्धिमान असतो तर तुझ्या अस्तित्वाची मीमांसा केली असती

प्रतिभावान कवी असतो तर तुझ्यावर काव्ये लिहिली असती.

कलावान शिल्पकार असतो तर तुझी मूर्ती घडवली असती.

आणि हे सारे करूनही तुझे अस्तित्व मला अज्ञात राहिले असते!

आणि म्हणून -

तुझ्यापाशी माझे एकच मागणे आहे

तुझ्या अस्तित्वाची एखादी अस्पष्टशी खूण मला दिसू दे.

- समिधा

***************

त्यांच्यासाठी –

देव जयांना माहीत नाही त्यांच्यास्तव देऊळ

विशाल शिल्पे-धूप-नगारे पूजेचा गोंधळ!

धर्म कोणासाठी ?

धर्म न उमजे त्यांच्यासाठी शतकांच्या संहिता

मृत शब्दांची कवळूनि थडगी बसलेली अंधता!

स्वर्ग कोणासाठी ?

लुळे पांगळे पृथ्वीवर जे कुस्करल्या चेतना

त्यांच्यासाठी सोज्वळ सुंदर स्वर्गाच्या कल्पना!

- मराठी माती

*******************

स्वप्नाची समाप्ती –

ध्येय, प्रेम आशा यांची

होतसे का कधी पूर्ती

वेड्यापरी पुजतो या

आम्ही भंगणाऱ्या मूर्ती

- विशाखा

*********************

देवाच्या दारी –

आणि आज मन शंकित हे होई

आहेस की नाही मुळात तू

भित्या भावनेला शोधायासी धीर

पाषाणास थोर मीच केले

- विशाखा

*************************

(त्यांच्या इतर कवितांचे उल्लेख : रिकामे देऊळ –समिधा, शिलाखंड – समिधा, असले धर्मगुरू – पाथेय, भीती – मुक्तायन, भाव कणिका – विशाखा, पहाडातील देवी – मुक्तायन, गाभारा – मुक्तायन इत्यादी.)

त्यांना एकदा एका मुलाखतीत विचारले होते की देव आहे किंवा नाही ? त्यांनी उत्तर दिले, " ज्यांना देव हवा आहे त्यांच्यासाठी देव आहे. ज्यांना देव नको आहे त्यांच्यासाठी देव नाही!"

====================================

# Retirement

माझ्या प्रदीर्घ सेवेची शेवटची २ वर्षे.

माझे सिनियर मॅनेजरचे promotion due होते. पण काही नतद्रष्टांनी विरोध केला आणि ऑफिसनेही त्यांचीच बाजू घेतली आणि मला Officiating post दिली.

त्यालाही त्यांचा विरोध होता!

हा अन्याय होता आणि मी निषेध नोंदवला! पण अगदी वेगळ्या तऱ्हेने! त्यांच्या पत्रात ते 'Unhappy' आणि 'demoralized' झाले असा कांगावा केला होता.

मी ऑफिसला लिहिले -

" I do not wish that I should retire after 38 years of service on a sad note of so many of my colleagues 'unhappy' and 'demoralized' because of my promotion. "

शिवाय चिडून Voluntary retirement साठी अर्जही दिला. तो ऑफिसने पेंडिंग ठेवला!

पुढे फक्त दोन महिने राहिले असताना मला त्याच पोस्टसाठी Interview ला बोलावले.

आता मात्र हद्द झाली. कारण दोन महिन्यात रिपोर्टही तयार होत नाही. म्हणजे मी आता लवकरच रिटायर होत आहे म्हणून मला reject करणार! तरीही मी interview दिला.

पण चक्रे जोरात फिरली. आणि १३ जानेवारी १९९५ रोजी मला माझे प्रमोशनचे पत्र दिले! रिटायर व्हायला फक्त १९ दिवस असताना! माझ्या माहितीत अशी केस नव्हती. हा माझा बहुमान होता. मी अगदी खुश होतो.

**************************************************

रिटायर व्हायचा दिवस उजाडला. मी जड अंत:करणाने ऑफिसमध्ये पाऊल ठेवले. आजचा माझा शेवटचा दिवस. उद्या मी इथे असणार नाही या कल्पनेने व्याकूळ झालो होतो. हे माझे इतक्या वर्षांचे सहकारी आता मला रोज दिसणार नाहीत! माझ्या सहकाऱ्यांचे चेहरेही नेहमीसारखे उत्साही दिसत नव्हते. त्यांच्याही मनाची अवस्था मला कळत होती.

आणि माझे असंख्य Crew मित्र, होस्टेसेस ज्यांच्याशी माझे रोजचे जीवन नकळत जोडले गेले होते.

माझे आयुष्यच बदलून जाणार होते. मी काय करीन. ही पोकळी भरून काढू शकेन का? या महिन्याचा हा माझा शेवटचा पगार. त्यानंतर काय ? असे अनेक प्रश्न भेडसावीत होते.

मला १०-१२ दिवस आधीच सांगितले होते की मी आता चार्ज द्यावा. मला इतर department मधील कोणाला भेटायला जायचे असेल तर मी जाऊ शकतो. पण मी शेवटच्या दिवसापर्यंत काम करत राहणार हे ठरवले होते.

त्याप्रमाणे लंच टाईमपर्यंत काम केले आणि मग चार्ज दिला. दुपारी चारच्या सुमारास send-off party होती.

पण मला काय झाले होते माहित नाही. मी यंत्रवत् वागत होतो. माझे चित्त ठिकाणी नव्हते.

मी 'send off party' ला हजर राहणार नाही असा पवित्रा घेतला! पण शेवटी एका अटीवर मान्य केले. माझ्याबद्दल डायरेक्टरने काही बोलायचे नाही! आणि मीही काही भाषण करणार नाही!

माझा हा हट्टही पुरवला गेला. माझा डायरेक्टर फार मोठ्या मनाचा होता. मी दुखावलो गेलो आहे हे त्याला कळत होते. त्याने चार्ज घेतल्यापासून मला सांभाळून घेतले होते. त्याचे माझे संबंध फक्त दोन वर्षापासूनचेच होते. घोळ घातला होता तो पूर्वीच्या लोकांनी.

प्रथेप्रमाणे शेवटच्या दिवशी कंपनीच्या गाडीने कर्मचाऱ्याला त्याच्या घरी सोडतात. पण मी गाडी नको म्हणून सांगितले, कारण घरचे लोक मला घ्यायला आले होते.

तेव्हड्यात गाडीचा driver पुढे आला. मी त्याला चांगला ओळखत होतो. म्हणाला सर तुम्ही रिटायर होणार म्हणून तुम्हाला घरी सोडायचा मान मला मिळावा यासाठी मी ही ड्युटी खास मागून घेतली आणि तुम्ही नाही का म्हणता ?

मी त्याचे हात हातात घेऊन म्हणालो अरे हा तुझा मान नाही तर तो माझा बहुमान आहे. चल मी तुझ्याबरोबर नक्की येतो.

## निवृत्तीनंतरचे जीवन -

मी ज्या दिवशी निवृत्त होऊन घरी आलो त्या दिवसाच्या माझ्या मन:स्थितीचे वर्णन करायचे तर फार अवघड काम आहे. ज्या ऑफिसात इतकी वर्षे नित्यनेमाने जात होतो तेथे उद्यापासून आपल्याला जाता येणार नाही. इतक्या वर्षांचा सहकाऱ्यांचा सहवास आता असणार नाही. एक फार मोठी पोकळी आपल्या आयुष्यात तयार झाली आहे. ती भरून काढणे अशक्यच!

मग यापुढे मी काय करणार ? आणि त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे आता या महिन्यापासून मी पैसे कमावणार नाही! आर्थिक परावलंबित्व येणार. साठवलेले पैसे किती काळ पुरणार ? मग पुढे काय ? असे एक ना दोन, असंख्य प्रश्न! मी हळवा झालो होतो! मात्र तो पर्यंत मुलगा कमावता झाला होता त्यामुळे ती चिंता नव्हती.

दुसरेच दिवशी हे निराशाजनक विचार झटकून टाकले. व नव्याने आयुष्य जगायला मिळणार म्हणून उल्हसित झालो.

स्वस्थ बसवत नव्हते. वाटले काहीतरी समाजकार्य करावे. सुदैवाने पार्ल्यातच लोकमान्य सेवा संघ ही नामवंत संस्था आहे. शाळेत असल्यापासून तिथे कार्यक्रमांना जात होतो.

तिथे गेलो तर सुदैवाने माझे एअर इंडियातील एक सहकारी भेटले. त्यांनी स्वागतच केले.

माझ्याकडे संगणक आहे आणि त्यांचे काही काम असेल तर मी ते करू शकेन असे सांगताच ते म्हणाले आम्हाला अशाच कोणाची तरी गरज होती. तुम्ही सभासदांचे रजिस्टर अपडेट करू शकाल ? मी आनंदाने होकार दिला. आणि वर्षभरातच त्यांचे काम पूर्ण करून दिले.

१) २००१ : संस्थेच्या  "वाटचालीतील अबोल साथी"तून प्रवास सुरु झाला.

२) २००२ : मला उत्कृष्ट कार्यकर्त्याचे पारितोषिक मिळाले. त्यानंतर प्रचारशाखा, ग्रंथालयशाखेत काम मिळाले.

३) २००२ ते २००५ : कार्यकारिणीत 'स्वीकृत' सदस्य म्हणून घेतले. हा माझ्यासाठी फार मोठा मान होता.  या अल्प काळात माझ्यासाठी ही फार मोठी भरारी होती.

४) मी दादरच्या 'विजय छंदोपासक' मंडळाचा सभासद होतो. त्यांच्या सहकार्याने आमच्या संस्थेत विविध छंदांचे एक प्रदर्शन भरवले. (२००१) एकूण २१ छंद असलेले हे अशा तऱ्हेचे पहिलेच प्रदर्शन होते. लोकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

५) २००३ : संस्थेच्या गणेशोत्सवात २० ओरिगामी गणेश करून मांडले. लोकांना खूप आवडले.



६) २००२ ते २००४ या काळात संस्थेच्या सहकार्याने ओरिगामीचे क्लासेस घेतले.

७) २००४ : संस्थेच्या वार्षिकोत्सवात सभासंदांचे छंद प्रदर्शन भरवले. त्यालाही खूप छान प्रतिसाद मिळाला.

या छंदांच्या निमित्ताने एका विशेष छांदिष्टाची ओळख झाली. ते आहेत एक निवृत्त प्राथमिक शिक्षक. श्री. वं. दे. लोहार. धरणगाव, जि. जळगाव. यांचा छांदिष्टांची माहिती जमवणे हाच छंद आहे! त्यांच्या संग्रही महाराष्टातील जवळजवळ सर्वच छांदिष्टांची माहिती आहे.

त्या नंतर 'फेसबुक' शी दोस्ती झाली आणि माझे जीवनच  बदलून गेले. माझ्यातल्या लेखकाला त्याने जागे केले. आज तो माझा नुसता विरंगुळा नाही तर एक आव्हानात्मक भाग आहे. हे पुस्तकही त्यातूनच तयार झाले.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी सिनेमा हा एकेकाळी भारतात हिंदी सिनेमाच्या तोडीस तोड किंवा काकणभर वरचढच होता. मध्यंतरी मराठी सिनेमाला उतरती कळा लागली. प्रेक्षक येईना. म्हणून थिएटर मिळेना. थिएटरच मिळत नाही म्हणून चांगले मराठी सिनेमा बनेनात. आणि चांगले सिनेमा नाहीत म्हणून प्रेक्षक मिळेनात. असे एक दुष्टचक्र सुरू झाले. मग आला झी मराठी सिनेमा. आणि त्याच्याच जोडीने छोट्या आकाराची मल्टीप्लेक्स आणि डिजिटल प्रक्षेपण. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी सिनेमा जोमाने बहरू लागला.

काहीशी अशीच परिस्थिती मराठी साहित्याचीही होत आहे. एकेकाळी टॉपला असलेले मराठी साहित्य मधल्या काळात टिव्ही आणि सिनेमाच्या युगात मागे पडले. पण आता मोबाईल आणि इंटरनेट यांच्यामुळे मराठी वाचकवर्ग फ़ार मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे. आणि त्याच जोमाने त्यंच्यासाठी लिहिणारा दर्जेदार लेखक वर्गही निर्माण होऊ लागला आहे. मराठी साहित्याच्या भविष्याबद्दल आम्ही अत्यंत आशावादी आहोत.

आपली साथ मात्र पाहिजे. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त लोकांना ई साहित्य बद्दल सांगा. त्यांचे ई मेल पत्ते व whatsapp नंबर कळवा. त्यांना ई साहित्यचं मोबाईल app download करायला सुचवा. आग्रह करा. ई साहित्यचे

मार्केटिंग करा. एकदम फ्रंट फुटवर येऊन खेळू. जबरदस्त मार्केटिंग करू. लाखांचे कोटी करू आणि मराठी साहित्य पुन्हा नंबर वन ला आणू.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahitya.com

esahity@gmail.com

आता ई साहित्य चे APP उपलब्ध आहे. ई साहित्यचं  App आपण खालील लिंकवरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करा आणि भरमसाट पुस्तकं फ्री वाचा.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

ई साहित्य प्रतिष्ठानची ई बुक्स Whatsapp broadcast service  सुरू झाली आहे. पूर्णपणे फुक्कट पुस्तकं आता आपल्या मोबाईलवर थेट .

कृपया नांव नोंदणीसाठी 7710980841 हा नंबर आपल्या मोबाईलवर सेव्ह करा आणि नंतर या नंबरवर वॉट्सएॅप करून आपले नांव व शहराचे नांव कळवा. आपल्याला नियमितपणे एक नवीन मराठी ई पुस्तक Whats app द्वारे पाठवले जाईल. आपण ते पुस्तक आपल्या मित्रांना Whatsapp करा आणि भाव खा.

आपल्या ओळखीच्या किमान दहा लोकांचे मेल आय डी आम्हाला कळवा. त्यांना आम्ही विनामूल्य पुस्तके पाठवू. व आपल्याला VIP सभासद बनवले जाईल.